नचा छोटा

भाग १ ला खंड

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

# हिंदुस्थानाचा छोटा इतिहास.

## खंड १ व २.

हा

लिहिणार

राजाराम रामकृष्ण भागवत

आणि

छापणार

"ब्राह्मण" छापखाना

गिरगांव, मुंबई.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

शालि० शके १८१५, कार्तिक.

इसवी शके १८९३, डिसेंबर.

किंमत ४॥ आणे, टपाल हांशील अर्धा आणा.

हीं पुस्तकें "ब्राह्मण" छापखान्यांत गिरगांवामध्यें मिळतील.

मराठी ग्रंथ संग्रहालय नं० ३३ ठाणे सन १८०
२६६
२-३३
रा.३८२

# हिंदुस्थानाचा छोटा इतिहास.

## खंड १—

## भूगोल आणि ऐतिहासिक माहिती.

## भाग पहिला—

### हिंदुस्थानाचा विविध भूगोल.

१ **नांव कसें पडलें**—" सिंदु आणि " हिंदु " किंवा " हिंदु " हीं नांवें " सिंधु " शब्दाचा अपभ्रंश होऊन झालीं आहेत. या नांवांचीं " सिंद " आणि " हिंद " किंवा " इंद " हीं संक्षिप्त रूपें. मुसलमानांनीं **हिंदु** हें नांव **पंजाबां**तल्या लोकांस व **हिंद** हें नांव त्या लोकांच्या प्रांतास पहिल्यानें लाविलें. पुढें **पंजाबां**तल्या लोकांच्या धर्माचे जे लोक आढळत गेले त्यांस व त्यांच्या मुलुखास अनुक्रमें हींच नांवें मुसलमान लावूं लागले. याप्रमाणें जे मुसलमान नव्हत ते **हिंदु**, असा **हिंदु** शब्दाचा अर्थ, मुसलमानांच्या हातीं शेंकडों वर्षें राजसत्ता राहिल्यामुळें होऊं लागला. या **हिंदु** लोकांचें जें " स्थान " तें " **हिंदुस्थान**"; " स्थान " ह्मणजे रहाण्याचें ठिकाण. "**हिंद** " शब्दावरून **इंदिया** हा **इंग्रजी** भाषेंतील **हिंदुस्थाना**चा वाचक शब्द निघाला.

२ "**हिंदू**"चे **मुख्य विभाग—नर्मदे**च्या उत्तरेकडील प्रदेशास मात्र **हिंदुस्थान** शब्द लावून, दक्षिणेकडील प्रदेशास **दक्षिण** शब्द लावण्याची आपल्या लोकांत वहिवाट आहे. याप्रमाणें **हिंदुस्थानी** आणि **दक्षिणी** असें हिंदूंचे दोन मुख्य विभाग होतात.

३ **लांबी रुंदी वगैरे—सिंधु** नदी डोंगर फोडून दक्षिणेकडे वाहूं लागते, तेथपासून तों **कन्याकुमारी**पर्यंत लांबी सुमारें १९०० मैल आहे. **सिंधू**च्या मुखांपासून तों **ब्रह्मपुत्रे**च्या **आसाम** प्रांतांतल्या वळशापर्यंत रुंदीही जवळ जवळ तितकीच आहे. क्षेत्रफळ सुमारें १४ लाख चौरस मैल असून, लोकसंख्या सुमारें २८ कोटी आहे.

४ **चतुःसीमा**—उत्तरेस **हिमालय** पर्वताची ओळ; पूर्वेस **ब्रह्मपुत्रा**नदी आणि **बंगाल**चा उपसागर; दक्षिणेस **सिंहल**द्वीप आणि **हिंदी** महासागर; पश्चिमेस **आरबी** समुद्र, **बलुचीस्थान** आणि **अफगाणस्थान**.

१ पूर्वेकडील व पश्चिमेकडील चतुःसीमा दिली आहे ती स्थूळ दृष्टीनें दिली आहे. ब्रह्मदेश खालसा केल्यानें आणि बलुचीस्थानाचीही जवळ जवळ तीच स्थिति झाल्यानें पूर्वपश्चिम चतुःसीमा पुष्कळ पुढें गेली आहे.

५ **नद्या**—१ **ब्रह्मपुत्रा** नदीचा उगम हिमालयाच्या पलीकडील बाजूस आहे. ही नदी **तिबेटां**तून वाहात येते; आणि अखेरीस **मेगना** असें नांव पावून **बंगाल**च्या उपसागरास मिळते. **तिबेटां**त या नदीस "सांपू" ह्मणतात. २ **भागीरथी** नदीचा उगम आहे त्या स्थळास **गंगोत्री** ह्मणतात. तेथून निघते ती **अयोध्या**प्रांतावरून वाहून **बहार** व **बंगाल** या दोन प्रांतांत अनेक फांटे—जसे उत्तरेकडून तसेच दक्षिणेकडून—मिळाल्यामुळें अधिकाधिक रुंद होत जाते; आणि अखेरीस अनेक मुखांनीं **बंगाल**च्या उपसागरांत पडते. **भागीरथी**च्या

मुखांस लागलेल्या जमिनीच्या पट्टीस **सुंदरबन** ह्मणतात. **नेपाळां**तून **सरयू** किंवा **घोगरा, गंडकी** आणि **कोशी** या तीन नद्या **भगीरथी**स मिळतात. **सरयू** ही **अयोध्या**प्रांतांतून वाहाते. **गोमती** हीही **अयोध्या** प्रातांतून वाहून अखेरीस **भागीरथी**स मिळते. **यमुना** ही नदी **यमनोत्री**स उगम पावून आणि पुढें वाटेंत **चंबळा** व **बेटवा** या **माळव्यां**तील नद्या मिळतात त्यांस घेऊन, **प्रयाग** किंवा **अलाहबाद** मुक्कामीं दक्षिणेकडून **भागीरथीस** मिळते. **भागीरथी** व **यमुना** यांचेमधलि प्रदेशास **अंतर्वेदी** किंवा **दोआब** ह्मणतात. **शोण** हीही एक दक्षिणेकडून **भागीरथी**स मिळणारी नदी आहे. ३ **महानदी** ही **उडिसा** प्रांतांतील नदी. ४ **गोदावरी** अथवा **गंगा** अथवा **गौतमी** हिचा उगम **त्रिंबकेश्वरा**च्या डोंगरावर आहे. ज्यांतून **गंगा** वहाते त्या मुलखास **गंगथडी** ह्मणतात. ही आमच्या **महाराष्ट्र**मंडळांतून **तेलंगणां**त शिरते; आणि अखेरीस सात फांट्यांनीं समुद्रास मिळते. सात फांट्यांतील प्रदेशास "सप्तगोदावर" ह्मणतात. **पाइनगंगा** अथवा **वाणगंगा, वर्धा** किंवा **विदर्भा** आणि **वाइनगंगा** हे तीन फांटे **वऱ्हाडां**तून **गोदावरी**स मिळतात. ५ **कृष्णा** किंवा **कन्हर** या नदीचा उगम **धौम महाबळेश्वरा**वर आहे. याप्रमाणें **महाराष्ट्रमंडळां**तून निघून ही नदी **कर्नाटकां**त शिरते; आणि अखेरीस **चोलमंडलाच्या** किनाऱ्यावर समुद्रास मिळते. कृष्णेस उत्तरेकडून **भीमा** व दक्षिणेकडून **तुंगभद्रा** मिळते. **भीमा** ज्यांतून वहाते त्या प्रदेशास **भीमथडी** ह्मणतात. **कृष्णा** नदीचा जसा **मराठी** तसा **कानडी** व **तम्मुळी** या मंडळांशींही संबंध लागला आहे. ६ **कावेरी** नदीचा **तम्मुळी** मंडळाशींच संबंध आहे. जसा **गोदावरी**चा व **कृष्णे**चा तसा **कावेरी**चाही उगम **सह्याद्री**वर होतो. या नदीनें **ह्मैसुर**चा दक्षिणेकडील बराच भाग सुपीक केला आहे.

**महानदी गोदावरी, कृष्णा** व **कावेरी** या चार ही नद्या **बंगाल**च्या उपसागरांत पडतात. ७ **तापी** किंवा **तापती** ही नदी **सातपुड्या**च्या खालून वाहाते, आणि अखेरीस **खंबायत**च्या अखातांत पडते. ८ **नर्मदा** किंवा **रेवा** या नदीचा उगम **आम्रकूट** नांवाच्या डोंगरावर होतो. ही तेथून निघते ती **तापी**प्रमाणें पश्चिमेकडे वाहाते; आणि **सातपुड्या**च्या वरून वहात वहात अखेरीस **खंबायत**च्या अखातांत पडते. **मही** नांवाचा एक फांटा **नर्मदेस** उत्तरे कडून मिळतो. **मही** नदीचें पाणी मिळणाऱ्या मुलखास **महीकांठा** आणि **रेवा** नदीचें पाणी मिळणाऱ्या मुलखास **रेवाकांठा** ह्मणतात. **नर्मदा** व **तापी** या दोन्ही नद्यांच्या मुखाजवळच्या प्रांतास **लाट** किंवा **लाड** ह्मणतात. ९ **सिंधु** नदीचा उगम **तिबेटां**त होतो. ही **तिबेटां**तून निघते ती पश्चिमेकडे बरीच वाहात येते, आणि पुढें डोंगर फोडून दक्षिणेस वळते. पुढें पश्चिमेकडून मिळणाऱ्या **काबूल** नदीस घेऊन वहात असतां, **सतलज, बियास, रावी, चेनाब** आणि **जहीलम** किंवा **बेहत** या **पंजाबां**तून वहाणाऱ्या पांच नद्या वाटेंत मिळतात, त्यांसही घेते; आणि एकदां पकडलेली दक्षिण दिशा न सोडतां, **सिंध**प्रांतांतून वाहात वाहात शेवटीं **आरबी** समुद्रास मिळते. **पंजाब** ह्मणजे " पांच नद्यां " मधील प्रदेश. **सिंध** हें प्रांतांचे नांव **सिंधु**नदी वरून पडलें आहे.

६ **पर्वत**—उत्तरेकडील **हिमालया**ची ओळ **सिंधु**नदी पर्यंत कायम मानतात. " हिम "=बर्फ़; " आलय "=स्थान, ठिकाण; " हिमालय "=बर्फाचें ठिकाण. **सिंधु** नदीच्या पश्चिमेस ही ओळ **हिंदुकुश** हें नांव मिळविते. **कैलास** ही डोंगराची ओळ **हिमालया**च्या उत्तरेस **तिबेटांत** आहे. जी डोंगराची ओळ **सिंधु** नदीच्या **पंजाबां**तल्या भागाच्या पश्चिमेस दक्षिणोत्तर लागली आहे, तीस **सुलेमान** ह्मणतात. **सिंधु** नदीच्या **सिंध** मधील भागाच्या पश्चिमेसही तशीच एक ओळ लाग-

ली आहे, तीस **हाला** ह्मणतात. **आरवली** नांवाची डोंगरांची ओळ **राजपुतान्यां**त दक्षिणोत्तर–पण थोडीशी तिरकस–लागली आहे. **विंध्य व सातपुडा** या दोन पश्चिमोत्तर गेलेल्या डोंगरांच्या ओळी अनुक्रमें **नर्मदेच्या** उत्तरेस व दक्षिणेस आहेत. **सह्याद्री** ही डोंगराची ओळ **सातपुड्या** पासून कांहीं अंतरावर खालीं लागते, ती दक्षिणेस पसरत पसरत शेवटीं **कन्याकुमारी**जवळ संपते. या ओळीनें जी समुद्राकडची अरुंद पट्टी निराळी केली आहे, तीस **कोकणपट्टी** ह्मणतात. **सह्याद्री**च्या पलीकडील ( पूर्वेकडील ) प्रदेशास **देश** ह्मणण्याची वहिवाट आहे. **गोमंतक** प्रांताच्या दक्षिणेकडील **कोकणपट्टी**च्या भागास **तुळव** ह्मणतात; आणि **तुळवा**च्या खालीं **मलबार** किंवा **मल्याळ** लागतें. **मलबारां**तल्या **सह्याद्री**च्या भागास **मैलागिरी** किंवा **मलयाद्री** ह्मणतात. **नीळगिरी** हा **मैलागिरी**चाच एक भाग आहे. **सह्याद्रीस** " पश्चिमेकडील घांट " असेंही ह्मणतात आणि " **चोलमंडळा**च्या किनाऱ्या "वर जी दक्षिणोत्तर डोंगरांची ओळ आळ आहे तीस " पूर्वेकडील घांट ह्मणतात. 'पूर्वेकडील घांटा 'चा जो भाग **गोदावरी**च्या उत्तरेस आहे व **तेलंगणा**च्याही वर थोडासा गेला आहे, त्यास **महेंद्राद्री** किंवा **महेंद्र** ह्मणतात.

७ **सरोवरें—हिंदुस्थानां**तील **चिल्का, सांबर** वगैरे सरोवरें फारच किरकोळ आहेत.

८ **अखातें—कच्छचें, खंबायत**चें आणि **मानारचें**. पहिलें **कच्छ** व **काठेवाड** यांच्या मध्यें दुसरें; **काठेवाडास** लागून पूर्वेकडेस; तिसरें **हिंदुस्थान** व **सिंहलद्वीप** यांच्यामध्यें.

१० **द्वीपकल्प—कच्छ** आणि **काठेवाड.**

११ **बेटें—सिंहलद्वीप** अथवा **लंका** हेंच एक लक्षांत ठेवण्यासारखें.

१२ **हवापाणी—हिमालय** हें " बर्फाचें माहेर ". त्या मुळें

यास लागून असलेले प्रदेश फार थंड आहेत. **हिमालया**कडून जसजसें दक्षिणेस यावें, तसतसें हवापाणी बदलतें. **नर्मदे**च्या उत्तरेस हिंवाळ्यांत थंडी कडक पडते, आणि उन्हाळ्यांत उष्मा मनस्वी होतो. **नर्मदे**च्या दक्षिणेस **कोकणपट्टी**सारखे जे खालाटीचे प्रदेश आहेत, त्यांत थंडी बेताची पडते आणि गर्मीही नेमस्त असते. पण समुद्रांतील वारा न लागणारे जे **सह्याद्री**पलीकडील प्रदेश आहेत, त्यांतील हवा अस्सल **हिंदुस्थानां**तल्या हवेच्या तोडीची असते. **कोकणां**तही जसजसें वलठीकडे वळावें तस तशी थंडी जास्ती. **राजपुता**न्यांत पाण्याचा पुरवठा पुष्कळ कमी. **कोकणां**त जसें पाणी विपुळ असतें, तसें **देशा**वर नसतें. तरी कोठें **राजपुतान्या**सारखें ओसाड वाळवंट आणि कोठें सुपीक जमिनीनें भरलेला **देश** ! ! ! हवेंत दमटपणा असतो, ह्मणून **कोकणां**त उन्हाळा साधारण असला तरी घाम फार येतो. हवा सुकी पडल्यामुळें **देशा**वर उन्हाळ्यांत उष्मा जरी फार होतो, तरी **कोकणां**तल्या सारखा घाम येत नाहीं. नद्यांच्या मुखाजवळच्या प्रदेशांत हवा पुष्कळ बिघडलेली असते; आणि पाणीही निरोगी नसतें. असले प्रदेश सोडून बाकीच्या प्रदेशांतली हवा एकंदरींत निरोगी असते; आणि पाणीही तसेंच असतें. **महाराष्ट्रा**च्या पेक्षां **गुजराथ** प्रांत अधिक सुपीक आहे. पण **महाराष्ट्रा**च्या हवापाण्यांत सत्व अधिक असून, **गुजराथचें** हवापाणी नि:सत्व समजलें जातें.

१२ **पीक—बंगाल्यांत** मोठें पीक तांदुळांचें; नीळ व अफू या दोहोंचेंही पीक **बंगाल्यांत** बरेंच आहे. **आसाम** प्रांतीं चहाची लागवड बरीच झालेली आहे. **मद्रास** इलाख्यांत तंबाखू बराच पिकतो. मलबारांत वेलदोडे आणि काळीं मिर्च्यें फार पिकतात. सुकें खोबरें व सुपारी या दोहोंचें पीक **मलबार** व **कोचीन** या प्रांतीं फार होतें. **म्हैसुर** प्रांतीं काफीचीही लागवड झालेली आहे. **कोकणांत** मुख्य पीक नारळाचें आणि

सुपारीचें. तांदूळही **कोकणां**त बराच पिकतो. पण **कोकणां**तला नांवाजलेला मेवा फणस, आंबे आणि काजू. **देशा**वर मोठें पीक बाजरीचें आणि ज्वारीचें. भुयमूग देशावर पुष्कळ पिकतो. कांदा, लसूण, हरभरा, तंबाखू असला माल घांटावरूनच घांटाखालीं उतरतो. **सोलापूर, धारवाड, खानदेश, नागपूर,** या जिल्ह्यांत कापसाचें पीक मोठें. **देशा**वर व **खानदेशां**त ऊंस चांगला होतो; आणि गुळ पुष्कळ तयार करतात. एकंदरींत **कोकण**च्या जमिनीपेक्षां **देशा**वरील जमीन अधिक सुपीक. **गुजराथ** व **काठेवाड** यांतही कापसाचें पीक मोठें. **माळव्या**ची अफूविषयीं प्रसिद्धि आहे. हिंग **पंजावां**तून येतो. केशर **काश्मीरांत** होतें. **नेपाळां**तही केशर पिकतें. कस्तूरीचे मृग **नेपाळांत**च असतात. **सिंहलद्वीपां**त दालचिनी फार पिकते. "**मानार**च्या अखातां"त मोत्यांचीं कालवें पुष्कळ सांपडतात.

१४ **खाणींतील पदार्थ**—**म्हैसुरा**जवळ **वैनाड** नांवाचा प्रांत आहे, त्यांत सोन्याच्या खाणी वऱ्याच आहेत. लोखंडही जाग जागीं वरेंच सांपडतें. **गोंवळकोंड्या**ची हिऱ्याविषयीं प्रसिद्धि आहे. **ब्रह्मदेशां**त माणकाच्या खाणी आहेत. **सिंहलद्वीपां**तही एका जातीचें रत्न सांपडतें. **जयपूर** प्रांतीं आणि **नर्मदे**वर संगमरवरी दगडाच्या खाणी आहेत. कोळशाच्या खाणी **नागपुरा**जवळ सांपडल्या आहेत.

१५ **विशेष नांवाजलेल्या चिजा**—**काश्मीरां**तील शाल व **बंगाल्यां**तील मलमल ह्या चिजा जगभर नांवाजलेल्या आहेत. **पंजावां**तही शालीचे कारखाने आहेत. **अमदावाद, नागपुर, शहापुर, सोलापुर, सासवड, वारामती,** या धोतरांनीं किंवा लुगड्यांनीं नांवाजविलेल्या पेंठा. **नाशीक, मिरज, सांगली,** इकडचें नकशीकाम फार सुबक असतें. **कच्छ** प्रांताचीही नकशीकामाविषयीं प्रख्याति आहे.

१६ **लोक**—थोडा विचार केल्यास **हिंदुस्थान** हा एक "देश" ठरत नाहीं, तर लहानसें एक "खंड" ठरतें. **यूरोप खंड** जसें **ख्रिस्ती** धर्माच्या लोकांचें, तसें **हिंदुस्थान खंड** हें **हिंदु** धर्माच्या लोकांचें. **हिंदुस्थानी** व **दक्षिणी** असे दोन लोकांचे मोठे विभाग पूर्वींच करण्यांत आले आहेत. **हिंदुस्थान्या**मध्यें **बंगाली, नेपाळी, कनोजी** अथवा **विहारी, राजपूत, सिख, सिंधी**—अशीं सहा राष्ट्रें आहेत. **सिख** राष्ट्र **पंजाब** व **काश्मीर** हे दोन प्रांत मिळून बनलें आहे. **गुजराथी, मराठी, कानडी, तेलंगी** आणि **तम्मूळ** अशीं **दक्षिण्यां**मध्येंही पांच राष्ट्रें आहेत. ज्यास गोमांस किंवा गांवडुकराचें मांस चालत नाहीं, तो **हिंदु**—असें साधारणपणें समजतात. पण गाईस आपल्या पोटांत जागा देणारे "महार" आणि गांवडुकरांची जठराग्नींत आहुति टाकणारे "वड्डर" हे **हिंदुच** असल्यामुळें, खाण्यापिण्यावर **हिंदुत्व** अवलंबून, नाहीं हें उघड आहे.

१७ **धर्म**—खाण्यापिण्यावर **हिंदु**धर्म अवलंबून नाहीं. **जैना**चा व **जंगमां**चाही **हिंदू**मध्यें समावेश होत असल्यामुळें, "वेद" हाच **हिंदु** धर्माचा एक पाया, दुसरा पाया नाहीं, असें ह्मणतां येत नाहीं. मूर्तिपूजा न करणारे **सिख** हेही **हिंदु** होत. तेव्हां देवाच्या संबंधानें ऐक्यबुद्धि व आस्तिक्यबुद्धि ठेवून, त्यास जे कोणत्या तरी प्रकारें शरण जातात आणि जशी अवतारांविषयीं तशी पैगंबरांविषयीं आणि आणि संतांविषयीं पूज्य बुद्धि ठेवतात, ते **हिंदु** ठरतात. "आपलें मात्र शास्त्र सगळें खरें असून, दुसऱ्याचें शास्त्र तितकें सगळें खोटें"—असें **ख्रिस्ती** व **मुसलमान** समजतात. **पार्शी** व **यहुदी** हेही असेच हटवादी आहेत. त्या त्या शास्त्रांत थोडा बहुत आचाराचा अंश मानवी असला, तरी तें रचणाऱ्या अवतारास, पैगंबरास किंवा संतास जो तात्विक अंश कळला त्यांत देवाचा हात निःसंशय होता, असें जो

समजतो, तो हिंदु. **यहुदी, ख्रिस्ती, पार्शी, मुसलमान,** हे जर दुराग्रह सोडतील तर **हिंदुच** झाले; मग ते आपणास **हिंदु** म्हणवोत किंवा मै म्हणवोत. अभंगांनीं **मराठी** भाषेचें सौभाग्य वाढविणारा **शेख महंमद** नांवाचा मुसलमान होऊन गेला, तो **विठोबा**चा प्रेमळ भक्त होता. **शेख महंमदा**चा मठ **चांभार गोंदें** मुक्कामीं आहे. जे वरेच मुसलमान या मठाच्या शिष्यमंडळींत आहेत, ते उघड **हिंदु** झाले आहेत.

**१८ आचारविचार—हिंदु**धर्माचा खाण्यापिण्याशीं मुळींच संबंध नसल्यामुळें, **हिंदूं**च्या आचारांमध्यें व विचारांमध्यें एकंदरींत ताळमेळ नसतो. तेणेंकरून जातीजातीचाही थांग लागेनासा होतो; आणि जसे **जैनां**प्रमाणें किंवा **जंगमां**प्रमाणें मांसमात्र वर्ज्य समजणारे, तसेच नुसते मत्स्य खाणारे व मत्स्यांशीं मांसाचीही सांगड घालणारे "ब्राह्मणा" सारख्या उंच जातींत उघड खपतात.

१ **भाषा—बंगाली** भाषा **इंग्रज** लोकांचा अंमल बंगाल्यांत बसल्या नंतर प्रौढ दशेस आली. **इंग्रजां**च्या पूर्वी लिहिलेले ग्रंथ सांपडणाऱ्या भाषा **हिंदुस्था**न्यांमध्यें तीनच आहेत—**ऊर्य, पंजाबी** आणि **हिंदी.** **ऊर्य** ही **उडिसा** प्रांताची भाषा. **ऊर्य** लोकांनीं पूर्वी एकदां नांव मिळविलें होतें. **पंजाबीं**त सिख लोकांचे धर्मग्रंथ आहेत. **हिंदी**स "व्रजभाषा" असेंही ह्मणतात. हींत मात्र पूर्वी ग्रंथ वरेच झाले. तरी **दाक्षिणी** भाषांमध्यें जसें आज मितीस जुनें सारस्वत आढळतें, तसें "व्रजभाषें"त आढळत नाहीं. **गुजराथी, मराठी, कानडी, तेलंगी** किंवा **तम्मूळ,** या पांच भाषा आज चांगल्या प्रौढ दशेस आलेल्या आहेत. यांतील सारस्वताचा विस्तारही वराच आहे.

१ येथील विद्यापीठाची स्थापना होण्याच्या पूर्वी मराठींत पुष्कळ कवी व अनेक बखरनीस होऊन गेले. जशी इतर दाक्षिणी भाषांच्या तशीच मराठी भाषेच्या-

ही इतिहासांत एक चमत्कारीक गोष्ट आहे ती ही कीं—ब्राह्मणेतरांनीं व ब्राह्मणांनीं मिळून त्या त्या देशी भाषेचें सौभाग्य वाढविलें आहे. मराठीचें सौभाग्य जसें नामदेवानें, चोख्यानें, तुकारामानें आणि शेख महंमदानें वाढविलें, तसेंच ज्ञानेश्वर, एकनाथ, श्रीधर यांच्यासारख्या ब्राम्हणांनीं वाढविलें. एकंदरींत आजपर्यंत हिंदुस्थानी ब्राम्हण जसे देशी भाषेची अवहेळणा करणारे झाले, तसे दक्षिणी ब्राह्मण नव्हते. दाक्षिणी ब्राह्मणांमध्येंही जितकें मराठी ब्राह्मणांचें देशी भाषेच्या सौभाग्याकडे व इतर जातींच्याही आध्यात्मिक उन्नतीकडे लक्ष पोंचलें होतें, तितकें दुसऱ्या दक्षिणी ब्राम्हणांचें पोंचलें नव्हतें.

२० **अलीकडील राज्यविभाग**——१—**इंग्रजी** अंमलांतला मुलुख २—राजे रजवाड्यांचा मुलुख. ३— **फिरंगी** अंमलांतला मुलुख. ४—**फ्रेंच** अंमलांतला मुलुख. ५—स्वतंत्र मुलुख.

१ **"इंग्रजी" अंमलांतला मुलुख**—दोन अव्वल इलाखे **मुंबई** आणि **मद्रास**; तीन दुय्यम इलाखे—**बंगाल, वायव्य, पंजाब**; तीन प्रांत—**मध्यप्रांत, वऱ्हाड, ब्रह्मदेश;** इतका **इंग्रजी** अंमलांतला मुलुख.

१ अव्वल इलाखाधिपतीस "गव्हर्नर" ह्मणतात. दुय्यम इलाखाधिपतीस "लेफटिनंट गव्हरनर" ह्मणतात. प्रांताधिपतीस "चीफ कामिशनर" ह्मणतात. बड्या इलाखाधिपतीस "गव्हरनर जनरल" ह्मणतात. बड्या इलाखाधिपतीची जागा कलकत्ता शहर. तेव्हां कलकत्ता ही आज हिंदुस्थानाची राजधानी. बंगालचा दुय्यम इलाखाधिपतीही कलकत्यासच असतो. अव्वल इलाख्यांच्या राजधान्या त्याच नांवांचीं शहरें आहेत. वायव्य इलाख्याची राजधानी प्रयाग किंवा अलाहाबाद; पंजाबची राजधानी लाहोर.

२ **राजेरजवाड्यांचा मुलुख**—राजेरजवाड्यांमध्यें सर्वांत मोठा **हैदराबाद**चा **निझाम**. कांहीं **महाराष्ट्रा**चा, कांहीं **कर्नाटका**चा, कांहीं **तेलंगणा**चा, असे तीन भाग मिळून हल्लींची **निझामशाही** झाली आहे. **मद्रास** इलाख्यांत **म्हैसुरचें**राज्य. **मुं-**

 सं. ३ ३६२

बई इलाख्यांत **कोल्हापूरचें** राज्य, **बडोद्याच्या गायकवाडाचें** राज्य आणि **कच्छचें** राज्य **कच्छची** राजधानी **भूज** शहर असून, राजास " राव "ह्मणतात. **माळव्यांत इंदुरच्या होळकराचें** राज्य व **ग्वाल्हेरच्या शिंद्याचें** राज्य. **राजपुतान्यांत जयपुर**करांचें, **मेवाडचें, मारवाडचें, जस्सलमीरचें** आणि **विकानीरचें** अशीं पांच राज्यें आहेत. **मेवाडची** राजधानी **उदेपूर. मारवाडची** राजधानी **जोधपूर भुतान** आणि **नेपाळ** या दोहोंमध्यें **सिकीमचें** राज्य; हें **वंगालच्या** उत्तरेस. **काश्मीरचें** राज्य वायव्य इलाख्यास वर लागून आहे. **काश्मीरची** राजधानी **जम्मू. पंजावांत कपरथळा, नाभा, चंवा** वगैरे मुलुख **सतलजच्या** पूर्वेस आहे, तो रजवाड्यांचा आहे. **काठेवाडांत भावनगर, गोंडल** वगैरे मुलुखही रजवाड्यांचा. **राजपुतान्यांत**ही रजवाडे वरेच आहेत.

३ **फिरंगी अंमलांतला मुलुख—गोवें** किंवा **गोमंतक** प्रांत— हा **मराठी कोकणाचा** अगदीं दक्षिणेकडील भाग. **दमण—सुरत** जिल्ह्यांत. **दीव** नांवाचें लहान बेट **काठेवाडच्या** किनाऱ्यापासून कांहीं अंतरावर.

४ **फ्रेंचांच्या अंमलांतला मुलुख—कलकत्त्या** जवळील **चंद्रनगर** व **मद्रासे** जवळील **पांदिचरी**, हीं ठाणीं बरींच प्रसिद्ध आहेत. हीं दुसरीं ठाणीं—"माही, कारिकल" आणि "यानन".

५ **स्वतंत्र मुलुख—नेपाळचें** राज्य—हें पहाडी असून याची राजधानी खटमांडू नांवाचें शहर. **भुतान**—हेंही राज्य स्वतंत्र आहे; याची राजधानी **तासेसुदन.**

# भाग २—

## ( राष्ट्रसंबंधीं प्राचीन माहिती. )

१ **"दक्षिणें" तील चार गाद्या.**—**शालिवाहनी** शकाच्या तेराव्या शतकांत चार राज्यें **दक्षिणें**त नांदतीं होतीं. **मराठी** राज्याची गादी **देवगिरी** किंवा **देवगड** ( **दौलताबाद** ) शहरीं होती. **तेलंगी राज्या**ची गादी **वरंगुळ** मुक्कामीं होती; आणि **कानडी** राज्याची गादी **म्हैसूर** प्रांतीं **हलवीडु** अथवा **धुरसमुद्र** या ठिकाणीं होती. **तम्मूळ** मंडळांतील कांहीं भागाचा **तेलंगी** मंडळांत आणि राहिलेल्या भागाचा **कानडी** मंडळांत मिलाफ झाला होता. तिन्हीही स्थळींच्या राजवंशी कुळीचें नांव **जाधव**. **गुजराथी** राज्याची गादी **अन्हिलवाडा पाटण** या शहरीं होती, आणि राजवंश **वाघेले** कुळींतील होता. **शालिवाहनी** शक व **इसवी** शक या दोहोंमध्यें ७८। वर्षांचें अंतर आहे. **इसवी** शकाचें १८९३ वें वर्ष हें शालिवाहनी शकाचें १८१५ वें होतें.

१ आपल्या पौषांत इसवी शकाच्या पहिल्या महिन्यास आरंभ होऊन, मार्गशीर्षांत इसवी शकाचा शेवटचा महिना येतो.

२ इसवी शकांत अधिक महिना नसल्यामुळें, त्यांतील महिने आपल्या महिन्यांशीं जुळत नाहींत. तशांत इसवी शकांत सौर मान असून, शा० शकांत चांद्र मान आहे.

२ **देशी गाद्यांच्या स्थापनेचा काळ**—**देवगिरी**च्या **मराठी** गादीची स्थापना **शा०** शके १११४च्या सुमारास **भिल्लम** अथवा **वल्लाळ** या नांवाच्या पुरुषानें केली. **वरंगुळ**ची **तेलंगी** गादी

आणि **हळेबीडूची कानडी** गादी या दोहोंचीही याच सुमारास स्थापना झाली. **अन्हिलपाटणची वाघेल्यांची** गादी या तिहींपेक्षां वयानें धाकटी होती.

१ भिल्लम व त्याचा मुलगा जयंतपाळ या दोघांचीही गादी जोगाईचें आंबें या ठिकाणीं होती. हें स्थळ निजामशाहींत असून त्यास मुसलमान लोक मोमिनाबाद म्हणतात. जयंतपाळाचा मुकुंदराज नांवाच्या मराठी कवीस आश्रय होता. मुकुंदराजचे "विवेकसिंधु" व "परमामृत" असे दोन परमार्थपर ग्रंथ आहेत.

जयंतपाळाचा मुलगा सिंघण आणि सिंघणचा नातू कन्हर. सिंघण शालि० शके ११३२ त गादीवर बसला; व कन्हर शालि० शके ११६९चे सुमारास गादीवर बसला. कन्हर शब्द संस्कृतांत "कृष्ण" लिहितात. कन्हरचा मुलगा जयंतपाळ हा कन्हरच्या पूर्वीं वारला.; आणि जयंतपाळाचा मुलगा रामचंद्र हा अज्ञान होता. म्हणून कन्हराचा दुसरा मुलगा महादेव हा गादीवर बसला--शालि० शके ११८२. हेमाडपंत हा महादेवाचा मुख्य प्रधान होता. हेमाडपंतानें मोडी लिपीची व बाजरीच्या लागवडीची महाराष्ट्र मंडळांत पहिल्यानेंच सुरवात केली. पुढें रामचंद्राच्या कारकीर्दीच्या आरंभीं हेमाडपंताकडेच मुख्य प्रधानकी होती. रामचंद्राची कारकीर्द शालि० शके ११९३त सुरु झाली. रामचंद्रास मुसलमान इतिहासकार रामदेवराव म्हणतात. निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ता या चार भावंडांनीं व नामदेव नांवाच्या शिष्यानें रामदेवरावाची कारकीर्द नांवाजली. ज्ञानदेवाची "ज्ञानेश्वर" या नांवानें प्रसिद्धी असून त्याचा "ज्ञानेश्वरी" ग्रंथ सर्वमान्य आहे. ज्ञानेश्वराचा काळ शालि० शके १२१२. रामदेवरावाचा चांगदेव नांवाचा भांडारी होता; त्यानें मुक्ताबाईचा उपदेश घेतला होता. शालि० शके १२२०च्या सुमारास देवगिरीची गादी मुसलमानांनीं बुडविली. रामदेवरावाच्या राज्याची वरची चतु:सीमा नर्मदा नदी असून खालची चतु:सीमा तुंगभद्रेच्याही दक्षिणेस गेली होती.

२ शालि० शकाच्या ९ व्या, १० व्या आणि ११ व्या शतकांत मानखेडचे आधव व कल्याणचे साळुंखे यांच्या लढाया चालू असत. मानखेडची गादी मराठी आणि कल्याणची गादी कानडी. हीं दोन्ही स्थळें हल्लीं निजाम-

शाहींत आहेत. मानखेडकरांच्या पूर्वी राठोडांचे व साळुंख्यांचे तंटे चाललेले असत. वेरूळचीं भव्य शैव लेणीं गोविंदराव राठोड नांवाचा पराक्रमी राजा मराठी मंडळांत शालि०च्या आठव्या शतकांत होऊन गेला, त्यानें कोरीवलीं. शालि वाहनाच्या ६ व्या शतकांत बदामीचे साळुंखे नांवाजले. ही गादी शालि०चे पांचव्या शतकांत राठोडांचे गांव जाळून स्वतंत्र झाली. सहाव्या शतकांच्या आरंभीं बदामीकर मराठी मंडळांत एकछत्री राजे होते. त्संग नांवाचा चिनई यात्रेकरू या काळीं हिंदुस्थानांत आला होता, तो या काळच्या बदामीकर पुळकेशीस महाराष्ट्र मंडळाचा राजा ह्मणतो; आणि मराठ्यांची शौर्याविषयीं व रणभूमीवरील काटकपणाविषयीं मोठी तारीफ करितो. हिंदुस्थान्यांचा हर्षवर्धन नांवाचा राजा मराठ्यांस नमविण्यासाठीं दक्षिणेकडे येत होता; त्याची आणि पुलकेशीच्या मराठ्यांची नर्मदेवर गांठ पडली. लढाई अरेतुरेची झाली आणि हर्षवर्धनास आपल्या हिंदुस्थान्यांनिशीं मराठ्यांस पाठ दाखविणें भाग पडलें. या पुळकेशीचा चुलता मांग साळुंखे शालि० ५ व्या शतकाच्या अखेरीस गादीवर होता, तेव्हां त्यानें बदामीचीं सुंदर वैष्णव लेणीं कोरविलीं.

३ शालिवाहन हें मुळचें वंशाचें नांव. या वंशाची राजधानी पैठण. ही नगरी गोदावरीचे तीरीं असून हल्लीं निझामशाहींत आहे. मगध देशावर चंद्रगुप्ताचें राज्य होतें, तेव्हांही पैठण मुकामीं शालिवाहनी वंश कायम होता. या वंशाचा विद्येस व विद्वानांस मोठा आश्रय होता. हर्ष विक्रमादित्य नांवाचा उज्जनीचा राजा होता, त्यानें सर्व हिंदुस्थान्यांवर आपला अंमल बसवून दक्षिणी लोकांवरही तो बसविण्यास यत्न केला. पण नर्मदेवर लढाई झाली तींत पैठणकरानें हर्ष विक्रमादित्याचा पुरा मोड केला; आणि तेव्हांपासून दक्षिणी लोक शालिवाहनाचा शक मोजूं लागले. "शककर्ता "ही मोठा विद्याव्यसनी दिसतो. "सप्तशती" नांवाचा एक ग्रंथ महाराष्ट्री भाषेंत "शककर्त्या"नें केला आहे. पैठणकरांच्या व बदामीकरांच्या अंमलांत महाराष्ट्र मंडळांत "महाराष्ट्री" भाषेची चलती होती. "महाराष्ट्री" पासून आजची मराठी निघाली आहे.

४ आठव्या शतकाच्या सुमारास कोंकणांत दोन शिलारांच्या गाद्या होत्या. एकीची राजधानी ठाण्याजवळ असून, दुसरीची खारेपाटणा जवळ होती.

रत्नागिरी जिल्ह्याचा कांहीं प्रांत कोल्हापुरकर किंवा कऱ्हाडकर शिलारांच्या ताब्यांत होता. या सुमारास किंवा एक शतक पुढें गोवें मुकामीं कदमाची गादी नांवाजूं लागली. ठाणेंकर, खारेपाटणकर, तसेच कोल्हापुरकर अथवा कऱ्हाडकर शिलार आणि गोवेंकर कदमही मांडलीक असून, प्रसंग पडेल त्याप्रमाणें; राठोडांस किंवा साळुंख्यांस 'करभार देणारे होते.

५ वाघेल्यांचे पूर्वी साळुंख्यांची सत्ता अण्हिलवाड्यावर होती कुमारपाळ नांवाचा साळुंखे झाला, त्याचा जैन धर्मास पुष्कळ आश्रय होता. या वंशांतील चामुंडराय नांवाचा दुसरा पुरुष गादीवर असतां गझनीच्या महमूदानें सोमनाथावर स्वारी केली. साळुंख्यांच्या गादीची स्थापना शालि० शकाच्या १० व्या शतकाच्या आरंभीं झाली. साळुंख्यांच्या पूर्वी गादी चावडे किंवा तावडे कुळीची होती.

६ तेलंगणाचे वल्हाठीकडील व खालाठीकडील असे दोन भाग आहेत. दोहोंच्या मध्यें महेंद्रगिरी आहे. वलाठीकडच्या भागास आन्ध्र व खालाठीकडच्या भागास कलिंग ह्मणत. शालि० शकाच्या पहिल्या तीन शतकांत आन्ध्र देशाच्या राजांचा अंमल मगध देशावरही बसला होता. कलिंग लोक पूर्वीचे नांवाजलेले दर्यावर्दी असून दर्याव्यापारीही होते; आणि त्यांच्या यवद्वीप वगैरे पूर्वे कडील द्वीपांत शालि० शकाच्या चौथ्या किंवा पांचव्या शतकापासून पुष्कळ वसाहती होऊं लागल्या.

७ तम्मूळ हे नांव मुळचें "मलय" शब्दा वरून आलेले दिसतें. मलय हे कलिंगांच्या पूर्वीचे नांवाजलेले दर्यावर्दी व दर्याव्यापारी. मद्रासे जवळील मलयपुर किंवा मैलापुर ही त्यांची मुळची राजधानी. हे लोक पूर्वेकडील द्वीपांमध्येंही बरेच पसरत गेले. मलाक्का हें द्वीपाचें नांव मलय लोकांवरून पडलें. मैलागिरी, मलबार, मल्याळ हीं नांवेंहीं मलय शब्दापासून निघालीं आहेत. ह्मैसूर प्रांतीं कांग किंवा गांग नांवाच्या कुळीचें राज्य शालि० शकाच्या ४ थ्या किंवा ५ व्या शतका पासून होतें. या प्रांतास पूर्वी चेर किंवा सेर ह्मणत. चेरांची राजधानी तालकट (तालिकोट) ही श्रीरंग पट्टणच्या पूर्वेस ६० मैलांवर कावेरी नदीच्या तीरीं होती. मलबाराचें केरल असेंही नांव होतें आणि केरलावर चेराधिपतीची सत्ता कायम झालेली होती.

८ याच सुमारास पालव कुळींचें राज्य कांची पुरींत होतें. कांची पुरी ज्या-प्रांताची राजधानी होती, त्या प्रांतास चोल किंवा द्रविड ह्मणत. अगदीं द-क्षिणेस पांड्य देश थेट कुमारी पर्यंत लागत गेलेला असून राजधानी मधुरा होती. पुढें चेर व पांड्य या दोन्हीं देशांचा चोल देशांत मिलाफ झाला. चोलांनीं सिंव्हल द्वीपावरही बराच अंमल बसविला होता. चोलांची पहिली राजधानी कुंभकोण; आणि नंतरची तंजावर. शालि० च्या १० व्या शतकाच्या अखेरीस विक्रम साळुंखे नांवाचा कल्याणचा राजा मोठा पराक्रमी झाला, त्यानें चोलास ११ व्या शतकांत बुडविलें.

**३ नर्मदेच्या उत्तरेकडील देशी गाद्याः**———हिंदुस्थान्यांवर मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊं लागल्या, तेव्हां **बंगाल, कनोज, काश्मीर, पंजाब, सिंध** आणि **माळवा** हीं सहा देशी राज्यें चांगलीं नादतीं होतीं.

१ अंग, वंग आणि मिथिला हे तीन बंगाल्यांतील प्रांत नांवाजलेले आ-हेत. अंग आणि मिथिला हीं नांवें संस्कृतांत पुष्कळ येतात. मिथिला प्रां-तास हल्लीं तिर्हुत म्हणतात. वंग शब्दावरून बंगाला हा शब्द निघाला आहे. भागीरथीच्या त्रिकोणाच्या पूर्वेकडील प्रांताचें वंग हें जुनें नांव. बंगाला प्रांतास व आंतील लोकांस गौड हा शब्द संस्कृतांत विशेष लाविला जातो. ज्यास हल्लीं विहार ह्मणतात, तो पूर्वींचा मगध देश. राजगृह ही मगध देशाची पहिली राजधानी. पुढें पाटणा राजधानी झाली. चंद्रगुप्त मोरे हा मगध देशा-चा राजा इसवी सनाचे पूर्वीं ३२० वे वर्षी किंवा त्या सुमारास गादीवर ब-सला. चंद्रगुप्ताचा काठेवाडावरही अंमल होता. चंद्रगुप्ताचा नातू अशोक याच्या राज्याची हद्द पश्चिमेस काबूलकंदाहारपर्यंत गेली होती. क-लिंगांतही अशोकाचा अंमल बसला होता. अशोकानें बौद्ध धर्मास ब-राच आश्रय दिला होता. जैन धर्माचा स्थापक महावीर हा मगध देशांत जन्मला. जैन धर्माचें मोठे मोठे ग्रंथ मागधी भाषेंत आहेत. बुद्धाचाही जन्म मगध देशांत झालेला समजतात. बौद्धांच्या धर्मग्रंथांच्या भाषेस पाली ह्मणतात. कांहीं शतकांनीं मगधावर आंधूरांचा अंमल बसला. हा शें-कडों वर्षे चालल्या नंतर गौड लोकांचें नांव ऐकूं येऊं लागलें. शालि० च्या १२ शतकांत मुसलमानांनीं बंगाल्यावर पहिली स्वारी केली, तेव्हां गादी-सेन कुळींची असून, राजधानी नदिया होती.

२ कनोजचें राज्य मुसलमानांनीं बुडविलें तेव्हां गादी राठोडांची होती. मगध देशावरून आंध्रांची सत्ता गेल्यावर, गौडांप्रमाणें कनोजीही नांवाजूं लागले. जशी गौडांची पूर्वीची देशी भाषा प्रसिद्ध नाहीं, तशी कनोज्यांचीही नाहीं. मागधी अंमलाचे पूर्वी या प्रांतीं एकच्छत्री अंमल शूरसेन कुळीचा असून, राजधानी मथुरा नगरी होती. शौरसेनी ही पूर्वीची देशी भाषा प्रसिद्ध आहे.

३ काश्मीरचें राज्य शालि० आठव्या शतकापासून बरेंच प्रसिद्ध होऊं लागलें. कल्हण कवीनें शालिवाहनाच्या ११ व्या शतकांत राजतरंगिणी नांवाचा काश्मीरचा इतिहास संस्कृत भाषेंत लिहिला आहे. हा इतिहास शालि०च्या आठव्या शतकापासून बराच विश्वास ठेवण्याजोगा आहे.

४ पंजाबी लोकांस पूर्वीच्या काळीं पिशाच ह्मणत. पिशाचांचा अंमल काबुल कंदाहारावरच नव्हे, तर बल्कबुखारावरही होता. काबुल, कंदाहार, बल्क, बुखारा हे अनुक्रमें कपिल, गंधार, बाल्हिक, पुष्कर या शब्दांचे अपभ्रंश. पिशाचांची पूर्वीची देशी भाषा पैशाची नांवानें नांवाजली आहे. इसवी शकाचे पूर्वी चवथ्या शतकांत शिकंदर बादशाहानें पंजाबावर स्वारी करून, पोरस नांवाच्या बलाढ्य राजाचा पूर्ण पराभव केला, अशा लेखी कथा युरोपांतील लोक सांगतात. शिकदराच्या पूर्वी पंजाबचा कांहीं भाग कांहीं वर्षे पार्स किंवा इराणी लोकांच्या ताब्यांत होता. शालि०च्या पांचव्या शतकाच्या अखेरीस हर्षवर्धन राजा झाला, त्याची राजधानी पंजाबांतील स्थानेश्वर होती. याची व मराठी पुलकेशीची नर्मदेवर लढाई झाली होती. मुसलमानांनीं पंजाबावर पहिल्यानें स्वारी केली, तेव्हां जयपाळ नांवाच्या राजाचें राज्य होतें.

५ जसा काश्मीरावर तसाच सिंधवर पूर्वीच्या काळीं पिशाचांचा अंमल होता. आरबांनीं इसवी शकाचे आठव्या शतकांत सिंधमधील देशी राज्य बुडवून टाकलें. पण पुनः ४० वर्षांच्या आंत सुमरे नांवाच्या कुळीनें जोर धरला, आणि सिंधमध्यें एक नवीनच देशी राज्य स्थापिलें. हें पुढें शेंकडों वर्षे चाललें.

६ शालि०च्या पहिल्या शतकांत व पहिल्या शतकाच्या पूर्वी विक्रम किंवा विक्रमादित्य नांवाच्या कुळीचें उज्जनी नगरींत राज्य असून, प्रांताचें नांव अवंति होतें. या कुळीचा मुळपुरुष विक्रमादित्य. याच्या नांवाचा शक चा-

लतो, त्यास "संवत्" ह्मणतात. संवतांत व शकांत १३५ वर्षांचें अंतर आहे. शककर्त्या शालिवाहनानें मोड केलेल्या हर्ष विक्रमादित्याच्या मुलाच्या राज्यांत गर्द नांवाच्या भिल्लानें उज्जनीची वाताहत केली. पुढें गर्दावर पिशाचांनीं स्वारी करून अवंति प्रांत व बरोबर काठेवाड प्रांतही कांहीं वर्षें बळकाविला. पुढें शालि०च्या ३ ऱ्या शतकांत गुप्त नांवाचे राजे झाले, त्यांनीं उज्जनीचें सौभाग्य पुनः वाढविलें. गुप्तांमध्यें समुद्रगुप्त व स्कंदगुप्त हे मोठे पराक्रमी झाले, आणि नर्मदेच्या उत्तरेस यांचा अंमल एकच्छत्री होता. स्कंदगुप्ताच्या पश्चात् काठेवाडांत वलभी येथें "सेनापती" होता, तो स्वतंत्र झाला. वलभीस हल्लीं वलेह ह्मणतात. अवंति हें नांव लोपून या काळाच्या पुढें माळवा हे नांव प्रसिद्ध झालेलें दिसतें. शालि० च्या १० शतकांत माळव्यांत पंवार कुळीचें राज्य होतें, व राजधानी धारानगरी होती. दहाव्या शतकांतील धारानगरीचा भोजराजा संस्कृत भाषेस उत्तेजन देणारा असून, एक कालिदास कवी त्याच्या दर्बारीं होता. हा कालिदास निराळा; आणि शाकुंतल नाटकाचा कालिदास निराळा. अवंति प्रांताची पूर्वीची देशी भाषा आवंत्य या नांवानें प्रसिद्ध आहे.

**संस्कृत भाषेंतील प्राचीन लेख सांगतात कीं, शौरसेनी भाषा संस्कृत आणि महाराष्ट्री या दोन भाषांपासून निघालेली असून, शौरसेनीपासून पैशाची व मागधी या दोन्ही भाषा निघाल्या आहेत. "पाली" भाषा हा मागधी भाषेचा पोट भेद असून, आवंत्य भाषा हा शौरसेनी भाषेचा पोटभेद होय.**

# भाग ३.

पूर्वार्ध—( धर्मसंबंधीं व समाजसंबंधीं प्राचीन माहिती. )

१ **"हिंदु" धर्माची घटना.—ब्राह्मणी** धर्म, **बौद्ध** धर्म, **जैन** धर्म, **"देशी"** धर्म, असे चार मुख्य धर्म मिळून **हिंदु** धर्म झाला आहे.

१ "ब्राह्मणी" धर्माचीं मुळचीं रूपें दोन—"कर्म"कांड आणि "ज्ञान"-कांड. "कर्म" कांड म्हणजे संध्या, वैश्वदेव आणि यज्ञयागादिक कर्मे. "ज्ञान" कांड ह्मणचे परमात्म्याचें ज्ञान करून घेउन त्याच्याच श्रवणांत, मननांत आणि निदध्यासांत दंग होउन जाणें. "कर्म" कांडाची पायरी खालची, आणि "ज्ञान" कांडाची वरची, हा ब्राह्मणी धर्माचा मुख्य सिद्धांत. ज्यास कर्मकांडाचा अधिकार असेल त्यानें कर्मे करावीं, ज्यास ज्ञानकांडाचा अधिकार असेल त्यानें "ज्ञान" मिळवून घेऊन त्यांत दंग असावें; अशी अधिकारभेदानें ब्राह्मणी धर्म व्यवस्था लावतो, तीच उत्तम. कर्मकांडाचें प्रतिपादन करणाऱ्या भागास "वेद" ह्मणतात, आणि ज्ञानकांडाचें प्रतिपादन करणाऱ्या भागास "वेदांत"= वेदाचा शेवटचा ह्मणजे उत्कृष्ट भाग, ह्मणतात.

बूराह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे चार वर्ण कल्पून कर्मकांडी आपल्या लोकांचे विभाग करतात. शिकविणारा वर्ण ब्राह्मण, लढणारा वर्ण क्षत्रिय, व्यापाराचा किंवा शेतकीचा किंवा गुरें राखण्याचा धंदा करणारा वर्ण वैश्य, घरांतील स्वैंपाक्याचा किंवा पाणी भरण्याचा किंवा असलाच दुसरा धंदा करणारा वर्ण शूद्र, अशीं चार वर्णाचीं लक्षणें "वैदिक" धर्मांत केलीं आहेत.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, या तीन वर्णास पूर्वी "द्विज" ह्मणत; कारण त्यांची मुंज होत असे. ज्यांची मुंज होत असे, त्यांस "आर्य" शब्दही लावण्यांत येई. "हिमालय" व "विंध्य" या दोन पर्वतांमधील मुलुखास "आर्यावर्त" म्हणत. "आवर्त"=मूळ ठिकाण. "सरस्वती" व "दृषद्वती" नांवाच्या दोन नद्या "अंबाल्या" च्या दक्षिणेस आहेत, त्यांच्यामधील पट्टीस "ब्रह्मावर्त" म्हणत. "ब्रह्म" = ब्राह्मण. "बूरह्मावर्त" ही पट्टी "कुरुक्षेत्रां"त होती. वैदिक धर्मांत "सरस्वती" नदी आणि "कुरुक्षेत्र" हीं दोन स्थळें फार वाखाणिलीं आहेत.

जो वैदिक धर्माचा ह्मणजे "आर्य" नव्हे, त्यास कर्मकांडी बूराह्मण "व्रात्य" किंवा "अनार्य" शब्द लावीत; आणि तो श्रीमंत किंवा मोठा झुंजणारा अगर विद्यावंत असल्यास "व्रात्यस्तोम" नांवाचा यज्ञ करून त्यास वैश्यांमध्यें, क्षत्रियांमध्यें, किंवा बूराम्हणांमध्यें योग्यतेप्रमाणें ढकलीत. तीन वर्णाचा जसा रोटीचा तसाच बेटीचा व्यवहार होण्यास कर्मकां-

ही ब्राह्मणी धर्माची आडकाठी नव्हती. प्रसंगीं शूद्राशींही बेटीच्या व्यवहाराची परवानगी होती. परशुरामाची आई क्षत्रिय वर्णाची होती आणि क्षत्रिय " ययाती " ची एक बायको बूराह्मणाची मुलगी असून दुसरी बायको चारी वर्णांची हेळणा करणाऱ्या " असुरां " च्या राजाची मुलगी होती. उंटाचें मांस, मत्स्य वगैरे पदार्थ कर्मकांडी बूराह्मण पूर्वी अभक्ष्य मानीत ; तरी बकरा, कांसव, वगैरे प्राण्यांचें मांस भक्ष्य समजत. कोणतेंही मांस कर्मकांडी बूराह्मणानें खातां कामा नये असा पूर्वी निर्बंध नव्हता ; भक्ष्य मांस खाण्यास आडकाठी नव्हती. अभक्ष्य मांस खाल्लयास मात्र "पतित" = भ्रष्ट झालेला, समजत. जसे मांसाचे भक्ष्य आणि अमक्ष्य असे विभाग कर्मकांडी बूराह्मणांनीं पूर्वी केले होते, तसे कंदमुळांचेही केले होते. कांदा आणि लसूण चुकूनही खाल्लयास पतित समजत आणि त्यामुळें पुन: मुंज करावी लागे.

वेदांत्यांच्या मतें जो परमात्म्याचें ज्ञान मिळविण्यास यत्न करतो, तो वर्णानें कोणी असला तरी बूराह्मण होऊन सर्व प्रकारें व्यवहार्य होतो.

२ "बौद्ध" धर्माचा स्थापक "बुद्ध" हा "मगध" देशांत "चंद्रगुप्ता" चे पूर्वी सुमारें दोनशें वर्षे "बिंबसार" नांवाच्या राजाचें राज्य असतां जन्मला, असें "बौद्ध" म्हणतात. "बुध्दा" ची कुळी "शकां" मधील होती, म्हणून "बुध्दा" स "शाक्य" असेंही म्हणतात. "शक" लोक हे "पिशाचां" च्या पोट भेदां पैकीं होते. "बौध्द" वेदास किंवा वेदांताला मानीत नाहींत. मानवी प्राणी अनेक जन्म घेउन व ब्रह्मचर्यादिक गुण स्वीकारून सुधारतां सुधारतां अखेरीस सर्वज्ञ होऊं शकतो, हा "बौध्दां" चा मुख्य सिध्दांत. पिंपळाच्या झाडाखालीं बुध्दास" सर्वज्ञत्व आलें, म्हणून "बौध्द" पिंपळ पूज्य मानतात. "बौध्द" धर्म हल्लीं पृथ्वीच्या पाठीवर फारच पसरला आहे. चीनच्या अफाट बादशाहातींत याच धर्माचा अंमल आहे. पूर्वीच्या काळांत "हिंदुस्थानां "तही या धर्माचा अंमल पुष्कळ होता. पण हल्लीं नेपाळ , सिकीम, भुतान, बूह्मदेश या चार प्रांतांस सोडून हिंदुस्थानांत तो इतर ठिकाणीं आढळत नाहीं.

२ "जैन" धर्माचा स्थापक "महावीर" हा चंद्रगुप्ताच्या पूर्वी कांहीं वर्षे "नंदीवर्धन" राजाची कारकीर्द असतां "मगध" देशांत जन्मला. जितकें "जैनां" चें लक्ष अहिंसेकडे असतें, तितकें "बौध्दां "चें नसतें. "जैन" मात्रानें मांस, मत्स्य आणि मद्य या तीन मकारांचा त्याग केलेला अ-

सतो. "बौध्दां" स मांस व मत्स्य हे दोन मकार उघड चालतात. अन्हिलवाड्या" चा "कुमारपाळ" नांवाचा राजा झाला, त्याचा "जैन" धर्मास बराच आश्रय मिळाला. "शत्रुंजय" हें जैनांचें प्रसिध्द तीर्थ "पालिटाण्या" जवळ असून, "गिर्नार" नांवाचा पवित्र डोंगर "जुनागडा"—जवळ आहे. दोन्हीं ठिकाणचीं देवळें पाहण्यासारखीं आहेत. "राजपुतान्यां"त आणि "बंगाल्यां"त जैनांची वस्ती बरीच आहे. "दक्षिणें" त "जैनां" ची वस्ती पूर्वी पुष्कळ होती; पण हल्लीं ती सांगण्यासारखी नाहीं. "कानडी मंडळां"त "जैनां" च्या ऐवजीं "जंगमां"ची वस्ती बरीच आहे. "जंगम" धर्माचा स्थापक "बसव" हा महात्मा, शालि० च्या बाराव्या शतकांत "कल्याण" चें राज्य कांहीं वर्षें बळकाविणाऱ्या "बिज्जल" सेनापतीच्या कारकीर्दींत झाला.

४ सज्जनांचें पाळण करून दुर्जनांस दंड करण्याच्या हेतूनें देव अजन्मा असतांही, जन्मतो, हें "देशी" धर्माचें एक मुख्य तत्व. कधीं कधीं देव स्वत: अवतार न घेतां एखाद्या संतास किंवा पैगंबरास जन्मूं लावतो, हे "देशी" धर्माचें दुसरें मुख्य तत्व. देवाकडे भक्त व अभक्त एवढाच पक्षपात असून जातीची किंवा कुळाची किंवा पैशाची मातब्बरी बिलकूल नसते, हें "देशी" धर्माचें तिसरें मुख्य तत्व. या तीन मुख्य तत्वांमध्यें "देशी" धर्म संपला. "देशी" धर्माचा मुख्य पाया "भगवद्गीता". ही साक्षात् श्रीकृष्णा" नें "अर्जुना"स "भारती" युद्धाचे प्रसंगीं अहिंसेचा उत्पन्न झालेला भ्रम घालविण्याचे हेतूनें उपदेशिली; आणि प्रसंगीं हिंसेंत बिलकूल पाप नाहीं, हें मुख्य तत्व अर्जुनाच्या मनावर पूर्णपणें बिंबविलें. हेंच तत्व "ज्ञानेश्वरीं" त आपल्या प्रासादिक सरस्वतीनें "ज्ञानेश्वर" मराठी मंडळास कळवीत आहेत.

२ **"हिंदु" धर्माचा पाया**—आजच्या **हिंदु** धर्माची जी भव्य इमारत डोळ्यांपुढें उभी आहे, तिचा **देशी** धर्म हा मजबुत व अचळ पाया होय. ह्मणून **चोख्या** सारख्या महारास व **कबीरा**सारख्या मुसलमानासही **मोरोपंता**सारखे ब्राह्मण कवी उघड नमस्कार

करण्यास किंवा शरण जाण्यास शरमत नाहींत. या देशी धर्मांचा प्रसार **ज्ञानेश्वरांच्या** पश्चात् शें दीडशें वर्षांनीं " राम हो या रहीम हो " हा महामंत्र जपणाऱ्या **कबीर** नांवाच्या महात्म्यानें **हिंदुस्थान्यां**मध्यें केला. तोच मंत्र **नानकनें** पुनः **पंजाबा**मध्यें जपून, ब्राह्मणधर्मी व मुसलमान या दोहोंचा मिलाफ केला आणि " सिख " संप्रदायाची स्थापना केली. **कबीर** मुसलमान होता व **नानक** क्षत्रिय होता. **महाराष्ट्र मंडळांत** ब्राह्मणांनींही ब्राह्मणेतराच्या पायां पडण्याचा अभिनंदनीय संप्रदाय **नामदेवाचे** पांयीं पडून पहिल्यानें **ज्ञानेश्वरांनींच** घातला.

## उत्तरार्ध—( मुसलमानी धर्म व ख्रिस्ती धर्म. )

**१—मुसलमानी धर्माची स्थापना आणि प्रसार—आरबस्थानांत मक्का** नगरीमध्यें **इसवी** शकाच्या ७ व्या शतकांत **महंमद** नांवाचा महात्मा जन्मला. या **महंमदानें** मुसलमानी धर्म स्थापिला. हा पैगंबर होता. " पैगंबर "=( देवापासून ) निरोप आणणारा. आपण **मराठींत** ज्यांस " संत " ह्मणतों त्यांस **फारसी** भाषेत " पैगंबर" ह्मणतात. **महंमदाच्या** सरस्वतीस मुसलमान " कुराण " ह्मणतात व ती मोठी प्रासादिक समजतात. ( देवास ) " सर्वस्वीं शरण गेलेला"—असा " मुसलमान " शद्बाचा मुळचा अर्थ आहे. **महंमदाच्या** हयातींत सगळ्या **आरबांनीं** मुसलमानी धर्म स्वीकारला. **महंमदाच्या** पश्चात् ज्यांच्या हातीं मुसलमानांची सगळी सत्ता आली, त्यांस " खलीफ " ह्मणत. **महंमदाचा अल्ली** नांवाचा जांवई होता, तोही पुढें " खलीफ " झाला; त्यामुळें एकमेकास पाण्यांत पाहाणारे असे दोन मोठे तट मुसलमानांमध्यें पडले. **अल्ली** मात्र खरा " खलीफ " असें ह्मणणारांस " शियो " ह्मणतात. दुसरे " खलीफ " झाले त्यांस मुख्यत्वेंकरून

मानणाऱ्या मुसलमानांस " सुन्नी " ह्मणतात. **आरब, तुर्क** व **पठाण** हे " सुन्नी " असून, **इराणी** किंवा **फारसी** आणि **मोगल** हे " शिया " होत. **महंमदाच्या** पश्चात् जरी याप्रमाणें घरफूट लवकरच लागली, तरी मुसलमानी अंमलाचा व अंमलाबरोबर सहजच धर्माचाही पटापट प्रसार होत गेला.

१ " खलीफां " ची " बगदाद " ची गादी पूर्वी एके काळीं फारच प्रसिद्ध झाली होती. या गादीची समाप्ति " हुलाकु " नांवाच्या " मोंगला "नें केली. " बेकाल " सरोवराच्या आसमतात् जो मुलुख आहे तो " मोगलां "चें मूळ ठिकाण. " मोंगल " हे मुळचे मूर्तिपूजक लोक. प्रत्येक " मोंगला" च्या घरीं देवदेव्हारा असून, रोज नैवेद्यवैश्वदेवाचा संप्रदाय होता. इतकेंच कीं नैवेद्यवैश्वदेव मांसाचा होत असे, कारण मोंगलांचे मुख्य खाणें मांस होतें. " चिंगिस " नांवाचा महापराक्रमी बादशाहा झाला त्यानें " मोलांस जिकडे तिकडे पसरलें. सर्व धर्म सारखे लेखून प्रत्येक धर्मास आश्रय देण्याचा संप्रदाय " आशिया " खंडांत, याच मूर्तिपूजक मोंगलानें पहिल्यानें घातला. " चिंगिस "चा " कुबल्या " नांवाचा एक नातू " चीन " चा बादशहा झाला. आणि हुलाकू नांवाचा दुसरा नातू " खलीफां "ची गादी बुडवून त्यांच्या मुलखाचा बादशहा झाला. पुढें हळू हळू मोगलस्थानांतील " मोंगलां" चा " बौद्धां "मध्यें व " मोंगलस्थाना " बाहेरील " मोंगलां " चा मुसलमानांच्या " शीया " तटामध्यें मिलाफ होत गेला.

" बल्कबुखारा " प्रांतास लागून वरच्या व डावे बाजूस " अल्ताई " पर्वताच्या पश्चिमेस " तुर्कावर्त " आहे. " युरोपखंडां " तील व " आशियाखंडां " तील " तुर्कस्थान " हें नांव "तुर्कां "नीं काबीज केल्यामुळेंच मुलुखास मिळालें आहे. " तुर्कस्थानां"त हल्लीं " तुर्कां " चाच अंमल आहे. " तुर्क " लोक मुसलमान होण्याच्या पूर्वीही शौर्यासाठीं नांवाजले होते. " महंमदाच्या पश्चात् लौकरच यांच्यामध्यें मुसलमानी धर्माचा प्रसार होण्यास सुरवात झाली. " खलीफां " शीं " तुर्क " अनेक वर्षे झुंजले. जे " तुर्क " कैद होत त्यांचा गुलामांच्या नात्यानें " खलीफां " च्या राज्यांत प्रवेश होई

आणि ते लौकरच मुसलमान होत. अशा रीतीनें "तुर्की" ची मंडळी वाढत गेली; आणि कांहीं वर्षांनीं खलीफांचें बाहुलें होऊन आपल्या शौर्यानें हळू हळू सरदारकी मिळविलेल्या "तुर्क" गुलामांनीं सगळी राजसत्ता आंतून बळकाविली. "हुलाक्" नें "खलीफा"च्या राज्याची समाप्ति केली तेव्हां व शेंकडो वर्षें त्यापूर्वी "खलीफ" नांवाचे सत्ताधारी असून, "तुर्क" सरदारांचे हातीं सत्तेचें सगळें सूत्र असे.

**२—मुसलमानी धर्माचीं मुख्य तत्त्वें**—देव एक असून तो परम कारुणिक आहे आणि लोकांचा उद्धार करण्यासाठीं त्या त्या काळीं पैगंबर जन्मावे अशी देवानें व्यवस्था लावून ठेविली आहे; जे अनन्यभावें देवास शरण जातात, त्यांचा अव्हेर तो कधींही करीत नाहीं; देवास निष्काम भक्ति अतिशय आवडते; हीं मुसलमानी धर्माचीं मुख्य तत्त्वें. देवाचा पूर्णावतार शक्य नाहीं, हा मुसलमानी धर्माचा एक मोठा सिद्धांत. जो कोणी मूर्ति ही देवाची पूर्णपणें प्रतिमा समजतो, तो "कुराणा" प्रमाणें प्रतिमापूजक व नरकाचा अधिकारी होतो. देवाशीं तुळितां येईल असा दुसरा कोणी चेतन नाहीं, अर्थात् देव अद्वितीय आहे, हा मुसलमानी धर्माचा दुसरा मोठा सिद्धांत.

१ अमुक रूप डोळ्यांपुढें दिसलें ह्मणजे देवाच्या त्या त्या गुणाची आठवण होते, असें "हिंदु" ह्मणतात. पाषाणाच्या मूर्तींत सगळें ऐश्वर्य भरलें आहे, असें कोणीही "हिंदु" ह्मणत नाहीं.

**३—"ख्रिस्ती धर्माची स्थापना व प्रसार**—ख्रिस्ती शक **ख्रिस्ता**च्या जन्मापासून सुरू झालेला समजतात. **ख्रिस्त** या महात्म्याचा जन्म **पालिस्तन** नांवाच्या प्रांतीं **बेथलहेम** नांवाच्या गांवीं झाला. हा महात्मा जातीचा **यहुदी. यहुदी** लोक हे झाल्या मोठे कर्मठ, कर्मठपणा पणा जाऊन **यहुदी** लोकांचें लक्ष देवाकडे

पांचावें ह्मणून **ख्रिस्तानें** पुष्कळ श्रम केलें. पण अखेरीस बंडखोराचा आरोप कपाळीं येऊन **ख्रिस्तास** देहान्त शिक्षेची सजा झाली. **ख्रिस्ती** शकाच्या ४ व्या शतकांत **कुस्तुंतैन** नांवाचा **रूम** नगरीचा बादशहा झाला, त्यानें **ख्रिस्ती** धर्म स्वीकारिला. तेव्हांपासून राजाश्रय मिळाला, आणि तेणें करून **ख्रिस्ती** धर्मास **रूमी** पादशाहातींत पसरण्यास सवड सांपडली. पुढें लौकरच **ख्रिस्ती** धर्मांत दोन तट झाले—एक **रूमचा** व दुसरा **कुस्तुनतिनियाचा. रूमचा** तट संस्कारांत "लातिन" नांवाची मृत भाषा वापरी. भाषांवरून "लातिन" तट व "ग्रीक" तट अशीं कधीं कधीं ही नांवें देण्यांत येतात. **ख्रिस्ती** शकाच्या १६ व्या शतकांत देशी भाषा संस्कारांतही वापरणारे वरेच पंथ निघाले आणि अनेक निमित्तांनीं **रूमच्या** तटापासून वेगळे झाले. या सर्वांस "सुधारकांचे पंथ" असा शब्द लावण्यांत येतो. **रूमच्या** तटाच्या देवळांत चित्रें किंवा पुतळे ठेवलेले असतात आणि मेणबत्त्या जळत असतात. असला प्रकार "सुधारकांच्या पंथां"च्यीं देवळें असतात त्यांत आढळणें नाहीं. ज्यांस आपण **किरिस्ताव** किंवा **फिरंगी** किंवा **पुर्तुगीज** ह्मणतों ते **रूमच्या** तटांतील असतात. **फ्रेंच** लोकही **रूमच्या** तटामधील होत. **इंग्रज** लोक "सुधारकांच्या पंथां" मधील समजावे. **युरोपखंडांत रूस** लोक मात्र **कुस्तुनतिनियाच्या** तटांतील आहेत. या तिन्ही तटांचा एकमेकाशीं वैरभाव पुष्कळ असतो.

४ **"ख्रिस्ती" धर्मांचें मुख्य तत्व—ख्रिस्ती** लोकांचें एक मुख्य ह्मणणें हें कीं, **ख्रिस्त** हा देवाचा पूर्णावतार; दुसरा पूर्णावतार पूर्वी झाला नाहीं व पुढें होणार नाहीं.

५ **"हिंदु" धर्म आणि "मुसलमानी किंवा "ख्रिस्ती" धर्म—हिंदु** धर्म पूर्व जन्म मानतो; आणि प्रत्येकाचें पूर्व जन्मींचें

पुण्य पाप असतें, त्याप्रमाणें त्यास या जन्मीं फळ मिळतें, असें समजतो. ह्मणून ज्याच्या त्याच्या पुण्यपापाची जबाबदारी ज्याच्या त्याच्या डोक्यावर राहून, देवाकडे कोणत्याही प्रकारचें वैषम्य येत नाहीं. सृष्टि सादि समजून तिच्या कर्तृत्वाचा आरोप करण्यांत येतो, ह्मणून देवावर वैषम्य लादल्याशिवाय खिरस्ती व मुसल्मानी या दोन्ही धर्मास गती नाहीं. सृष्टि अनादि समजून कर्तृत्वाचा आरोप आणण्याच्या भानगडींत मुळींच पडत नाहीं, ह्मणून देवावर वैषम्य लादण्याचा प्रसंग हिंदु धर्मास येत नाहीं.

# हिंदुस्थानाचा छोटा इतिहास.

## खंड २—( मुसलमानी अंमल. )

## भाग १—( नर्मदेच्या उत्तरेकडील धूळधाणी. )

## प्रकरण १—[ गजनीचेमुलतान. ]

( इसवी शके ९७७ पासून ११८६ पावेतो. )

१ **सवक्तगीन—गजनी**च्या सुलतानांच्या मुळपुरुषाचें नांव सवक्तगीन. हा जातीचा तुर्क. **लाहोर**चा **जयपाळ** नांवाचा राजा होता, त्याच्याशीं **गजनी**ची सुभेदारी मिळतांच **सवक्तगीना**चा तंटा जुंपला. **जयपाळ** व **पंजाबी** कमी झुंजणारे होते असें नाहीं. पण या इ० श-

तकापासून अनेक निमित्तांनीं हिंदूंचा मोड होण्यास आरंभ झाला. **सिंधु** नदीच्या पलीकडील **जयपाळा**चा मुलुख सर करून तो **सबक्त-गानें** आपल्या मुलुखास जोडला व **पिशावरीं** आपलें ठाणें ठेवलें. इ० शके ९९६ त **सबक्तगीन** वारला.

१ सबक्तगीनाची पूर्व पीठिका. इसवी शके ८९५ या वर्षी इस्मायल समानी या नांवाचा सरदार बगदादच्या खलीफांशीं भांडून स्वतंत्र झाला आणि त्यानें बुखारा राजधानी केली. पुढें मनसूर नांवाच्या समानी वंशांतील सुलतानानें अलप्तगीन नांवाचा एक तुर्की गुलाम होता, त्यास खुरासानची सुभेदारी दिली. अलप्तगीन इ० शके ९७५ त वारला. नंतर अलप्तगीनाचा मुलगा इशाक यास खुरासानच्या सुभेदारीचीं वस्त्रें सुलतानाकडून मिळालीं आणि अलप्तगीनाचा सबक्तगीन नांवाचा तुर्की गुलाम होता, त्यास इशाकच्या दिवाणगिरीचीं वस्त्रें मिळालीं. पुढें लौकरच दोघांची गजनी मुक्कामीं नेमणूक करण्यांत आली. लौकरच इ० शके ९७७ त इशाक वारला. तेव्हां सुभेदारी सबक्तगीनास मिळाली. पुढें लौकरच सबक्तगीनानें अलप्तगीनाच्या मुलीशीं लग्न लाविलें.

२ **महमूद** ( ९९६—१०३० ) **गजनी**करांमध्यें याच्या सारखा पराक्रमी सुलतान दुसरा झाला नाहीं. हा मोठा शूर होता. पण **हिंदूंस** बाटविण्याचें किंवा बुडविण्याचें व्यसन यास अतिशय लागलेलें होतें. यास लोभही मनस्वी असून, कवडी द्यावी लागल्यास याचा जीव घुटमळूं लागे. यानें **हिंदुस्थाना**वर व **सोमनाथा**वर मिळून १२ स्वाऱ्या केल्या. पहिल्या स्वारींत **पिशावरा**जवळ यानें **जयपाळा**चा मोड केला. तेव्हां आपला मुलगा **अनंगपाळ** यास गादीवर बसवून, **जयपाळानें** स्वतः अग्निकाष्ठें भक्षण केलीं. चवथ्या स्वारींत यानें **नगरकोट** नांवाची पैशानें भरलेली पेंठ आंतील देवळांसुद्धां लुटून फन्ना केली. पांचव्या स्वारींत यानें **मुलतान** घेतलें आणि लुटलें. साहव्या स्वारींत यानें **स्थानेश्वरा**ची लुटून धूळधाणी

केली. याची सातवी स्वारी **काश्मीरा**वर होती. यानें नववी स्वारी एकाएकीं **कनोजवर** केली. तव्हां तयारी नव्हती ह्मणून **कनोजक**रानें पुष्कळ पैसा दिला. नंतर **मथुरा** लुटून व देवळें फोडून, **महमूद** आपल्या मुलखाकडे वळला. इसवी १०२४ त दहाव्या स्वारींत **अनंगपाळास** बुडवून **पंजाब** प्रांत **महमूदाने** आपल्या सुल्तानतीस जोडला. याची बारावी स्वारी **सोरटी सोमनाथावर** झाली. **गुजराथ्यां**नीं आपली शर्थ केली. पण मुसलमानांनीं गाय व बैल बरोबर आणिले होते, त्यांचा आश्रय करून लढाई चालवली. **हिंदूं**चे हत्यार गाईंवर व बैलांवर चालेना आणि त्यामुळें त्यांचा मोठा मोड झाला. अशा प्रकारचे कावे या काळीं व या काळाच्या पुढें पुष्कळ प्रसंगीं मुसलमानांनीं केले आणि **हिंदू** असलीं कर्मे शिकले नव्हते, ह्मणून त्या त्या प्रसंगीं **हिंदूं**स हार येत गेली.

३ **महमूदाचे वंशज**—शेवटचा वंशज **बहिराम**. यानें **कुतुबुद्दीन घोरी** नांवाच्या सरदारास हाल हाल करून मारिलें. **कुतुबुद्दीना**च्या भावाचें नांव **अल्लाउद्दीन**. **अल्लाउद्दीनानें** सूड घेण्याचा निश्चय केला. स्वारी करून **गजनीस** **अल्लाउद्दीनानें** आग लावली आणि **गजनी**करांची कत्तल केली. अर्थातच **बहिरामानें** पोबारा केले. **गजनी** आणि **हिरात** या दोहोंच्या दरम्यान **घोर** किंवा **गव्हर** नांवाचा डोंगराळ महाल **हिंदुकुश** पर्वतास लागून आहे. या महालांतील असल्यामुळें **कुतुबुद्दीना**स व त्याच्या गोतास **घोरी** किंवा **गव्हरी** ह्मणत. **अल्लाउद्दीनाच्या** पाठीं त्याचा मुलगा **ग्यासुद्दीन** यानें आपला मुळचा **घोर** महाल मात्र ठेविला आणि **गजनी** प्रांत आपला भाऊ **शहाबुद्दीन** यास दिला. **शहाबुद्दीना**सच इतिहासांत **महंमद घोरी** ह्मटलेलें असतें.

# प्रकरण दुसरें—[ घोरी अफगाण. ]

[ इसवी शके ११८६ पासून १२०६ पावेतों. ]

१ **महंमद घोरी**( ११८६—१२०६) **बहिरामा**च्या भावापासून **महंमद घोरीनें लाहोर** घेतलें आणि **गजनी**कर **तुर्की** राजवंशाची समाप्ती केली. ११८९त **महंमदानें दिल्लीच्या पृथुराजा**वर स्वारी केली. लढाई ११९१ त **स्थानेश्वरा** जवळ झाली. **हिंदूंनीं** भर समरांगणांत मस्ती जिरविल्यामुळें आपल्या मुसलमानांसहित **महंमद घोरीस** पाठ दाखवून पळत सुटण्याशिवाय मार्ग राहिला नाहीं. हा खऱ्या वीर पुरुषास लाजिरवाणा मार्ग अखेरीस पत्करला आणि **महंमद घोरी** आपल्या मुलुखांत घुसला. नंतर लौकरच **महंमदानें** वड्याचें तेल वांग्यावर काढिलें आणि आपल्या सरदारांची झालेल्या मोडाबद्दल **गजनीं**तून धिंड काढण्याचा हुकूम फर्माविला. तरी **महंमदा**ची **हिंदूंशीं** सामना करायाची छाती होईना; कारण **पृथुराजानें** एकदा सोडून आठदा भररणांत दांतीं तृण धरवून **महंमद घोरीस** जीवदान दिलें होतें. त्यामुळें **सोमनाथी** कावा करण्याची आणि सुचेल तो दगा प्रसंगाप्रमाणें चालवण्याची मसलत **महंमद घोरीनें** आपल्या लश्करास देऊन ठेविली. **अफगाण** ह्मटले ह्मणजे उपजत दगलबाज, अशी इतिहासांत प्रसिद्धि आहे. त्या उपजत दगलबाजपणांत भररणांत आठदां फजीती झालेल्या **महंमद घोरीनें** आणखीं भर टाकली. **हिंदु** जात्या दगलबाज नव्हत. **पृथुराजा**ची आणि त्याच्या रजपुतांची उजू लढण्याविषयीं ख्याति. तेव्हां ११९३ तल्या **स्थानेश्वरा**च्या दुसऱ्या लढाईत **हिंदूंचा** पुरा मोड होऊन **पृथुराज महंमद घोरी**च्या हातीं लागला. ज्यानें एकदा सोडून आठदा थोर दिल करून सोडून दिलें, त्यास आलेल्या एकाच प्रसंगीं सोडून देऊन

मुसलमानही थोर दिलाचे असतात हें दाखवणें **महंमद घोरी**च्या हातून झालें नाहीं आणि **पृथुराजा**च्या कपाळीं कैद आली !!! लौकरच **अजमीर** प्रांत आपल्या मुलुखास जोडून सुभेदारी **कुतुबुद्दीन** नांवाच्या गुलामास दिली आणि **महंमद घोरी** जशी काव्यानें तशीच दगलबाजपणानें मिळविलेली उमाप लूट घेऊन आपल्या मुलुखीं गेला. पळून जाऊं नये ह्मणून डोळे काढून **पृथुराजास महंमद घोरी**नें आंधळें केलें आणि अंधार कोठडींत टाकलें !!! **कुतुबुद्दीना**-नें धन्याच्या पश्चात् लौकरच **मीरत** आणि **दिल्ली** सर करून एक **हिंदु** राज्य साफ बुडविलें. दुसरे वर्षीं फिरून **महंमद घोरी** आला. या वर्षीं राजा **जयचंद्र राठोड** चंद्रावरच्या लढाईंत ठार होऊन, **कनोज** प्रांतही **महंमद घोरीच्या** सुल्तानतींत सामील झाला. १२०३ मध्यें **बखत्यार खिलजी** नांवाच्या सरदारानें **बिहार** नांवाची राजधानी लुटून फन्ना केली आणि **मगध** प्रांत खालसा केला. हीच दुर्दशा **बंगाल्याची** थोड्या काळांत **बखत्यार खिलजीने** केली. मुसलमान जिकडे जात, तिकडे **हिंदूंस** बाटवून मूर्ती फोडीत आणि देवळांवर मशिदी उठवीत. याप्रमाणें मुसलमानांची संख्या वाढत जाऊन **यमुना** आणि **भागीरथी** या दोन्ही नद्यांच्या तीरांवर टोलेजंग मशिदी उभारल्या गेल्या. १२०६ त **महंमद घोरी**चा खून झाला. हा खून **महंमद घोरी** तंबूंत निजलेला असतां **गक्कर** नांवाच्या **पंजाबी हिंदूंनीं** केला असें मुसलमान ह्मणतात. पण, **हिंदू** कथा सांगतात ती अगदीं निराळी आहे. शद्बवेधी होता ही गोष्ट ऐकलेली असल्यामुळें **महंमद घोरीनें** आंधळा केलेल्या **पृथुराजास** एकदा दर्बारांत बोलाविलें आणि जमलेल्या सर्दारांस शद्बवेधाचा तमाशा दाखवण्याचा हुकूम केला; हुकूम होतांच पहिल्या तीरानें या स्मरणीय **हिंदु** वीरानें

**महंमद घोरीचाच** प्राण घेऊन आपली तिरंदाजी कार्‍यांनीं लढणार्‍या दगलबाज मुसलमानास दाखविली आणि लगेच आत्महत्या केली—अशी कथा **हिंदूंमध्यें** आहे. कोणतीही गोष्ट खरी मानलीं, तरी अनेक **हिंदूंस** बाटवून देवळें फोडणार्‍या या मुसलमानाचा प्राण **हिंदूंकडूनच** जावा, असा योग देवानें आणिला आणि तेणेंकरून केलेल्या कृत्यांस शोभेल असाच शेवट **महंमद घोरीचा** झाला. **महंमद घोरीस** मुलगा नव्हता, त्यामुळें सगळी सत्ता **कुतुबुद्दीन** गुलामाच्या हातीं आली.

**जयचंद्र राठोडाच्या** वंशांतील एका पुरुषानें पुढें लौकरच **मारवाडची** गादी स्थापिली. ही गादी आजही कायम असून, राजधानी **जोधपूर** आहे. **महंमद घोरीस** मुलगा नव्हता. तेव्हां अर्थातच **दिल्ली** मुक्कामीं **कुतुबुद्दीनानें** गादी स्थापिली आणि **बखत्यार खिलजीनें विहार** प्रांताप्रमाणें **बंगालाही** बळकाविला. याप्रमाणें इसवी शके १२०६ हें **नर्मदेच्या** उत्तरेस मुसलमानी अंमल कायम झाल्याचें वर्ष समजावें. या वर्षापूर्वी मुसलमानी अंमलास कायमपणा आलेला नव्हता.

# भाग २—( पठाणांचा अंमल ).

## प्रकरण १—( कुतुबुद्दीन गुलामाचा वंश. )

### ( इसवी शके १२०६ पासून १२९० पावेतों. )

**१ थोडक्यांत हकीकत**—या राजवंशांतील **अल्तमाश बादशहाच्या** हातीं सत्ता असतां **चिंगिसखान** हा महापराक्रमी **मोंगल** बादशहा प्रसिद्धीस आला आणि यानें **काश्यप** सरोवरापर्यंत विशेषें क-

रून मुसलमानांस "दे माय धरणी ठाय" करून टाकलें. **चिंगिस** व त्याच्या पदरचे **मोगल** जरी **हिंदूंप्रमाणें** मूर्तिपूजक होते, तरी आपल्या खरेपणानें त्यांनीं अनेक प्रसंगीं मूर्तिभंजक मुसलमानांस लाजविलें. **चिंगिसाच्या** दोन मोगल सर्दारांनीं **रूसांतील खिरस्ती** लोकांचींही हाडें खुळखुळीं केलीं. एकंदरींत **एशिया** खंडांतील लोक **युरोप** खंडांतील लोकांपेक्षां अधिक उजू, अधिक प्रामाणिक आणि अधिक सोशिक असे असतात. ते सहसा कोणाच्या वाटेस जात नाहींत; पण एकदां कां संतापले ह्मणजे लोकोत्तर वळ त्यांच्या आंगीं येतें, आणि तें एकदा आलें ह्मणजे **युरोपांतील** लोक थरथर कांपत कांपत त्यांचया पुढून पळून जातात, अशा गोष्टी जशा मूर्तिभंजक **आरबांचया** तशाच मूर्तिपूजक **मोगलांचयाही** इतिहासांत पुनः पुनः वाचायास सांपडतात. जो विशाळ मुलुख मिळवण्यास **रूमी** सारख्या **युरोपांतल्या** नांवाजलेल्या मर्दानी लोकांसही चारशें वर्षें लागलीं त्या मुलुखापेक्षां किती तरी पट अधिक मुलुख **आरबांनीं** चार विसा वर्षांत आणि **चिंगिसानें** आपल्या **मोगलांचया** मदतीनें एकाच विसांत मिळविला ! ! ! **सिंधू** नदीचया पाश्चिमेकडील सगळा मुलुख **चिंगिसाचया** अफाट पादशहातींत सामील झाला होता. **अल्तमाशानें उज्जनीचा** विध्वंस करून **माळवा** प्रांत आपल्या सुल्तानतीस जोडला. **अलतमाश** १२३६ त वारला. पुढें **वल्बन** नांवाच्या ब्रादशहानें **मेवाडावर** स्वारी करून बऱ्याच **हिंदूंचीं** कत्तल केली. **कैकोबाद** बादशहाच्या कारकीर्दींत नुक्तेच मुसलमान झालेले **तातार** लोक आले ते दर्बारांतल्या **पठाणांशीं** ( १२८६—१२९० )तंटा करूं लागले, या तंट्यांत **कैकोबादचा** खून होऊन **तातार** लोकांचा मोड झाला आणि **दिल्ली खिलजी** गोतांतील **जलालुद्दीनाचय** हातीं पडली.

१ कुतुबुद्दीन १२०६—१२१०. कुतुबुद्दीनाचा मुलगा आराम. आरामास पदच्युत करून कुतुबुद्दीनाचा जांवई अल्तमाश ( १२१०-१२३६ ) गादीवर ब-सला. अल्तमाशच्या पश्चात् त्याच्या मुलास पदच्युत करून रझिया बेगम ( १२३६-१२३९ ) गादिवर बसली. सर्दारांनीं बंड केलें आणि कैद करून रझियेस ठार केलें. पुढें सहा वर्षांनीं अल्तमाशचा नातू नासिरुद्दीन यास ( १२४५—१२६६ ) गादी मिळाली. यानें बल्बन नांवाच्या एका हुशार तुर्की गुलामास वजीरकी दिली. नासिरुद्दीनाची वृत्ति फारच साधी होती. आपल्या हातानें कुराणाच्या नकला करून त्या विकी आणि जो पैसा मिळे त्यावर आपली जीविका चालवी. याच्या बायकोस हातानें स्वैपाक करावा लागे. याच्या का-रकीर्दींत बरेंच फार्सी ग्रंथ रचले गेले. याच्या पाठीं बल्बन ( १२६६-१२८७ ) बादशहा झाला. बल्बनाच्या पाठीं गादी कैकोबादास मिळाली.

## प्रकरण ( दक्षिणेंतील धूळधाणी ).

### ( इसवी शके १२९० पासून १३२० पावेतों. )

१ **थोडक्यांत हकीकत—जलालुद्दीनाचें** वय गादी मिळाली तेव्हां ७० वर्षांचें होतें. याचा पुतण्या **अल्लाउद्दिन** हा अयोध्या प्रांताचा सुभेदार होता. त्यानें १२९४ मध्यें एकाएकीं कारणा-शिवाय ८००० कडवे **पठाण** बरोबर घेऊन **देवगिरी** पुढें तळ दिला आणि पाठून जंगी लश्कर घेऊन **जलालुद्दीन** येत आहे अशी कंडी पिकविली. त्यामुळें **रामदेवरावानें** बराच पैसा आणि **एलिचपूर** महाल देऊन तह केला. नंतर चुलत्यास भेटण्यास ह्मणून **अल्लाउद्दीन दिल्लीकडे** वळला. ह्मातारा **जलालुद्दीन अल्लाउद्दीनास** सामोरा येत होता. दोहोंची एकांतीं गांठ पडली आणि **अल्लाउद्दीनानें** घट्ट मिठी मारली असतां पूर्वींच लपवून ठेवलेल्या मारेकऱ्यांनीं एकदम सरसावून **जलालुद्दीनाचा** जीव घेतला. लागोच **दिल्लींत** घुसून **अल्लाउद्दीनानें** शहाजादे होते ते मारेकऱ्यांजव-

ठून मारविले आणि १२९५ त गादी बळकाविली. १२९७ **अल्लाउद्दीनानें गुजराथचें** देशी राज्य बुडविलें. १३०३ मध्यें यानें **चितूर**ला वेढा घातला. **रजपुतांनीं** शिकस्त केली. टिकाव लागत नाहीं असें पाहून मुसलमानांच्या हातीं बायकामुलें न पडावीं या स्तुत्य उद्देशानें त्यांची कत्तल केली आणि नगरास आग लावून आपल्या तलवारींस बळी देत किंवा मुसलमानांच्या तलवारींस बळी पडत **रजपूत** चालले. जे बचले ते **आरवली** डोंगराकडे वळले. **अल्लाउद्दीना**च्या हातीं **चितुर**ची राख मात्र लागली.

पुढें लौकरच **महाराष्ट्रा**ची धूळधाणी करण्यासाठीं **काफूर** नावांच्या सर्दारास **अल्लाउद्दीनानें** पाठविलें. **काफूरनें देवगिरीचें मराठी** राज्य जवळ जवळ बुडविलें. १३०६ त अशीच दुर्दशा **वरंगुळ**च्या **तेलंगी** गादीची आणि **हलवीडूच्या कानडी** गादीची **काफुर**च्या हातून झाली. पुढें थेट **रामेश्वरा**पर्यंत जाऊन **रामेश्वरीं काफुरनें** एक मशीद उभारली. १३११ त **काफूर** परत आला. इतक्यांत **गुजराथी** उठले, **हंमीर राण्यानें चितूर** परत घेतलें आणि **मराठे**ही उठूं लागले. या बातम्या ऐकून **अल्लाउद्दीन** वेडावला. तशांत दर्बारीं मुसलमान झालेल्या **मोगलांनीं** बंड केलें. तेव्हां सुलतानाचें वेड वाढत चाललें आणि १५००० मोगलांची कत्तल करण्यास हुकूम झाला. अशा प्रसंगीं परत आलेल्या **काफुरानें** विष प्रयोग करून १३१६ त धन्याचा जीव घेतला आणि दोन शहाजाद्यांचे डोळे काढिले! तिसऱ्या शहाजाद्याच्या खुनाचा विचार चालला, इतक्यांत एका मारेकऱ्याच्या हातून **काफूर** प्राणास मुकला. तेव्हां तिसरा शहाजादा **मुबारक** यास गादी मिळाली. ज्या दोन सर्दारांमुळें गादी मिळाली त्यांसच ठार करण्याचा हुकूम मारेकऱ्यांस देऊन, **मुबारिकानें** उपकार फेडले !!! **हरपाळ** नांवाच्या **मराठ्यानें** बंड केलें होतें तें

मोडून **हरपाळास** कैद केलें आणि लगेच त्याच्या आंगावरचें चामडें सोलून काढण्याचा हुकूम या नरराक्षसानें दिला. पुढें **खुशरू** नांवाचा मुसलमान झालेला **हिंदु** होता, त्यास मुबारकानें वजीरकी दिली. या **खुसरूनें** १३२० त **मुबारिकाचा** जीव घेऊन **खिलजी** राजवंशाची समाप्ति केली आणि स्वतः गादी बळकावली. **खुसरू हिंदूंस** पदरीं ठेवूं लागला व मोठे हुद्दे देऊं लागला, तें मुसलमानां-च्या डोळ्यांत सलूं लागलें. तेव्हां **ग्यासुद्दीन तघलख** नांवाचा **पंजाबचा** सुभेदार होता तो **दिल्लीवर** आपल्या फौजेनिशीं आला. सामना झाला त्यांत **खुसरू** ठार झाला आणि **ग्यासुद्दीनानें** गादी बळकाविली.

## प्रकरण ३ रें—(तघलखी राजवंश.)

### [ इसवी शके १३२० पासून १४१४ पावेतों ].

१—**थोडक्यांत हकीकत—दिल्ली** मुक्कामीं खुशरूनें सभोंवती जमवलेले **हिंदू** बरेच प्रबळ आहेत, असें पाहून **ग्यासुद्दीनानें तघलखा-बाद** नांवाच्या मजबूत गडांत आपली राजधानी ठेविली. **बंगाल्यांतील** पुंडास वांकवून परत आल्यावर **उलूघखान** नांवाच्या वडील मुलानें बापाची पहिली भेट याच कामासाठीं मुद्दाम उभारलेल्या एका लहानशा लांकडी इमारतींत घेतली. भेटीनंतर **उलूघ** बाहेर आला आणि इमारत कोसळली! बाप आणि धाकटा बंधु असे उभयतां प्राणास मुकले. नंतर **महंमद** नांव धारण करून ( १३२५—१३५१ ) **उलूघ** गादीवर बसला. **महंमदानें महाराष्ट्रांतलि** बंड मोडून, **देवगिरी** मुक्कामीं आपली गादी आणण्याचा विचार केला. पण उमराव ऐकतना, त्यामुळें तो विचार तसाच ठेवावा लागला. १३९९ त **तिमूर**

**लंग** नांवाच्या **मोगलांच्या** बादशहानें **दिल्लीवर** स्वारी केली. हा बादशहा "लंगडा" होता, ह्मणून यास "लंग" ह्मणत. या काळीं **समरकंद, खुरासान** या प्रांतांतील **मोगलांनीं** मुसलमानी धर्माचा **शीया** पंथ स्वीकारला होता. **तिमूर** हा मोठा पराक्रमी बादशहा झाला. **बयाझीद** नांवाचा **इस्तंबुलचा** एक पराक्रमी सुलतान झाला, त्यानें **खिरस्ती** लोकांची एका जंगी लढाईत धूळधाणी करून टाकिली होती. **तुर्क** हे **सुन्नी** असून, **तिमूर** आणि **तिमूरचे** **मोगल** हे **शीया** होते. **बयाझीदची** जी **तिमूरशीं** एक जंगी लढाई झाली, तींत सगळी फौज साफ बुडाल्यामुळें **बयाझीदला** **मोगलांच्या** कैदेंत आपलें आयुष्य घालवावें लागलें. अशा प्रकारें **तिमूर** हा एक नांवाजलेला बादशहा होऊन गेला. **काबुलच्या** वाटेनें **तिमूर** आला. **मोंगलांनीं** **दिल्लीकरांची** कत्तल करून **दिल्ली** लुटली आणि लौकरच उमाप लूट घेऊन **तिमूर** आपल्या मुलुखीं गेला. पुढें १४१२ त **महमूद** नांवाचा पुरुष होता तो वारला आणि या राजवंशाची समाप्ति झाली.

१ मोगलांनीं एकदा स्वारी केली. तेव्हां अल्लाउद्दीनानें दक्षिणेंतून आणलेल्या पैशाचा उपयोग महंमद तघलखानें मोंगलांस पैशानें वश करून घालविण्याच्या कामीं केला. एकदा चीनची पादशहात सर करण्यासाठीं महंमदानें एक लाख फौज हिमालयाच्या पलीकडे पाठविली. हिची वाताहत झाली आणि जे लोक ही दुःखःकारक बातमी घेऊन आले त्यांचीच कत्तल करण्यास महंमदानें हुकूम फर्माविला ! ! पुढें तिजोरींत पैसा नाहींसा पाहून, यानें कागदाच्या नोटा पहिल्यानेंच हिंदुस्थानांत सुरु केल्या. पुढें जिकडे तिकडे यांच्या राज्यांत बंडें उद्भवूं लागलीं आणि अखेरीस १३५१ त ठठ्ठा मुक्कामीं महंमद वारला. तेव्हां याचा पुतण्या फिरूज (१३५१—१३८८) गादिवर बसला. यानें पाण्याचा कायमचा पुरवठा रयतेच्या शेतांस व्हावा ह्मणून कित्येक कालवे केले. याच्या पश्चात् गुजराथ, माळवा, खानदेश या तीन्ही प्रांतीं बंडें उद्भवलीं. अशा प्रकारें दुर्दशा चालली असतां, तिमूरनें स्वारी करून अपरंपार संपत्ती आपल्या मुलुखीं नेली.

# प्रकरण ४—( पठाणांच्या अंमलाची समाप्ति ).

## ( इसवी शके १४१४ पासून १५२६ पावेतों ).

१—" **सय्यद** " **राजवंश**—**मुलतान**चा **खिजरखान** नांवाचा सुभेदार होता, त्यानें **तिमूर**चा अंकित ह्मणवून **दिल्ली** प्रांत १४१४ त आपल्या सुभेदारीस जोडला. या राजवंशांत **अल्लाउद्दीन** नांवाचा बादशहा झाला त्यास वर्षासन कबूल करून, १४५० त **बल्होळ लोदीनें दिल्लीची** गादी स्वतः बळकावली.

२—"**लोदी**" **राजवंश**—**जोनपुर**च्या सुभेदारानें बंड केलें होतें, त्याच्याशीं **बल्होळ**चा तंटा जुंपला. हा छत्तीस वर्षे चालला. अखेरीस **बल्होळ**ची फत्ते झाली. त्यामुळें **पंजाबा**पासून तों **बिहार**पर्यंत **बल्होळ**चा अंमल निर्विघ्न झाला. **बल्होळ**च्या पश्चात् **बिहार** प्रांतही या राजवंशानें काबीज केला. **इब्राहिम** हा या राजवंशांतील शेवटचा पुरुष. **पंजाब**चा सुभेदार **दौलत लोदी** यानें बंड करून **बाबर**ला **मोगलां**निशीं मदतीस बोलाविलें. **पाणिपत** मुक्कामीं १४२६ त लढाई जुंपली, तींत **इब्राहिम** ठार झाला आणि **पठाणां**च्या हातून सत्ता **मोगलां**च्या हातीं गेली.

३—" **पठाणां**"**चा अंमल**.—इसवी शके ११८९ पासून **पठाणां**च्या हातीं उघड सत्ता आली, ती बरीच निर्विघ्नपणें त्यांनीं इसवी शके १५२६ पर्यंत भोगली. **गजनी**कर जरी जातीनें **तुर्क** होते, तरी लष्करांत व लष्करी अंमलदारांत पठाणांचा भरणा पुष्कळ होता, ह्मणून **गजनी**करांची सत्ता हीही एके अर्थी पठाणांचीच सत्ता समजावी. इतकेंच कीं **गजनी**करांचा अंमल काय तो **पंजाबांत** होता; ह्मणून जशी ११८९ पासून **पठाणां**ची सत्ता व्यापक समजतां येते, तशी ११८९च्या पूर्वी समजतां येत नाहीं.

होत. कधीं **हिंदूंची** फत्ते होई, कधीं मुसलमानांची होई. **कृष्णराय** नांवाचा **विजयनगर**चा राजा झाला, त्याच्या राज्यांत बरेच **तेलंगी** ग्रंथ झाले. आज जे विशेष लोकप्रिय झालेले ग्रंथ **तेलंगी** भाषेत आहेत, त्यांपैकीं बरेच **कृष्णराया**च्या कारकीर्दींत रचलेले होते.

## भाग—४ [फिरंग्यांची धामधूम].

### प्रकरण १ [ मूळपीठिका.]

**(इसवी शके १४८७ पासून १४९८ पावेतों ).**

१ **फिरंग्यांचा वृत्तांत**—यांच्या मुलुखास **पुर्तुगाल** ह्मणतात. **लिस्बन** हें यांच्या राजधानीचें नांव. **फिरंगी** हे **रूम**च्या संप्रदायांतील समजावे. **स्पेन** व **पुर्तुगाल** मिळून एक " द्वीपकल्प " होतो. हा " द्वीपकल्प " आणि **फ्रान्स** या दोहोंमध्यें **पिरिनीस** नांवाचा डोंगर आहे. या " द्वीपकल्पां"त इसवी ८ व्या शतकापासून अंमल **आरबां**चा होता. पुढें शेंकडो वर्षांनीं **खिरस्ती** लोक प्रबळ झाले, आणि **मूर** लोकांनीं **खिरस्ती** व्हावें किंवा देश सोडून जावें असा त्यांनीं कायदा केला. या प्रांतांतील **खिरस्ती** लोक **आरबांस** **मूर** ह्मणत. **मोराको** हें **आफ्रिका** खंडांतील उत्तरेकडल्या प्रांताचें नांव **मूर** लोकांवरून पडलें आहे. **मूर** लोकांनीं **जिब्राल्तर**ची " सामुद्रधुनी " ओलांडून हा सगळा मुलूख काबीज केला होता. पुढें केलेल्या कायद्या अन्वयें **मूर** लोक देश सोडून गेले आणि राहिले ते **खिस्ती** झाले. कांहीं वर्षांनीं **पुर्तुगाल**चें राज्य निराळें झालें. आजही **पुर्तुगाल** व **स्पेन** हीं भिन्नभिराळीं स्वतंत्र राज्यें आहेत.

२ **" हिंदुस्थान"चा व्यापार हातीं येण्यासाठीं यूरोपांतल्या लोकांचे यत्न**—**हिंदुस्थानां**तलि माल **युरोपखंडां**त पुष्कळ जात असे आणि खपत असे. हा माल **तांबड्या** समुद्रांतून **मिस्सर** देशांत जाई आणि तेथून **वेनिस** किंवा **जिनोआ** या दोन **इताली** देशांतल्या बंदरांतून गेल्यानंतर **युरोपां**तल्या लोकांच्या हातीं लागे. हा सगळा व्यापार **मूर** लोकांच्या हातीं असून, त्या पासून **मिस्सर** देशाच्या सुल्तानास पुष्कळ फायदा होत असे. हा व्यापार आपल्या हातीं थोडा तरी यावा, असें **युरोपां**तील लोकांस वाटूं लागलें आणि त्यामुळें **हिंदुस्थाना**स यावयास दुसरी वाट शोधून काढण्याविषयीं त्यांचे यत्न बरींच वर्षे चालले होते. हीच **हिंदुस्थाना**ची वाट शोधून काढीत असतां **कोलंबसानें** इसवी शके १४९२ त प्रस्थान ठेवून **अमेरिका** खंड शोधून काढिलें. १२८७ त **दायाझ** नांवाच्या **फिरंग्यानें आफ्रिके**स वळसा घालून येण्यास यत्न केला. पण तुफानी वारा सुटला आणि **दायाझचें** पाऊल फारसें पुढें पडलें नाहीं. पुढें दहा वर्षांनीं **वास्को दिगामा** नांवाचा आर्मारी कामगार तीन तारवें घेऊन निघाला तो **गुड होप** नांवाच्या " भूशिरा"स वळसा घालून १४९८ त **मलबारच्या** किनाऱ्यावर लागला.

## प्रकरण २ रें—[ फिरंग्याच्या वसाहती व मुलुख ]

### इसवी शके १४९८ पासून १५१९ पावेतों.

१ **मलबाराचें विभाग**—**गामा** ज्या काळीं लागला त्या काळीं **मलबारचें** १२ विभाग झाले होते. **कालिकत** मुक्कामीं " तंबुरिन " किताब मिळालेला एक छोटा राजा होता, त्यास हे १२ ही राजे खंडणी देत.

२ **"वास्को दी गामा" परत जातो**—पुढें "तंब्रुरिना" शीं **गामानें** व्यापाराच्या संबंधानें तह केला. नंतर चंचूप्रवेश झालासा पाहून **गामा कलिकताहून** निघाला, तो १४९९ त आपल्या मुलुखीं दाखल झाला.

३ **काब्राल**—**पोर्तुगालच्या** राजानें आतां नवीन आर्मार तयार केलें आणि तें **काब्राल** नांवाचा शूर सर्दार होता त्याच्या हवालीं केलें. **काब्राल कलिकत** बंदरीं लागला, तेंव्हां "तंबुरिना" नें त्याचा करावा तसा आदर केला. पण **काब्राला**-जवळ या प्रसंगीं आर्मारी शिपाई होते. म्हणून "बळी तो कान पिळी" या न्यायास अनुसरून त्यानें एकाएकीं एक मूर लोकांचें व्यापारी जहाज लुटलें. तेंव्हां **मूर** लोकांनीं हल्ला केला, त्यांत ५० **फिरंगी** ठार झाले. त्यांचा सूड काढण्यासाठीं ह्मणून वीर पुरुषास बट्टा लावणारा मार्ग या **फिरंग्यानें** स्वीकारला आणि **कलिकत** बंदरीं आग लावून लगेच **कोचीन**चीं दिशा पकडली. **कोचीन**कराचें आणि **कलिकत**कराचें पूर्वीपासून वैर होतें. ह्मणून **कोचीन**करानें लहानसा गड उभारण्याची परवानगी **काब्रालास** दिली. नंतर १५०१ या वर्षी **काब्राल** आपल्या मुलुखीं गेला. **युरोपांत**ले लोक आजपर्यंत हिंदुस्थानांत शिरले, ते **काब्रालनें**च केलेला कावा करून शिरले. गोडीगुलाबीनें आपला पाय हे लोक पहिल्यानें थोडासा शिरकवतात; पुढें सवड सांपडतांच एखादा कज्जेदलाल सरदार असतो त्याचा पक्ष उचलून हे खऱ्या धन्याशीं भांडतात आणि खऱ्या धन्याचा एकदा पाडाव झालेला आढळला ह्मणजे आपणांस आश्रय देणारासही कोणती तरी कुरापत काढून हे शेवटीं हुसकून लावितात!!!

४ अलबुकर्क—( १५०६—१५१९ )—यानें कलिकतवर हल्ला केला. पण मार सुरेख मिळाला आणि अलबुकर्कास हटावें लागलें. इतक्यांत सुलतान दुसरे स्थळीं गुंतला आहे असें ऐकून १५१० त अलबुकर्कानें गोवें बळकावलें आणि गड बांधून मजबूत केलें. वसईचा व दीवचा हे दोन्ही किल्ले फिरंग्यांनीं बांधलेले आहेत. अलबुकर्कानें मूर लोकांच्या कत्तली बऱ्याच केल्या, आणि फिरंग्यांच्या नांवाची दहशत बसविली. त्याच्या पाठीं फिरंग्यांच्या मुलखास व वसाहतीस उतरती कळा लागली.

# भाग ५—( मोगलांचा अंमल ).

## प्रकरण १—(बाबर आणि हुमायुन ).

( इसवी शके १५२६—पासून १५५५ पावेतों. )

१ बाबर ( १५२६—१५३० )—हा तिमूरच्या वंशांत १४८२ जन्मला. जन्मभूमींतून यास इतर मोगलांनीं हांकून लाविल्यानंतर यानें काबूल प्रांतीं आपला अंमल पहिल्यानें स्थापिला. पुढें दौलत लोदीनें आमंत्रण दिल्यामुळें बाबर सिंधु नदी उतरून आला आणि पाणिपतची लढाई झाली. इब्राहीम ठार झाला, तेव्हां बाबरच्या हातीं राजसूत्र आलें. बाबर हा इतर मोगलांप्रमाणेंच शीया होता.

२ "शिक्री"ची लढाई–चितूरचा संग राणा मोठा पराक्रमी होता. याची बाबर बरोबर मोठी लढाई झाली, ती आग्र्याजवळ शिक्री मुक्कामीं झाली. रजपुतांचा दुर्दैवानें मोड झाला. दुसरे वर्षी चंदेरीस बाबरनें वेढा दिला. या वेढ्यांत बऱ्याच रजपुतांची कत्तल झाली.

**बाबर**चा मुलगा **हुमायुन** यानें **जोनपुर, बिहार, बंगाला,** हे तिन्ही प्रांत सर केले. याप्रमाणें **गुजराथ** प्रांत खेरीज करून इतर प्रांतांमध्यें चांगला अंमल बसला असतां १९३० त **बाबर** वारला. **हुमायुन** आजारी पडला असतां **बाबरनें** देवाची प्रार्थना केली कीं **हुमायुनास** राखावें, आपणास न्यावें. देवानें प्रार्थना ऐकली आणि **हुमायुन** जसजसा सुधारला तसतसा **बाबर** अधिकाधिक आजारी पडत चालला आणि अखेरीस वारला.

**हुमायुन** ( १९३०—१९४० )—कारकीर्दीच्या तिसऱ्या वर्षी आपलें लक्ष यास **गुजराथ** प्रांताकडे लावावें लागलें. **बहादुरशहा** नांवाचा **गुजराथ**चा सुलतान मोठा पराक्रमी होता. यानें आपला अंमल **माळव्यांत** बसविला होता. **खानदेश** आणि **वऱ्हाड** हेही प्रांत यानें आपल्या राज्यांत सामील केले होते. लौकरच **बहादुर शहानें चितूरा**ला वेढा दिला. **चितूर** पडणार असें पाहून अग्निकाष्ठें भक्षण करण्याच्या पूर्वी **संग राण्या**च्या विधवेनें आपलें पोरकें पोर आणि हातांतलें एक कांकण अशी दुक्कल **हुमायुना**कडे पाठविली. **हुमायुना**नें ही दुक्कल स्वीकारून गरीब बिचाऱ्या **हिंदु** विधवेच्या पोरक्या पोराचा वालीपणा आपणांकडे घेतला आणि **बहादुरशाहा**वर स्वारी केली. **बहादुरशहा**चा लढाईंत मोड झाला आणि **चंपानेर** मुक्कामची अपरंपार दौलत **हुमायुना**च्या हातीं लागली.

**शीरशहा आणि हुमायुन**—इतक्यांत **शीरशहा** नांवाचा पुंड **बंगाल्यांत** डोकें वर करूं लागला होता, तिकडे **हुमायुन** गेला. **चुनारचा** किल्ला **हुमायुनानें** सर केला आणि **गौड**चाही किल्ला त्याच्या हातीं लागला. पण इतक्यांत पावसाळा सुरु झाला आणि जसें तापानें तसेंच अतिसारानें **हुमायुनचें** लष्कर कमी कमी होत

चाललें. अशा प्रसंगीं **शिरशहानें** डाव साधला. **बक्सर**च्या लढाईंत पुरा मोड होऊन, कांहीं लोकांनिशीं **हुमायुन दिल्लीस** पोंचला. फौज जमवून आणखीं एकदां **हुमायुननें** यत्न केला आणि **कनोज**ची लढाई मारली. याही प्रसंगीं **शीरशहा**ची फत्ते झाली. **हुमायुन लाहोरास** पळाला नंतर **सिंध**च्या वाळवंटातून **अमरकोट** मुक्कामीं पोंचला, तेव्हां त्याच्याजवळ फक्त सात माणसें राहिलीं होतीं. **अमरकोट** मुक्कामीं **अकबरा**चा जन्म झाला. पुढें **अमरकोटा**हून **हुमायून** निघाला, तो १५४४त **इराणांत** पोंचला. **अकबरास कंदाहारीं** पोंचवून, **हुमायून**चा सेनापति **इराणांत** आपल्या धन्यास जाऊन मिळाला. **शीरशहानें** लगेच **दिल्ली** बळकावली. यानें ५ वर्षें गादी भोगली. १५४५ त **बुंदेलखंडांत कालंजर** नांवाच्या गडास वेढा घातला असतां, दारू गोळ्यास आग लागली आणि **शीरशहा**चा शेवट झाला. **शीरशहा**चया पश्चात् गादीच्या अधिकाऱ्यांमध्यें दम राहिला नाहीं. **शिकंदर** नांवाच्या पुरुषाचा **हेमू** नांवाचा **हिंदू** वजीर होता. **हेमूनें** बऱ्याच **हिंदूं**स आश्रय दिला, ह्मणून **शीरशहा**च्या जातीचे अफगाण चिडले आणि घरफुटीस आरंभ झाला. १५५५त **सिंधु** नदी उतरून **हूमायून** नेटानें अलीकडेस येत चालला. **सरहिंद**च्या लढाईंत **शिकंदरा**चा मोड झाला आणि **हुमायुन**ची गादी **हुमायुनास** मिळाली. पुढें लौकरच प्रार्थनेची वेळ साधण्यासाठीं खालीं येत असतां, **हुमायुन**चा पाय घसरला. त्यामुळें **हुमायुन** आजारी पडला, तो पुनः वर उठला नाहीं.

## प्रकरण २—( अकबर १५५६—१६०५ ).

१ "अकबर" आणि "बाहिराम"—हुमायुनाचा शेवट झाला

तेव्हां मुलगा **अकबर** आणि सेनापति **बाहिराम** हे उभयतां **पंजाबांत** होते. **हुमायुना**च्या मरणाची बातमी कळतांच **बंगाल्यांतून हेमू** निघाला. **दिल्ली** व **आग्रा** येथील गडकऱ्यांनीं **हेमू**ची सत्ता कबूल केली. तरी **बहिरामानें** किंवा १३ वर्षें जेमतेम पुरीं झालेल्या **अकबरानें** कच खाल्ला नाहीं. दोहोंची लढाई **पाणिपत** मुक्कामीं झाली. हींत **अकबरा**ची आणि **बहिरामा**ची फत्ते होऊन, **हेमू**चा मोड झाला. **हेमू** कैदींमध्यें होता, त्याचा **बहिरामानें** आपल्या हातानें शिरच्छेद केला. पुढें **बहिराम** शिरजोर झालेला पाहून १५६० च्या सुमारास **अकबरानें** सगळी सत्ता आपल्या हातीं घेतली.

२—“ **अकबरा** ”**चा रजपुतांशीं तंटा**—हा पांच वर्षें चालला. अखेरीस बेटी देण्याघेण्याच्या बोलीनें **अकबरानें रजपुतांशीं** तह करण्याचें कबूल केलें. **जयपुर**कर व **जोधपूर**कर हे कबूल झाले, पण **उदेपुर**कर कबूल होईना. वेढा घालून **अकबरानें** अखेरीस **चितूर** घेतलें. राणा **उदेसिंग आरवली** डोंगराकडे पळाला आणि पुढें त्यानें **उदेपूर** वसविलें. मुसलमानांशीं बेटीव्यवहार आजपर्यंत न केल्यामुळें, **उदेपुर**चा राणा स्वतःस बेटीव्यवहार झालेल्या **जयपुर**करासारख्या इतर **रजपुतां**पेक्षा कांकणभर जास्त सोंवळा समजतो.

३ **अकबराचा पुढील क्रम**—**अफगाणांवर** व **काश्मीरावर** लौकरच **अकबरानें** आपली सत्ता बसविली, **गुजराथ** प्रांत आपल्या आपल्या राज्यास जोडला, **बंगाल्या**चा आपल्या पादशहातींत मिलाफ करून **दाऊद** नांवाच्या पुंडाची सत्ता लयास घालविली आणि **दाऊद**चा बाप **सुलेमान** यानें **उडिसा** प्रांत देशी **हिंदू** राजास बुडवून सर केला होता तोही आपल्या राज्याच्या एक सुभा केला; इतकेंच नाहीं, तर **वऱ्हाड** प्रांत काबीज करून, **अहमदनगर**ची निझामशाही बुडविली. इतक्यांत वडील मुलगा **जहांगीर** यानें बंड केल्यामुळें **अकबरास दिल्ली**कडे वळणें भाग पडलें.

१ अकबर जसा पराक्रमी होता, तसाच धोरणी होता. हिंदू व मुसलमान मिळून एक राष्ट्र करण्याचें स्तुत्य धोरण राखून अकबरानें जशी बेटी घेण्यास तशीच देण्यासही सुर्वात केली. हें अकबराचें धोरण साधारण नव्हे. कित्येक राजे होऊन गेले, ते जसे पराक्रमी होते तसेच क्रूर होते. पण अकबरामध्यें क्रौर्य वास करीत नव्हतें. हिंदु हेमूचें डोकें उडवून "गाझी" होण्यास बहिरामानें सांगितलें, तें अकबरास रुचलें नाहीं; तेव्हां बहिरामानें आपण होऊन आपल्या हातानें हेमूचें डोकें उडविलें आणि गाझीपणा मिळविला.

२ अकबर धर्मानें कडवा मुसलमान नव्हे. धर्मवेड अकबरांत नव्हतें, म्हणून तो मुसलमानांस एकंदरींत आवडत नसे. अबुल फझल नांवाचा सर्दार होता, तो अकबराच्या मताचा होता. "राम हो या रहीम हो" हें अकबराचें मत दिसतें. कबीर नांवाचा महात्मा आपलें नांव अजरामर करून गेला होता, त्याच्या निर्दोष संप्रदायाचा अकबराच्या मनावर परिणाम झालेला दिसतो. एकंदरींत महंमदाचा उपदेश अकबरास मान्य होता आणि ख्रिस्ताचाही उपदेश मान्य होता; तरी अकबराची गणना आजच्या नामधारी मुसलमानांमध्यें किंवा नामधारी ख्रिस्त्यांमध्यें करणें वाजवी होणार नाहीं. या प्रमाणें सर्व धर्म मुळचे अभिन्न समजूं लागल्यामुळें, जशी मुसलमानांवर तशीच हिंदूंवर अकबराची कृपादृष्टि राहत गेली.

३ आपणांमध्यें अकबर व बिरबल यांच्या गोष्टी पुष्कळ ऐकण्यांत येतात. बिरबल हा रजपूत होता. आज ज्या गोष्टी आपण ऐकतों, त्या सगळ्या अकबराच्या व बिरबलाच्या समजणें वाजवी नाहीं. तरी बिरबलाच्या व्यावहारिक शहाणपणावर अकबराचा पुष्कळ भरंवसा होता, इतकें अनुमान एकंदरींत काढतां येतें. या प्रमाणें हिंदूंच्या व्यावहारिक शहाणपणावर अकबरासारखा भरंवसा ठेवणारा बादशहा एक अकबरच.

४ तोडरमल्ल नांवाचा रजपूत होता त्याच्यावर मुलुखाची पहाणी करण्याचें काम अकबरानें सोंपविलें. "खालसा" आणि "जहागीर" असे जमिनीचे दोन विभाग तोडरमल्लानें केले. ज्या जमिनीचा वसूल उजू बादशहाच्या खजिन्यांत जाई, ती "खालसा" जमीन; पहिल्यानें जी जमीन सांगितलेल्या कामगिरीबद्दल एखाद्यास तोडून दिलेली असे, ती "जहागीर" जमीन. "अ-

हागीर" जमिनी बद्दल एकदा ठरलेली रक्कम "जहागीर" दारास बादशहाच्या खजिन्यांत द्यावी लागे आणि अधिक वसूल आल्यास तो जहागीरदारीच्या तिजोरींत राहे. तोडरमल्लानें आंतील पिकावरून जमिनीच्या तीन प्रती केल्या आणि तीन्ही प्रतीच्या जमिनीचे निरनिराळे माफक दर लाविले. जमिनीच्या पिकाची किंमत ठरवून, तिचा एक तृतीयांश तोडरमल्लानें राजभाग केला आणि दुसऱ्या सगळ्या पट्ट्या काढून टाकल्या.

५ लश्करी शिपायांस जहागिरी देण्याची नवीन चाल बंद पाडून त्यांचा पगार रोकड देण्याची पद्धत घातली; जिझिया नांवाची पट्टी जो धर्मानें मुसलमान नसे त्यास पूर्वी द्यावी लागत असे, ती काढून टाकली; कधीं कधीं भट व उपाध्ये नातलगांचे मिलाफी होउन जुलुमानें सती घालवीत तें बंद केलें ; लढाईतल्या कैदींस गुलाम करण्याचें मना केलें ; इतक्या सुधारणा अकबरानें केल्या.

## प्रकरण ३रें—( जहांगीर.)

### ( इसवी शके १६०५ पासून १६२७ पावेतों )

१ **जहांगीर**—हें नांव गादीवर बसतांना यानें धारण केलें. याचें मुळचें नांव **सलीम.** याची आई **जोधपुरकराची** मुलगी. त्यामुळें बापाकडून मुसलमान असून आईकडून हा **हिंदु** होता. **अकबरानें जयपुरकराची** मुलगी **जहांगिरास** केली होती. हिचा मुलगा **खुशरू.** हा **अकबराचा** लाडका होता. **खुशरूस रजपूत** विशेष आवडत. बापावर बंड करण्याचा किता **जहांगीरनें** घातला होता, तोच **खुशरूनें** वळविला आणि **लाहोराकडे** कूच केला. अखेरीस कैद करून **जहांगिरनें खुशरूस** आंधार कोठडींत टाकलें. पुढें १६२१त कैदेंतच **खुशरू** वारला. **जहांगीरच्या** पट्टराणीचें नांव **नूरजहान.**

२ **नूरजहान**—ही मुळची अठरा विसवे दरिद्रानें गांजलेल्या आईबापाची, पण खुबसुरत; वाटेवर *टाकलेली एका श्रीमंत व्यापाऱ्यास सांपडली आणि त्यानें पोटच्या पोराप्रमाणें वाढाविली. श्रीमंत व्यापाऱ्याचें **अकबराच्या** राजवाड्यांत जाणें येणें पडलें, त्यामुळें **जहांगीरच्या** दृष्टीस पडून **जहांगीरचें** मन पूर्वींपासून तिच्यावर बसलेलें. ही गोष्ट लक्षांत ठेवून **अकबरानें शीरखान** नांवाच्या पठाणाशीं तिचें लग्न लावून दिलेलें आणि **जहांगीरच्या** दृष्टीस पुनः पडूं-नये ह्या हेतूनें जोडप्याची **बंगल्यांत** रवानगी केलेली. दृष्टीपुढून दूर घालविल्यामुळेंच **जहांगीर** विसरला नाहीं; आणि **शीरखानाचा** खून करवून, त्याच्या विधवेशीं **जहांगीरनें** पाट लाविला. पुढें **नूर-जहान** सांगेल ती पूर्व, अशी **जहांगीरची** स्थिति होऊन तिच्या ना-तलगांस मोठमोठे हुद्दे **जहांगीरकडून** देण्यांत आले. **नूरजहान** फार खोल आणि पाताळयंत्री अशी बाई होती.

**१ सर तामस रो**—यास १६१५ त **इंग्लंडच्या** पहिल्या **जेम्स** राजानें **मोंगलांच्या** दरबारीं आपला हेजीब या नात्यानें पाठविलें. याचा **जहांगीरानें** चांगला आदर सत्कार केला. **जहांगीर** पुढें **रजपुतान्यांत** गेला, तेव्हां त्यानें **इंग्रजांच्या** हेजिबास आपणांबरोबर नेलें. **जहांगीरच्या** दर्बारच्या संपत्तीचें, थाटमाटाचें आणि रीतीभातीचें वर्णन "रो"नें करून ठेविलें आहे.

४ **"निजामशाही"चे शेवटचे हालहवाल—अकबराचे** कारकीर्दींत **चांद बिबीचा** दग्यानें खून झाला, तेव्हां **अहमदनगर** पडलें. पुढें मुसलमानांची आणि **हिंदूंची** अशा दोन फळया **निजाम**-शाहींत झाल्या. **मलिकंबर** नांवाचा **हबशी** मुसलमानांच्या फळीचा पुढारी होता, आणि **राजू** नांवाचा **मराठा हिंदूंच्या** फळीचा पुढारी होता. **मलिकंबरानें** १६०३ मध्यें **मोंगलांस** बोलावून,

**मराठ्यांचा** मोड केला आणि **राजू** जवळचा—जसा **गुजराथेंत**ला तसाच **महाराष्ट्रां**तील—मुलुख बळकाविला. पुढें **खुशरूनें** बंड केलें, त्या संधीस **मलिकंबरनें मोंगलांचा**ही कांहीं मुलुख उपटला. त्यामुळें **जहांगीरनें शहाजहानास दक्षिणेंत** पाठविलें. शहाजहानानें **मलिकंबराचा** मोड करून १६२१ त त्यानें बळकाविलेला **मोगली** मुलुख परत घेतला आणि बरीच खंडणीही **जहांगीरास** देवविली.

९ **काश्मीराहून लाहोरास** येत असतां वाटेवर १६२७त **जहांगीर** वारला.

१ शहाजहान दक्षिणेंत असतां जहांगिर आजारी पडला. इतक्यांत खुसरू वारला. शहाजहानानें खुसरूस मारविलें, असें ह्मणतात. जहांगिरच्या अगदीं धाकट्या मुलाचें नांव शहारियार. दक्षिणेंत फत्ते झाल्यामुळें शहाजहानास गादी मिळण्याचा रंग दिसूं लागला, तो नूरजहानच्या डोळ्यांत सलूं लागला. तिची पहिल्या नवऱ्यापासून झालेली मुलगी शहारियारास दिली होती, ह्मणून नूरजहाननें शहारियारचा पक्ष उचलला. इतक्यांत खुशरूचा बुलाकी नांवाचा मुलगा होता, त्यास गादी देण्याचा विचार जहांगीरानें दर्बारी मंडळीस कळविला. या प्रसंगीं नूरजहानचें वजन बादशहावर किती होतें तें लोकांस कळून आलें. शहारियार इराणावर स्वारी करण्यास लाहोर मुक्कामीं तयारी करून राहिला होता, त्यास लश्करानिशीं येऊन मिळण्यास आणि मदत करण्यास जहांगीरनें नूरजहानच्या मसलतीनें दक्षिणेंत शहाजहानास हुकूम पाठविला. शहाजहानानें वाटेवर आग्र्याचा खजिना हस्तगत करून घेण्यास यत्न केला. जहांगीर लाहोराहून निघाला; पुढें बापलेकांची लढाई दिल्लीजवळ झुंपली, तींत मोड होऊन लेक पळून गेला.

२ लौकरच बादशाही लश्करांत दुफळी झाली. नूरजहानबाई रजपुतांचा व हिंदूंचा द्वेष करीत असे. परवेझ नांवाचा शहाजादा होता, त्याची रजपुतांवर मेहेरबानी असून, मोहबत नांवाचा एक वजनदार सरदार त्याच्या बाजूस होता.

मोहबतापेक्षां अधिक वजनदार काय तो नूरजहानचा बंधु असोफ. मोहोबताचा नाश करण्याचा विचार नूरजहाननें केला. इतक्यांत जहिलम नदीवर जहांगीर असतां त्याच्यावर एकाएकीं मोहोबतानें छापा घातला आणि त्यास कैद केलें. १६२६ त नूरजहानच्या खटपटीनें जहांगीरास कैदेंतून पळून जाण्यास सवड सांपडली. इतक्यांत परवेझ वारला. तेव्हां मोहबत दक्षिणेंत येऊन शहाजहानास मिळाला; कारण मर्जी सुप्रसन्न होऊन दक्षिणची सुभेदारी जहांगीरनें पुन: एक वेळ शहाजहानास सांगितली होती.

# प्रकरण ४—( शहाजहान ).

## ( इसवी शके १६२७ पासून १६५८ पावेतों ).

१ **“ शहाजहान ” गादीवर बसतो—जहांगीर**च्या मरणाची बातमी कळतांच **शहाजहान दक्षिणें**तून आला. **नूरजहान** बाईस २५ लाख रुपयाचें वर्षासन मिळून, दर्बारी खटपटी सोडून द्याव्या लागल्या आणि एकांतीं वास स्वीकारावा लागला.

२ **“ खानजहान लोदी” चें बंड आणि “निझामशाही”** ची **समाप्ति—शहाजहानास** पादशहा कबूल न करून **खानजहानानें** आरंभीं बंड केलें. पण माफी मागून, **माळव्या**ची सुभेदारी मिळाली ती **खानजहानानें** पत्करली. पुढें बादशहा आपला जीव घेऊं पहातो अशी शंका आल्यामुळें **खानजहान** पुन: बंडखोर झाला आणि **दक्षिणे**कडे १६२७त **शहाजी भोसल्या**ची खटपट चालली असतां वळला. **निझामशाहीं**तून कांहीं लोक घेऊन **बुंदेलखंडां**त तळ देऊन **खान** होता, इतक्यांत खांसा **शहाजहानाशीं** त्याची लढाई जुंपली. हींत **खानजहान** ठार झाला. **निझामशाहींत मलिकंबरा**च्या पश्चात् **मलिकंबरा**चा मुलगा **फत्तेखान** याच्या हातीं सत्ता होती. बापाप्रमाणें लेंकही **निझामशाही** बुडवणारा झाला; म्हणून **शहाजी भोसल्यानें निझामशाही**चा जीर्णोद्धार करण्यासाठीं जी

बडी खटपट चालविली होती, ती बंद पडली. याप्रमाणें जवळ जवळ १९० वर्षे चालून **अहमदनगर**ची **निझामशाही शहाजहाना**च्या कारकीर्दीत साफ बुडाली आणि **शहाजी भोसले विजापुर**करांच्या पदरीं राहिला.

३ **" शहाजहाना " चे मुलगे**—**शहाजहाना**च्या कारकीर्दीत दंगे धोपे सांगण्यासारखे झाले नाहींत. पण १६५७ त **शहाजहान** दुखण्यानें पडला आणि दुखणें असाध्यसें भासूं लागलें, तेव्हां राज्यामध्यें अस्वस्थपणा माजण्याचा रंग दिसू लागला. **शहाजहाना**चे मुलगे चौघे असून, **दारा** हमेश बापाजवळ असे. चौघांनीं ही चार निरनिराळ्यां दिशा पकडल्या होत्या. **दारा** दिलानें मोकळा आणि मनानें थोर असून **हिंदूं**कडे कललेला होता. **दारा**चीं धर्ममतें **अकबरा**च्या धर्ममतांसारखीं होतीं, अर्थात **दारा**ची धर्मबुद्धि जागृत होती. सारांश **दारा** होतकरू शाहाजादा होता. **सुजा** नांवाचा मुलगा शीया पंथाचा असून **हिंदूं**वर मायाममता करणारा होता. पण **सुजास** ऐशआरामाखेरीज दुसरें फारसें माहीत नव्हतें. **बंगाल**ची सुभेदारी **सुजा**स दिलेली होती. **मुराद गुजराथ**चा सुभेदार असून, त्यास तारतम्य मुळींच नव्हतें आणि व्यसनें मात्र बरींच लागलेलीं होतीं. **अवरंगजेब** मोठा स्वार्थी, पाताळयंत्री, धोरणी, लाघवी, प्रसंगीं आर्जवी आणि आनखशिखाग्र जसा खोटसाळपणानें तसाच सार्वत्रिक वहिमानें ओतप्रोत भरलेला असा होता. हा दक्षिणची सुभेदारी करीत होता. मुसलमानी धर्माचा वाहेरून वडा आव घालून महाकैवारी ह्मणवून घेण्याची विद्या **अवरंगजेबा**स अतिच सुरेख साधली होती. **मुराद** आणि **अवरंजेव** हीं दुकल **सुन्नी पंथा**चीं होतीं.

३ **अवरंगझेवाचा कावा**—**हिंदूं**स बाटविण्याचें सोडून देऊन त्यांच्याशीं सलोख्यानें वागणारा वादशहा उपयोगाचा नाहीं, असें **अवरंगझेवानें** मुसलमानांमध्यें पिकवलें आणि **मुरादा**ची वाज

आपण उचलली. लौकरच **मुरादास** मिळून **अवरंगझेब** फौजेनिशीं **रजपुतान्यांतून** आग्र्याकडे वळला. **जोधपुरकर जसवंतसिंग उज्जनी** मुक्कामीं **दारा**च्या तर्फेनें आडवा आला. पण फौजेंतील मुसलमान **अवरंगझेबा**वर गोळी टाकीतना. **आग्रा** मुक्कामीं एका दिवसाच्या मजलेवर राहिला असतां **दारा**च्याही लश्कराची अशीच स्थिति झाली. त्यामुळें जसे **उज्जनी** मुक्कामीं तसे **आग्र्या**जवळच्या चकमकींत **हिंदु** मात्र कापले गेले. त्यामुळें **दारास** पळून जाणें भाग पडलें. द्विवर्ग बंधूंनीं **आग्र्या**मध्यें शिरून बापासच पहिल्यानें कैद केलें. नंतर **मुरादास** लौकरच गादी देण्याची तयारी चालली आहे, अस कांही दिवस **अवरंगझेबा**नें पिकवलें. याप्रमाणें कांहीं दिवस गेल्यानंतर एके दिवशीं **मुराद** दारू पिऊन पडलेला पाहून असला दारूबाज मुसलमानी धर्माप्रमाणें गादीस लायक नाहीं असा मौलवींजवळूनच ठराव करविला आणि लगेच दारूबाज **मुरादा**ची **ग्वाल्हेर**च्या किल्ल्यांत रवानगी करून मुसलमान शिपायांचा गजर चालला असतां **अवरंगझेबा**नें स्वतःच गादी स्वीकारली.

५ **"शहाजहाना"चा मृत्यु**—पुढें सात वर्षे **आग्रा** मुक्कामीं आपल्याच महालांत कैदीप्रमाणें राहिल्यानंतर, १६६६ त **शहाजहाना**चा शेवट झाला.

१ जहांगीरच्या मरणाची बातमी होईल तितकी लौकर कळविण्याची तजवीज असोफानें केली. असोफाची मुलगी शहाजहानास दिलेली असून, नूरजहानची पहिल्या नवऱ्यापासून झालेली मुलगी शहारियारास दिली होती. म्हणून असोफाचा जसा शहाजहानाकडे ओढा होता, तसा नूरजहानचा शहारियारकडे होता. नूरजहान जरी मसलती होती, तरी असोफाची बरोबरी तिच्यानें करविली नाहीं, आणि त्यामुळें अखेरीस भावाची मसलत सफळ होऊन नूरजहानबाईस चुरमुरे भाजीत बसावें लागलें. असोफानें जहांगिरच्या आज्ञेप्रमाणें

खुसरू परवेझाचा मुलगा बुलाकी यास गादी दिल्याचा जाहिरनामा पहिल्यानें लाविला आणि नूरजहानला पकडून कैद केलें. नंतर लाहोर मुकामीं जाऊन शहारियारचा मोड करून हातीं लागतांच असोफानें त्यास ठार केलें. पुढें मोहबतानिशीं दक्षिणेतून येतांच शहाजहानानें गादी स्वीकारिली. लौकरच आपलीं मुलें सोडून बाबरवंशांतील दुसरीं मुलें माणसें ठार करण्यांत आलीं आणि जसे असोफावर तसे मोहबतावरही मानावर मान शहाजहानाकडून लादण्यांत आले.

# प्रकरण ५—[अवरंगझेब]

## [इसवी शके १६५८ पासून १७०७ पावेतों].

१ "**अवरंगझेब**" **बंधूंचें व त्यांच्या मुलांचें तळपट करितो**—**सुजा बंगाल्यां**तून येत होता, त्याची व **अवरंगझेबा**ची गांठ **प्रयागा**जवळ पडली. लढाईत मोड होऊन **सुजा बंगाल्यांत** पळाला. त्याचा पाठलाग करण्यास **अवरंगझेबानें मीरजुमलास** पाठविलें. अखेरीस **आराकान** प्रांतीं दुर्दशा होऊन **सुजा**चा शेवट झाला. **मारवाड**चा राजा **जसवंतसिंग** यानें विश्वासघात केल्यामुळें, **दारास** पुनः पळून जावें लागलें. एका **अफगाणा**च्या हातीं **दारा** लागला. शृंखळा घालून **अफगाणानें दारास अवरंगझेबा**कडे पाठविलें. मुसलमानी धर्म सोडल्याचा आरोप आणून पहिल्यानें गुन्हेगार ठरविलें; आणि गुन्हेगाराप्रमाणें शहरांतून धिंड काढून, नंतर **दारा**चा शिरच्छेद करण्याचा हुकूम **अवरंगझेबानें** केला. लौकरच **दारा**चा मुलगा **सुलेमान** यास **ग्वाल्हेर**च्या किल्ल्यांत कैद करून पाठविलें. याप्रमाणें आपल्या अगदीं जवळच्या नातलगांचें तळपट केल्यानंतर, दुसरे वर्षापासून **अवरंगझेब** गादीवर बसूं लागला.

२ **"रजपुतान्या"वरील स्वारी**—**जयपुर**चा राजा **जयसिंग** आणि **जोधपुर**चा राजा **जसवंतसिंग** हे वारल्यानंतर, **रजपुतांस** वाटविण्याच्या किंवा "जझिया" नांवाची पट्टी तरी त्यांच्यापासून घेण्याच्या हेतूनें **अवरंगझेबानें** ही स्वारी केली. "जझिया" नांवाची पट्टी द्यावी किंवा मुसलमान व्हावें, हे दोनच मार्ग **हिंदूंस** राहिले. **जयपुरकरानें** पट्टी देण्याचें कबूल केलें. **जसवंतसिंगा**च्या विधवेनेंही वाहेरून रुकार दिला. पण हा काळपर्यंत न दिलेली पट्टी या काळींही न देण्याचा संकल्प **उदेपुरकरानें** केला आणि **उदेपुर** सोडून **आरवली** डोंगरांची वाट धरली. **मोगलांनीं** शिकस्त केली, **अवरंगझेब** खांसा येऊन तळ देऊन राहिला, **राजस्थाना**च्या वाळवंटावर अगणित पैसा ओतण्यांत आला, तरी **नर्मदे**च्या उत्तरेकडील **हिंदूंनीं** दाद दिली नाहीं. अखेरीस **अवरंगझेबा**चा **अकबर** नांवाचा मुलगा होता, त्यास **रजपुतांनीं** फितविलें आणि **अवरंगझेबा**चयाच गळयांत धोंगडें घातलें. तेव्हां १६८३त **रजपुतां**शीं तह करून, **अवरंगझेबा**ची स्वारी **मराठ्यांस** चिरडून टाकण्यासाठीं **दक्षिणे**कडे वळली.

३ **"दक्षिणें"तील स्वारी**—**शिवाजी**चा १६८० त शेवट झाल्यानंतर पाठीमागें **महाराष्ट्र** मंडळांत बराच घोटाळा चालला होता. **अवरंगझेबा**स वाटलें कीं **मराठ्यांस** नमवण्यास सांपडलेली ही अत्युत्तम संधि दवडतां कामां नये. पण जरी **शिवाजी** गेला, तरी जी राष्ट्रीयपणाची **मशाल** **शिवाजीनें** आमच्या मंडळांत नुक्तीच पाजळली होती, ती **मोगलांच्या** वावटळीनें विझण्यासारखी नव्हती. १६८६ त **अवरंगझेबानें** **विजापुर**ची **अदिलशाही** बुडविली आणि १६८८ त **गोंवळकोंड्याच्या** **कुतुबशाहीं**ची समाप्ति केली. **महाराष्ट्रदेश** आणि **तंजावर** प्रांत हें **शिवाजीचें** "स्वराज्य" सोडून, बाकी सगळी **दक्षिण** **मोंगलांच्या** कबजांत गेली. तरी मराठे धीर धरून होते आणि दिवसें

दिवस वळावत चालले होते. **संभाजी** हातीं लागला, **संभाजी**चा मुलगा **अवरंगझेबा**च्या मुलीनें वाढविला, **संताजी**चा खून झाला, **राजाराम**ही वारला, तरी **ताराबाई, रामचंद्रपंत** आणि **धनाजी** या त्रिवर्गापुढें **अवरंगझेबा**चें कांहीं चालेना. अखेरीस नांवाचीही ताबेदारी **मराठे** पत्करीतना आणि **अवरंगझेबा**चें मन केवळ हात हालवीत **दिल्ली**कडे वळण्यास घेईना. जो पैसा **दिल्ली**हून रवाना होई, तो घाला घालून **मराठे** हस्तगत करून घेत. त्यामुळें पगार शिपायांस पोंचेना आणि अर्थातच शिपायांची मगरुरी वाढूं लागली. या प्रमाणें सर्वतोमुख दुर्दशा चालली असतां, इसवी शके १७०७ यासालीं **अहमदनगर** मुक्कामीं मृत्यूनें मेहेरवानी केली आणि **अवरंगझेबा**ची दरोबस्त पेंचातून सुटका झाली.

# प्रकरण ६—(अवरंगझेबाचे वंशज.)

## ( इसवी शके १७०७ पासून १८०३ पावेतों ).

१ **बहादुरशहा** ( १७०७—१७१२ )—**अवरंगझेबा**च्या पश्चात् **शहाअलम, अझीमशहा, कामबक्ष,** या तीन **अवरंगझेबा**च्या मुलांमध्यें तंटा लागला. **झुलिफकार** नांवाचा **दक्षिण**चा सुभेदार **शहाअलमा**स मिळाल्यामुळें, **अझीमशहा** आणि **कामबक्ष** हे लढाईत पडले. तेव्हां **झुलिफकारास** वजीरकी देऊन, **शहाअलमनें बहादुरशहा** नांव धारण केलें आणि गादी आक्रमण केली. याची ५ वर्षांची कारकीर्द **पंजाबां**तील **सीख** लोकां बरोबर लढण्यांत गेली. याच सुमारास **हैदराबाद**कर **निझामा**चा मूळपुरुष **निझामुल्मुल्क** आणि **अयोध्ये**च्या नवाबाचा मूळपुरुष **सादत अल्ली** हे दोघे नांवाजूं लागले. **बहादुरशहा**च्या पश्चात् **जहांदरशहा** गादीवर ब-

सला. यानें **बहादुरशहाचीं** सांपडलीं तितकीं मुलें ठार केलीं. **ब-हादुरशहाचा** नातू **फिरुकसियर** नांवाचा होता, तो मात्र **बंगाल्यांत** पळाला. यास **सय्यद हुस्सेन अली** नांवाचा **बिहार**चा सुभेदार आणि **सय्यद अबदुल्ला** नांवाचा **प्रयाग**चा सुभेदार असे दोघे मिळाले. तेव्हां बरीच फौज जमली आणि त्रिवर्ग **दिल्ली**कडे वळले. **आग्र्या**जवळ लढाई झाली, तींत **जहांदर** आणि **झुल्फिकार** हे मोड होऊन **दिल्ली**कडे पळाले. त्रिवर्ग पाठलाग करीत **दिल्लींत** शिरले. **जहांदर, झुल्फिकार** वगैरे मंडळी हातीं लागली, ती ठार करून **फिरुकसियर** गादीवर बसला. **जहांदरानें** १ वर्ष राज्य केलें.

२ **फिरुकसियर**— ( १७१३—१७१९ )—याचीं सहा वर्षे **सय्यद** बंधूंचा उठाव करण्याच्या कारस्थानांत गेलीं. अखेरीस सगळीं कारस्थानें **सय्यद** बंधूंस कळली आणि त्यांनीं तख्तावरून खालीं ओढून **फिरुकसियर**ला ठार केलें. नंतर कांहीं महिने दोन बादशहांचीं बाहुलीं खेळवून, शेवटीं **सय्यदांनीं महंमदशहास** तख्तावर बसविलें.

३ **महंमदशहा** ( १७१९—१७४८ )—**निजाममुल्मुल्क** आणि **सादत अली** या दोहोंच्या मदतीनें **महंमदशहा सय्यद** बंधूंचा उठाव करूं शकला. **हुस्सेना**चा खून होऊन, **दिल्ली** आणि **आग्रा** यांच्या दरम्यान **शहापुर** मुक्कामीं लढाई झाली तींत **अबदुल्ला** ठार झाला. पुढें **सय्यदअलीनें अयोध्या** प्रांत आणि **निजाममुल्मुल्कानें हैदराबाद**चा मुलुख हळू हळू बळकाविला. याच्या कारकीर्दींत बादशाही मुलुखावरही “ चौथ ” गोळा करण्याचा हक्क **मराठ्यांस** मिळाला. “ चौथ ”=वसुलाचा ४ था भाग. अशा प्रसंगीं **अफगाणस्थानां**तून **नादिरशहा** नांवाचा **इराण**चा बादशहा १७३९ त **दिल्लीच्या**

पादशहातीवर कोसळला. **कर्नाळ**च्या लढाईंत **मोगलां**चा पराभव झाल्यामुळें **महंमदशहा**नें कबूल केलेला पैसा उगरवण्यासाठीं **नादिर** **दिल्ली**स आला. **दिल्लीं**त असतां **नादिर** मेला अशी बातमी कोणीं गांवांत उठविली आणि त्यामुळें **दिल्ली**कर **नादिर**च्या लोकांवर तुटून पडले. तेव्हां **नादिरा**स स्वरक्षणार्थ सांपडेल त्यांची कत्तल करण्याच्या हुकुमाशिवाय दुसरा मार्ग राहिला नाहीं. जेव्हां **नादिरा**च्या शूर शिपायांनीं कत्तल चालविली, तेव्हां नादान **दिल्ली**करांचा खून उतरला आणि **महंमदशहा**नेंही कत्तल बंद करण्याविषयीं पदर पसरला. **नादिर**चा उलट हुकुम होतांच कत्तल तावडतोब बंद, इतकी **नादिर**ची स्वतःच्या लश्करांत शिस्त होती. नंतर इतका अपरंपार पैसा **नादिर**नें नेला, कीं प्रत्येक शिपायास ३ महिन्यांचा पगार बक्षीस मिळून **इराणां**तल्या रयतेस एक वर्ष जमिनीचा सारा सोडण्यांत आला.

४ **अहंमदशहा अवदाली**—**नादिरशहा**च्या मरणाच्या पश्चात् यानें **कंदाहार**चा प्रांत १७४७ त बळकाविला. पुढें **महंमदशहा**च्या पश्चात् हा सहा वेळां **हिंदुस्थानां**त आला. पहिल्या वेळेस **सरहिंद** मुक्कामीं **अहंमदशहा**चा पराभव झाला. पण १७६१ त **पाणिपत**च्या लढाईंत **अहंमदशहा**नें **मराठ्यां**स बुडविलें आणि पुष्कळ लूट आपल्या मुलखीं नेली.

५ **शहाअलम** ( १७६१–१८०३ )—यास अफगाणांनीं बराच उपद्रव दिला. त्यामुळें यानें मराठ्यांस बोलाविलें. १७७१ त **दिल्लीं**त बोलाविल्यामुळें शिरून **महादजी शिंद्या**नें **शहाअलमा**स आश्वासन दिलें. पुढें १७८८ त जरी **गुलाम कादर**नें कांहीं महिने पुंडाई करून **दिल्ली** बळकाविली, तरी लौकरच **महादजी**नें लढाईंत मोड करून **गुलाम कादरा**स यथायोग्य पारिपत्य केलें आणि **शहाअलमा**स

पुनः **दिल्ली**च्या तख्तावर बसविलें. १८०३ मध्यें **दिल्लींत इंग्रज** शिरले आणि सगळा मुलुख हस्तगत करून घेतल्यानंतर **शहाअलमास** वर्षासन करून देऊन **दिल्लींत**च रहाण्याची परवानगी दिली. या प्रमाणें **दिल्ली**च्या तख्ताची समाप्ति **इंग्रजां**कडून इसवी शके १८०३ या सालीं करण्यांत आली.

# भाग ६—( दक्षिणेंतील तीन शाह्या ).

## [ इसवी शके १४८९ पासून १६८८ पावेतों. ]

१ **चार शाह्या—वऱ्हाड, अहमदनगर, विजापुर, गोंवळकोंडें** या ठिकाणचे चार सुभेदार पहिल्यानें स्वतंत्र झाले. **अहमदनगर**चा **अहमदशहा** आणि **विजापुरचा यूसफ** हे एकाच वर्षी १४८९त स्वतंत्र झाले. **गोंवळकोंड्याचा कुतुबशहा** पुढें २२ वर्षांनीं १५१२ त "सुलतान" ह्मणवूं लागला. १५२६ पर्यंत **बेदर**चीं १ व या चार मिळून ५ शाह्या होत्या. १५२६ त **बेदर** साफ बुडाल्या नंतर ४ शाह्या राहिल्या. पुढें **वऱ्हाड**च्या शाहीचा कांहीं मुलुख **अहमदनगर**करांनीं बळकाविला, कांहीं **गोंवळकोंडें**करांनीं बळकाविला आणि **वऱ्हाड**ची शाही आटपली. **वऱ्हाड**ची शाही आटपल्या नंतर तीनच शाह्या राहिल्या. या तीन शाह्यांचा अनुक्रमें **मराठी, कानडी, तेलंगी,** या तीन मंडळांत अंमल चालू झाला. इतकेंच कीं **मराठी** मंडळाचा कांहीं भाग **अदिलशाहींत** आणि कांहीं भाग **कुतुबशाहींत** सामील झाला होता.

२ **"निझामशाही"ची थोडक्यांत हकीगत—अहमदशहा**चा बाप **निझामुल्मुल्क** हा मुळचा देशस्थ ब्राह्मण. याच्या पूर्वजांनीं पाथ्री गांवचें कुळकरण केलेलें. दुष्काळामुळें किंवा नोकरी शोधीत कि-

त्येक पाथ्रीकर ब्राह्मण **विजयनगर**करांच्या राज्यांत येऊन राहिले. **बेदर**-करांच्या **विजयनगर**करांशीं हमेश लढाया होत, त्यांच्यापैकीं एकीमध्यें एक पाथ्रीकर ब्राह्मण कैदींमध्यें होता. यास **बेदर**कर **बादशहा**नें वाटविलें आणि आपल्या मुलाच्या बरोबर जसें **आरबी** तसें **फार्सी** शिकविलें. **बेदर**करांचे पदरीं पुढें एकहजारी मिळून बादशहाचे बहिरी ससाणे ताब्यांत राहूं लागल्यामुळें, यास **बहिरी** ह्मणूं लागले. याचा खून झाल्या नंतर मुलगा **अहंमदशहा** स्वतंत्र झाला. **अहमदशहा**नें **अहमदनगर** बांधिलें आणि वसविलें. याचा मुलगा **बुऱ्हाण** गादीवर बसला, तेव्हां पूर्वाश्रमींचे **हिंदु** सोयरे भेटावयास आले आणि ह्मणूं लागले कीं **वऱ्हाड**करांपासून **पाथ्री** गांव मिळवून देण्याची तजवीज करावी. मोबदला दुसरा मुलुख देण्याचें कबूल केलें, तरी **बुऱ्हाण**चें **वऱ्हाडकर** ऐकेना. तेव्हां लढाई करून **पाथ्री** परगणा **बुऱ्हाण**नें घेतला आणि आपल्या **हिंदु** सोयऱ्यांच्या हवालीं केला. पुढें हा परगणा **अकबर** **वऱ्हाड**प्रांत सर करीपर्यंत **बुऱ्हाण**च्या **हिंदु** सोयऱ्यांच्याच ताब्यांत राहिला. **बुऱ्हाण** १५६३ त वारला. **बुऱ्हाणा**चा मुलगा **हुस्सेन** याच्याशीं **अल्ली अदिलशहा**नें आणि गोंवळकोंडेकरांनीं करार करून जंगी स्वारी केली आणि **तालकटा**च्या लढाईंत इसवी शके १५६५ या सालीं **विजयनगर**करांस साफ बुडविलें. तरी यानें व याच्या वंशजांनीं **विजयनगर**करांकडील **हिंदूं**चा छळ केला नाहीं; इतकेंच नाहीं, तर उलट त्यांस आपल्या राज्यांत त्या त्या प्रसंगीं आश्रयही थोर मन करून दिला. पुढें **अकबरा**च्या कारकीर्दींत वीरश्रीनें भरलेली **चांदबिबी** **मोगलां**शीं झुंजत असतां तिचा खून झाला आणि **अहंमदनगर** पडलें. **मोगलां**नीं **बहादुर** नांवाचा **निझामशहा** गादीवर होता, त्यास **ग्वालेर**च्या किल्यांत पाठविलें. पुढें

**मलिकंबरनें** मुसलमानांचा पक्ष ताणून दुही माजविली आणि **मोगलां**-च्या मुलुख बळकाविला. "**तूं तिमूरच्या** वंशांतल्या राजाच्या उंबरठ्यावरचा केर काढ, पण **अदिलशहाची** वजीरीकी करूं नको"—असा उपदेश मरतांना **मलिकंबरानें** आपला मुलगा **फत्तेखान** यास करून ठेविला होता. त्या उपदेशास अनुसरून **फत्तेखानानें** सवड सांपडतांच उमरावांची कत्तल केली आणि **शहाजहानास** कळविलें कीं "हें काम मी तुझ्यासाठीं केलें." पुढें **शहाजहानानें मुर्तिझा** नांवाचा **निझामशहा** गादीवर होता, त्याचा खून करण्यास सांगितलें. **फत्तेखानाची** बहीण ती **मुर्तिझाची** आई होती; इतकेंच नाहीं, तर आईच्या सांगण्यावरून कैदेंतून सुटका करून **मुर्तिझानेंच फत्तेखानास** सैनापत्य दिलें होतें! तरी निमकहरामी करून **फत्तेखानानें मुर्तिझाचा** खून केला. या प्रमाणें **मलिकंबर** आणि **फत्तेखान** या **हबशी** बापलेंकांनीं **निझामशाही** बुडविली आणि **मराठ्यांनीं** ती राखण्यासाठीं शिकस्त केली. जरी अखेरीस यश आलें नाहीं, तरी **शहाजी** वगैरे **मराठे** कर्तव्यास जागले.

**३ अदिशाहचिी थोडक्यांत हकीगत**—मूळ पुरुष **यूसफ** हा **इस्तंबुलच्या** सुलतानांच्या घराण्यांत जन्मलेला. एका मुलास मात्र जिवंत ठेवून राजवंशांतील बाकीचीं मुलें ठार करावयाचीं, हा **इस्तंबुलच्या** सुलतानांचा कायदा. या कायद्यास अनुसरून **यूसफ** ठार व्हायाचा. पण आईनें मारेकऱ्यास लांच देऊन, यास **इराणांत** लांबविलें. पुढें हा **इराणांतून दाभोळ** बंदरीं १४९८ त आला आणि **बेदरकरांचे** पदरीं राहिला. पुढें सुलतानाची बडी नोकरी सोडून **निझामुल्मुल्काची** छोटी नोकरी **यूसफनें** पत्करली, कारण सुलतानाच्या खजिनदाराशीं **यूसफचा** बेबनाव झाला. **निझामुल्मुल्काची** इतकी प्रीति बसली कीं तो **यूसफास** सख्खा भाऊ समजूं लागला व ह्मणूंही

लागला. पुढें **यूसफ** १४८९ त स्वतंत्र झाला. हा **शीया** पंथाचा होता. तरी यानें सुन्नी पंथाचा कधींही छळ केला नाहीं. **गोवें फिरंग्यांनीं** घेतलें होतें तें **यूसफानें** १५०९ मध्यें परत घेतलें. नंतर लौकरच **यूसफ** वारला. एका **मराठा** सरदाराची बहीण कैदींमधून आली होती, तिनें कांहीं दिवसांनीं धर्मांतर केलें आणि नंतर तिच्याशीं **यूसफनें** लग्न लाविलें. हिचा मुलगा **इस्मायल** झाला, तो **यूसफची** बहीण **दिलशेद आगे** हिनें वाढविल्यामुळें **दक्षिणी** लोकांचा पक्का द्वेष करणारा आणि आईच्या कह्यांत न वागणारा असा झाला. **इस्मायलाच्या** कारकीर्दीच्या आरंभी **गोवें फिरंग्यांनीं** घेऊन पुष्काळ मजबूत केलें. लौकरच एकमेकाच्या मुलुखास एकमेकाचा उपद्रव होऊं नये, या शर्तीवर **विजापुरकराचा** आणि **फिरंग्यांचा** तह झाला. **इस्मायलच्या** कारकीर्दीपासून दोन फळ्या **विजापुरीं** झाल्या—एक परदेशी लोकांची आणि दुसरी स्वदेशी लोकांची. परदेशी फळींत **फार्सी** व **तुर्क** असून, स्वदेशी फळींत जसें **दक्षिणी** व **हबशी** मुसलमान मोडत तसे हिंदूही मोडत. **इस्मायल** परदेशी फळीस उत्तेजन देणारा आणि स्वदेशी फळीची उचलबांगडी करूं पाहणारा असा होऊन गेला. हा १५३४ त वारला. याचा मुलगा **इब्राहीम** याच्या पश्चात् गादीवर बसला, तेव्हां आजीचें वजन दर्बारीं व कारभारांत विशेष पडूं लागलें. पूर्वी **फारसींत** असत, ते हिशोब याच्या कारकीर्दींत **मराठींत** ठेवण्याची वहिवाट पडली आणि दक्षिणीस—मग ते मुसलमान असोत कीं **हिंदु** असोत—चाकरी मिळून **तुर्कांस** व **फार्श्यांस** फांटा मिळूं लागला. **इब्राहिम** १५५७ त वारला. **इब्राहिमाचा** मुलगा **अल्ली इब्राहिमाच्या** पश्चात् गादीवर बसला. हा एकदा **विजयनगरीं** गेला, तेव्हां **रामराजाचा** मुलगा नुकाच वारला होता म्हणून **रामराजाची** बायको **अल्लीस** मुलगा

समजूं लागली. धर्मसंबंधानें **हिंदूंचे** मन इतकें थोर असतें. पण **विजयनगराहून** निघाला तेव्हां **रामराजा** खासा पोंचवायास आला नाहीं ह्मणून या **विजापुरच्या** सर्पानें दावा धरिला आणि **विजयनगरकरांस** बुडविण्याचें मनांत आणिलें. नंतर **अल्लीनेंच** **निझामशहा** आणि **कुतुबशहा** या दोघांस आपल्या मसलतींत ओढून शेवटीं **विजयनगर** **तालकटच्या** लढाईंत साफ बुडविलें. **अल्लीस** धर्मवेड बरेंच हात. **विजापुरकरांमध्यें** दुसऱ्या कोणासही धर्मवेड दिसत नाहीं. हा १५६९ त वारला. नतर **अल्लीचा** पुतण्या **इब्राहिम** गादीवर बसला. **इब्राहिमाचा** आणि **ग्यासुद्दीन** नांवाचा **इराणी** पंडित होता त्याचा खालीं लिहिल्या प्रमाणें एकदा संवाद झाला. **इब्राहिम**—मुसलमानांमध्यें उंच कोण—**शीया** कीं **सुन्नी**? **ग्यासुद्दीन**—देव हा बादशहा आहे; पाहिजे त्या दरवाज्यानें त्याच्याकडे जातां येतें.

**इब्राहिम**—सर्वांत उत्कृष्ट धर्म कोणता?

**ग्यासुद्दीन**—देवास भिऊन चालणारा मनुष्य श्रद्धापूर्वक जो धर्म पाळतो, तो धर्म सर्वांत उत्कृष्ट धर्म.

**इब्राहिम** १६२६त वारला. पुढें **इब्राहिमाचा** मुलगा **महंमद** गादीवर बसला, तो १६६०त वारला. पुढें **महंमदाचा** मुलगा **अल्ली** गादीवर बसला, तो १६७२त वारला. पुढें **अल्लीचा** मुलगा **शिकंदर** गादीवर बसला. १६८६त याची कारकीर्द **विजापुर** बुडवून **अवरंगझेबानें** संपविली.

४ **"कुतुबशाही"ची थोडक्यांत हकीकत—कुतुबशहा** हा मुळचा **तुर्की** गुलाम. हा १५१२त **बेदरकरांपासून** स्वतंत्र झाला. १५८१त एक **कुतुबशाही** सुलतान गादीवर बसला, त्यानें **गोंवळकोंड्याची** हवा मानत नाहीं असें पाहून एक नवीन नगर वसविलें आणि

**भागा** नांवाची नाटकशाळा होती तिच्यावरून **भागानगर** असें त्या नगराचें नांव ठेविलें. आपल्या लोकांमध्यें **भागानगर** हेंच नांव प्रसिद्ध असून मुसलमान यास **हैदराबाद** ह्मणतात. पुढें **अबदुल्ला** नांवाचा सुल्तान झाला त्याच्यापासून खंडणी घेण्यास **शहाजहानानें** आरंभ केला. **अबदुल्ला अवरंगझेबाचे** कारकीर्दीचे आरंभीं वारला. **अबदुल्ला**च्या पाठीं जांवई **अबुहुसेन** गादीवर बसला, कारण **अबदुल्लास** मुलगा नव्हता. **अबुहुसेनास** आपल्या बखरांमध्यें **तानशहा** ह्मटलेलें असतें. **अबुहुसेना**चा कारभार कांहीं वर्षांनीं **मादण्णा** नांवाचा ब्राह्मण पाहूं लागला. **मादण्णानें** केवळ स्वामीच्या व लोकांच्या हिताकडे लक्ष देण्याचें चालविलें. पण अंदाधुंदी हमेश प्रिय असणाऱ्या मुसलमानांस ही **मादण्णा**ची चालणूक पसंत पडली नाहीं आणि **अबुहुसेना**च्या सासूची एक फळी होऊन मुसलमानांनीं **मादण्णा**ची कोणत्या तरी प्रकारें उचलबांगडी करण्याचा निश्चय केला. अखेरीस **मादण्णा**चें डोकें कापलें जाऊन **कुतुबशाहीस** ऊर्ध्व लागला. लौकरच १६८८ त **कुतुबशाही**ची समाप्ति **अवरंगझेबानें** केली.

# मराठा हैस्कूल.

## गिरगांव, मुंबई.

(" म्याट्रिक " पर्यंत किंवा " स्कूल फैनल " पर्यंत शिकवणारी खाजगी शाळा ).

ही शाळा इसवी शके १८८६ या सालीं जून महिन्याच्या १ ल्या तारिखेस स्थापन झाली. १८८७, ८८, ८९, ९०, ९१ या सालीं अनुक्रमें ६, ६, ९, ४, ८, असे विद्यार्थी या शाळेंतून " म्याट्रिक्युलेशन "च्या परीक्षेंत पसार झाले. १८८८ सालीं जगन्नाथ शंकरशेटची पहिली स्कालरशिप या शाळेंतील विद्यार्थी विष्णु परशुराम रावेरकर यानें मिळविली. १८९१ सालीं ' म्याट्रिक " परीक्षेंत पसार झालेल्या उमेदवारांमध्यें पहिलें नांव आलेला विद्यार्थी रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे याच शाळेंतील होता.

## १८· · ·मॅट्रिक' ची परीक्षा व 'मराठा हैस्कूल.'

वरील · · · १६ उमेदवार पाठविले. त्यांपैकीं ९ पसार झाले. त्यांच्या · · · आंकडा, नांवें व गुणांची संख्या—

| नां. आं. | नांव. | गुण (एकंदर ६२५) |
|---|---|---|
| १२ | भागवत, रामचंद्र भास्कर | ४१० |
| ९० | रानडे, नारायण गणेश | ३६९ |
| ७२ | भिडे, बाळकृष्ण अनंत | ३·६ |
| ३८० | रानडे, नारायण सदाशिव | २९० |
| ९९४ | कौशिक, सुबराव शेषगिरी | २६५ |
| ६१४ | अवरंगाबादकर, अण्णाजी केशव | २६३ |
| ६२१ | रायकर, जनार्दन गोविंद | २६२ |
| ६२८ | नाईक, महादेव लाडोबा | २६२ |
| १०४९ | मराठे, गोपाळ केशव | १९८ |

या वर्षी वरील परीक्षेस २९७० उमेदवार आले, त्यांपैकीं १०५४ पसार झाले.

## १८९२ ची 'यु. एस्. एफ्.' ची परीक्षा व 'मराठा हैस्कूल.'

वरील परीक्षेस ११ उमेदवार पाठविले. त्यांपैकीं ४ पसार झाले. त्यांच्या नांवाचा आंकडा, नांवें व गुणांची संख्या—

| नां. आं. | नांव. | गुण ( एकंदर ६९० ) |
|---|---|---|
| ९३ | हळदणकर, विष्णु रामचंद्र | ४३४ |
| ११० | रानडे, नारायण गणेश. | ४१९॥ |
| १८२ | जोशी कृष्णाजी रघुनाथ. | ३८२ |
| २८२ | पेठे, विष्णु गणेश. | ३४१ |

या वर्षी वरील परीक्षेस सुमारें १५२१ उमेदवार आले, त्यांपैकीं ३९९ पसार झाले.

नं. ३३

# हिंदुस्थानाचा छोटा इतिहास.

## खंड ३ व ४.

हा

लिहिणार

**राजाराम रामकृष्ण भागवत**

आणि

छापणार

**" ब्राह्मण " छापखाना**

गिरगांव, मुंबई.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

शालि० शके १८१५, कार्तिक.

इसवी शके १८९३, डिसेंबर.

**किंमत ५॥ आणे, टपाल हांशील अर्धा आणा.**

हीं पुस्तकें " ब्राह्मण " छापखान्यांत गिरगांवामध्यें मिळतील.

# हिंदुस्थानाचा छोटा इतिहास.

## खंड ३ [ मराठी अंमल ].

## भाग १ [ स्वतंत्र अंमल ].

## प्रकरण १ ( शिवाजी ).

( शालि०शके १५४९ पासून १६०२ पावेतों ).

( इसवी शके १६२७ पासून १६८० पावेतों ).

१ **शिवाजीची पूर्वपीठिका**—**शिवाजी**च्या आजाचें नांव **मालोजी भोंसले** आणि आजीचें नांव **दीपाबाई**. हीं उभयतां **अहमदनगर**करच्या रयतेपैकीं. **अहमदनगर**करांमध्यें **हिंदुं**शीं ज्यांचा बेबनाव, असा एकही सुलतान झाला नाहीं. **निझामशाहीं**त जशी मुसलमानांची **हिंदूं**शीं भाईबंदी होती, तशीच **हिंदूं**ची मुसलमानांशीं होती. **शहासरीफ** नांवाचा मुसलमान साधु होता, त्यानें अशीर्वाद दिल्याप्रमाणें **दीपाबाई**स दोन मुलगे झाले आणि त्या दोघांचीं नांवें तिनें अनुक्रमें **शहाजी** आणि **सरफजी** अशीं ठेविलीं. **शहाजीनें** **निझामशाही**च्या अगदीं अखेरीस आपली शर्थ केली. पण दैव प्रतिकूळ पडलें. शेवटीं **निझामशाही** साफ बुडाल्यानंतर **महंमद अदिलशहा**चा **मुरारपंत** नांवाचा ब्राह्मण कुळकारभारी होता, त्याचे द्वारें **शहाजी विजापुर**करांकडे राहिला. **निझामशाही**च्या बाजूनें लढत असतां आपली बायको **जिजाबाई** गरोदर असल्यामुळें **शहाजीनें**

एके प्रसंगीं **जुन्नराजवळ शिवनेरी** किल्ल्यांत ठेविली होती, ती त्याच किल्ल्यांत शालि०शके १५४९ प्रभवनामसंवत्सरे **वैशाख** शुद्ध २ या दिवशीं प्रसूत होऊन **शिवाजी** जन्मला.

२ **शिवाजीची अफझुलाच्या वधापर्यंतची हकीकत**—अठरा वर्षें पुरीं झालीं न झालीं इतक्यांत **शिवाजीनें तोरणा** किल्ला आपल्या ताब्यांत घेतला. हळू हळू **कल्याणभिवंडी**पर्यंत मुलुख **शिवाजी**च्या ताब्यांत आला. याप्रमाणें **शिवाजीनें** बराच मुलुख बळकाविलेला पाहून, **शहाजीची** आंतून **शिवाजीस** फूस असावी अशी शंका **विजापुर**करांस आली आणि त्यांनी **शहाजीस** अंधारकोठडींत टाकलें. तेव्हां **दिल्ली**पतीची नोकरी पत्करून **शहाजहानाचें** आज्ञापत्र **शिवाजीनें** मिळविलें आणि आपल्या बापाची अंधारकोठडीतून सुटका केली. लौकरच **महंमद अदिलशहा** वारला. मुलगा **अल्ली** लहान होता ह्मणून **महंमद अदिलशहाची** बायको कारभार पाहूं लागली. तिनें "**शिवाजीस** बुडविण्याचा विडा कोण उचलतो" असा एकदा दर्बारांत सवाल केला. तेव्हां **शिवाजीस** कैद करून आणण्याची किंवा **शिवाजीचें** डोकें कापून आणण्याची प्रतिज्ञा **अफझुलानें** केली. **शिवाजीचा** वडील बंधु **संभाजी** नांवाचा होता, त्याचा प्राण पूर्वी याच **अफझुलानें** दग्यानें घेतला होता. **अफझुल** बांध्यानें धिप्पाड होता तसाच बळानें राक्षस होता. वामनमूर्ति **शिवाजीस** सहज पकडतां येइल, असें त्यास वाटलें. **शिवाजी**मध्यें शेरास सव्वाशेर मिळून अखेरीस शालि० १५८१ **विकारी** नाम संवत्सरे **मार्गशीर्ष** शुद्ध पंचमी शुक्रवार या देवीच्या दिवशीं **अफझुलाचें** डोकें **प्रतापगडा**वरील देवीच्या पायांवर वाहाण्यांत आलें.

३ **शिवाजीस अभिषेक होई पर्यंतची हकीकत**—पुढें **शा-**

हिस्तेखानास **अवरंगझेबानें** **शिवाजी**वर पाठविलें. एकाएकीं रात्रीं दहाबारा लोकांनिशीं **शिवाजीनें** इसवी १६६२त हल्ला करून **शाहिस्ते**-स पळवून लाविलें. पुढें **जयपुर**कर **जयसिंगास** **दिल्ली**पतीनें **शिवा**-**जी**वर पाठविलें आणि **शिवाजी**स बुडवून **विजापुर**करावर स्वारी कर-ण्याचा हुकूम फर्माविला. **जयसिंग मराठ्यांचें** शौर्य पाहून थक्क झाला आणि **मराठ्यां**च्या मदतीनें **विजापुर**करांवर स्वारी करण्याचा विचार त्यानें केला. **मराठ्यां**च्या लश्करानिशीं **शिवाजी** बरोबर होता, ह्मणून **जयसिंगा**ची या स्वारींत जिकडे तिकडे फत्ते होत गेली. **जय**-**सिंगानें** पत्रद्वारा मोठी तारीफ केल्यामुळें, **अवरंगझेबानें** **शिवाजी**स **दिल्ली** मुक्कामीं बोलाविलें. **शिवाजी** १६६६ त **दिल्ली**मुक्कामीं गेला. **शिवाजी**चा करावा तसा आदर सत्कार न करतां, उलट नजर कैदेंत ठेवण्यास हुकुम **अवरंगझेबानें** केला. असा दगा **अवरंगझेबानें** केला, तरी एके दिवशीं पेटाऱ्यांतून पळून **शिवाजीनें** आपली अक्कल कांकणभर जास्त होती ती दाखविली आणि अर्थातच **अवरंगझेबास** ओंठ चावीत बसावें लागलें. पुढें **शिवाजी** यात्रा करीत आपल्या मुलुखीं आला. पुढें **जयसिंगानें** **मोगलां**स देवविलेले **सिंहगड** वगैरे किल्ले **शिवाजीनें** पुनः काबीज केले. **साल्हेरी**स **मोगलांनीं** वेढा घातला होता तो **मराठ्यांनीं** मोठा पराक्रम करून उठविला. इकडे **मोगलां**बरोबर तह होतो, इतक्यांत **विजापुर**चा **अल्ली आदिलशहा** वारला आणि **अबदुल करीम** सेनापति **शिवाजी**स बुडविण्यासाठीं **मराठी** मुलुखांत एकदम शि-रला. **जेसरी**च्या लढाईत **मराठ्यांनीं** **अबदुल करीमा**स व त्याच्या **पठा**-**णां**स धुळीस मिळविलें. या प्रमाणें भर दुपारीं लढाई मारून जसें साल्हेरी मुक्कामीं **मोगलां**स तसेंच **जेसरी** मुक्कामीं **पठाणां**स दातीं तृण धरून लावण्याचें अवसान **मराठ्यां**मध्यें पूर्णपणें आलें असें जेव्हां **शि**-

**वाजीनें** पाहिलें, तेव्हां ‘ छत्रपति ’ असा किताब धारण करून **शालि०** शके १५९६ **ज्येष्ठ** शुद्ध त्रयोदशी या दिवशीं **रायगड** मुक्कामीं अभिषेक करून घेतला.

४ **शिवाजीच्या मरणापर्यंतची हकीगत**—पुढें **भागानगरक**राशीं तह करून **विजापुर**कराचा **कर्नाट**कांतील मुलुख काबीज करण्यासाठीं **शिवाजीनें** खांसा स्वारी केली. या स्वारींत **चंदी**चा मजबूत किल्ला आणि दुसरा बराच मुलुख **मराठ्यां**च्या कबजांत आला. इतक्यांत **विजापुरीं** घोटाळा माजल्यामुळें काबीज केलेल्या मुलखाची व्यवस्था लावण्यासाठीं **रघुनाथपंत हणमंते** आणि हंबीरराव सेनापती या उभयतांस ठेऊन **शिवाजी** लागलाच आपल्या मुलुखीं आला. परत आल्यानंतर पुष्कळ व्यवस्था केली; बाकी राहिलेली करणार, इतक्यांत अकाळीं ज्वर येऊन **महाराष्ट्र** मंडळाच्या दुर्दैवानें आपल्या वयाच्या त्रेपन्नावे वर्षी शालि०शके १६०२ **रौद्र** नाम संवत्सरे **चैत्र** शुद्ध १५ रविवार या दिवशीं रायगडीं दोन प्रहरीं हा पुण्यश्लोक इह लोक सोडून गेला.

# प्रकरण २ [ संभाजी ].

## ( इसवी शके १६८० पासून १६८९ पावेतों ).

१ “ **संभाजी** ” **गादीवर बसतो**—एकदा **मोगलां**कडे पळून गेल्यामुळें **शिवाजीनें पन्हाळया**च्या किल्ल्यामध्यें **संभाजीस** नजर कैदेंत ठेविलें. अर्थातच **शिवाजी**चे शेवटचे प्रसंगीं **संभाजी** जवळ नव्हता. ह्मणून **राजारामास** प्रधानांच्या मसलतीनें गादी मिळाली. पण **शिवाजी**च्या मरणाची बातमी कळतांच **संभाजी** नजर कैदेंतून संधि

पाहून पळाला तो **हंबीरराव** सेनापतीस जाऊन मिळाला. तावड-तोब कांहीं शिपायांनिशीं येऊन **राजारामास** बंदीवान् केलें आणि **संभाजीनें** गादी आपण बळकाविली.

२ **संभाजीचा कैद होई पर्यंतचा क्रम आणि शेवट**—लौकरच **संभाजीचा** आणि **गोवेंकराचा** तंटा चालू झाला. **मोगलांस** व **पठाणांस मराठ्यांनीं** त्या त्या प्रसंगीं रणांगणीं वांकवलें होतें. पण **यूरोपांतल्या** गोरे लोकांशीं मुळींच प्रसंग पडला नव्हता, तो **संभाजीच्या** कारकीर्दींत पडला आणि **मराठे** कसास उतरले. २९००० काळे आणि १२०० गोरे घेऊन **फिरंगी संभाजीच्या** मुलखांत शिरला, तो जसा देवळें फोडून तसा **हिंदूंस** बाटवून लौकरच **फोंड्याच्या** किल्ल्यापुढें येऊन बसला. **संभाजी** वेढा उठविण्यास आला, तो ८००० स्वार आणि १४००० प्यादे घेऊन आला. **मराठ्यांचे** नांवाचा बराच वचक पडलेला होता आणि **संभाजी** शूरही तसाच होता. म्हणून **फिरंगी** पाठीं हटूं लागला. पुढें **कुंभारजूं** मुक्कामीं पोंचेपर्यंत सर्सामानानिशीं तोफाही **मराठ्यांनीं** घेतल्या; इतकेंच नाहीं, तर २००, गोरे व एक हजार काळे ठार झाले, तेव्हां **गव्हर्नरसाहेब** आपल्या मुलखीं सुरक्षित आले. पुढें १६८४च्या सुमारास तहाचें बोलणें **फिरंग्यानें** चालविलें. १६८३ त खांसा **दिल्लीपति मराठ्यांस** बुडविण्यासाठीं **दक्षिणेंत** आला. एकदां **विशाळगडीं** चैनबाजींत असतां **संभाजीवर मोगलांनीं** छापा घातला आणि त्यास कैद करून नेलें. पुढें **अवरंगझेबानें** हालहाल करवून **संभाजीस** मारविलें.

## प्रकरण ३ (राजाराम).

### ( इसवी शके १६८८ पासून १६९९ पावेतों. )

**वाजीनें** पाहिलें, तेव्हां ‘ छत्रपति ’ असा किताब धारण करून **शालि०** शके १५९६ **ज्येष्ठ** शुद्ध त्रयोदशी या दिवशीं **रायगड** मुक्कामीं अभिषेक करून घेतला.

४ **शिवाजीच्या मरणापर्यंतची हकीगत**—पुढें **भागानगर**कराशीं तह करून **विजापुर**कराचा **कर्नाट**कांतील मुलुख काबीज करण्यासाठीं **शिवाजीनें** खांसा स्वारी केली. या स्वारींत **चंदी**चा मजबूत किल्ला आणि दुसरा बराच मुलुख **मराठ्यां**च्या कबजांत आला. इतक्यांत **विजापुरीं** घोटाळा माजल्यामुळें काबीज केलेल्या मुलखाची व्यवस्था लावण्यासाठीं **रघुनाथपंत हणमंते** आणि हंबीरराव सेनापती या उभयतांस ठेऊन **शिवाजी** लागलाच आपल्या मुलुखीं आला. परत आल्यानंतर पुष्कळ व्यवस्था केली; बाकी राहिलेली करणार, इतक्यांत अकाळीं ज्वर येऊन **महाराष्ट्र** मंडळाच्या दुर्दैवानें आपल्या वयाच्या त्रेपन्नावे वर्षीं शालि०शके १६०२ **रौद्र** नाम संवत्सरे **चैत्र** शुद्ध १५ रविवार या दिवशीं रायगडीं दोन प्रहरीं हा पुण्यश्लोक इह लोक सोडून गेला.

## प्रकरण २ [ संभाजी ].

### ( इसवी शके १६८० पासून १६८९ पावेतों ).

१ **“ संभाजी ” गादीवर बसतो**—एकदा **मोगलां**कडे पळून गेल्यामुळें **शिवाजीनें पन्हाळ्या**च्या किल्लयामध्यें **संभाजीस** नजर कैदेंत ठेविलें. अर्थातच **शिवाजी**चे शेवटचे प्रसंगीं **संभाजी** जवळ नव्हता. ह्मणून **राजारामास** प्रधानांच्या मसलतीनें गादी मिळाली. पण **शिवाजी**च्या मरणाची बातमी कळतांच **संभाजी** नजर कैदेंतून संधि

पाहून पळाला तो **हंबीरराव** सेनापतीस जाऊन मिळाला. तावड-तोब कांहीं शिपायांनिशीं घेऊन **राजारामास** बंदीवान् केलें आणि **सं-भाजी**नें गादी आपण बळकाविली.

२ **संभाजीचा कैद होई पर्यंतचा क्रम आणि शेवट**—लौकरच **संभाजीचा** आणि **गोवें**कराचा तंटा चालू झाला. **मोगलांस** व **प-ठाणांस मराठ्यांनीं** त्या त्या प्रसंगीं रणांगणीं वांकवलें होतें. पण **यूरोपांत**ल्या गोरे लोकांशीं मुळींच प्रसंग पडला नव्हता, तो **संभा-जी**च्या कारकीर्दींत पडला आणि **मराठे** कसास उतरले. २५००० काळे आणि १२०० गोरे घेऊन **फिरंगी संभाजी**च्या मुलखांत शि-रला, तो जसा देवळें फोडून तसा **हिंदूं**स बाटवून लौकरच **फोंड्या** किल्ल्यापुढें येऊन बसला. **संभाजी** वेढा उठविण्यास आला, तो ८००० स्वार आणि १४००० प्यादे घेऊन आला. **मराठ्यांचे** नांवाचा बराच वचक पडलेला होता आणि **संभाजी** शूरही तसाच होता. ह्मणून **फिरंगी** पाठीं हटूं लागला. पुढें **कुंभारजूं** मुक्कामीं पोंचेपर्यंत सर्स-मानानिशीं तोफाही **मराठ्यांनीं** घेतल्या; इतकेंच नाहीं, तर २०० गोरे व एक हजार काळे ठार झाले, तेव्हां **गव्हर्नरसाहेब** आपल्या मुलखीं सुरक्षित आले. पुढें १६८४च्या सुमारास तहाचें बोलणें **फिरंग्यानें** चालविलें. १६८३ त खांसा **दिल्लीपति मराठ्यांस** बुडविण्यासाठीं **दक्षिणेंत** आला. एकदां **विशाळगडीं** चैनबाजींत असतां **संभाजी**वर **मोगलांनीं** छापा घातला आणि त्यास कैद करून नेलें. पुढें **अवरंगझे-बा**नें हालहाल करवून **संभाजीस** मारविलें.

## प्रकरण ३ (राजाराम).

**( इसवी शके १६८८ पासून १६९९ पावेतों. )**

१ **राजारामाची कारकीर्द**—लौकरच **रायगड** पडला, मराठ्यांस विसांवाही खाण्यास ठिकाण नाहीं अशी स्थिति झाली आणि **शिवाजीचे** सगळे श्रम वायां गेल्याचा रंग दिसूं लागला. पण **रामचंद्र निळकंठ, प्रल्हाद निराजी, संताजी घोरपडे, धनाजी जाधव** या चार मजबूत खांबांवर सगळा भार पडला आणि त्यामुळें मराठ्यांची स्वातंत्र्य-रूपी इमारत धडधडली नाहीं. **मराठ्यांची** गादी **चंदी चंदावराकडे** गेली आणि हुजूर **प्रल्हाद**पंताची नेमणूक होऊन, **महाराष्ट्र** मंडळांतील सर्व प्रकारची व्यवस्था एकट्या **रामचंद्र**पंताच्या माथ्यावर राहिली. **चंदीस मोगलांचा** वेढा पडला. पण **खोवरेपाकच्या** लढाईत मोठा पराक्रम करून **संताजीनें चंदीचा** वेढा उठविला. लौकरच **संताजीचा** खून झाला आणि चार खांबांपैकीं एक खांब जमीनदोस्त झाला. पुढें कांहीं महिन्यांनीं **चंदीचा** किल्ला पडला, त्या सुमारास **प्रल्हाद** पंताचाही अस्त झाला आणि दोनच खांब बाकी राहिले. **चंदीचा** किल्ला पड-ण्याचे पूर्वी **राजाराम** कोणासही न समजतां पळाला, तो **महाराष्ट्रांत** येऊन पोंचला. लौकरच **सिंहगडीं १६९९त राजराम** वारला.

## प्रकरण ४ (दुसरा शिवाजी)

१ **दुसरा शिवाजी**—**राजारामाच्या** पश्चात् **राजारामाचा** मुलगा **शिवाजी** यास गादी मिळाली आणि **शिवाजीची** आई ताराबाई हिचे हातीं राज्यकारभार आला. **रामचंद्र** पंतास फितविण्याचा यत्न **अवरंग-झेबानें** केला, पण तो सफळ झाला नाहीं. **रायगड** पडला त्या प्रसंगीं **संभाजीचा** मुलगा **मोगलांच्या** हातीं लागला, तो **अवरंगझेबाच्या** मुलीनें पोटच्या पोराप्रमाणें वाढविला होता. त्या मुलास **अवरंगझेब** "शाहू"=साव, ह्मणे; कारण **शिवाजीस** " चोर " समजे. या काळीं

शाहूस **मराठ्यां**मध्यें पाठवून दुफळी करण्याचीही खटपट **अवरंगझेबानें** केली. " नांवानें ताबेदारी कबूल करावी. म्हणजे **शाहूस दक्षिण**ची सुभेदारी देण्यांत येऊन **मराठ्यांस** पुष्कळ मुलुख मिळेल " अशा अर्थाचा निरोप **अवरंगझेबानें मराठ्यांस** पाठविला. कोणत्या तरी प्रकारें नांव राखण्यासाठीं **अवरंगझेब** पहात होता. पण **मराठ्यांनीं** नांवाचीही ताबेदारी पत्करण्याचें नाकबूल केलें आणि शाहूस **दिल्ली**पतीकडे परत जावें लागलें. जो गड **मोगल** घेत तोच **मराठे** दुसरे आठवड्यांत काबीज करीत. दाणा व पैसा **हिंदुस्थानां**तून येई, तो छापा घालतांच **मराठ्यांचे** हातीं लागे. याप्रमाणें सर्व प्रकारें दुर्दशा झाली असतां १७०७त **अहमदनगरीं अवरंगझेबा**चा शेवट झाला. **अवरंगझेबा**च्या पश्चात् **झुल्फिकारा**च्या मसलतीनें **शहा अलमनें दक्षिण**ची सुभेदारी देऊन **शाहूस** सोडिलें आणि प्रसंगीं मुलुख वाढवण्याचेंही वचन दिलें. **शाहूस** कित्येक लुटारू सरदार येऊन मिळाले. तरी **ताराबाई** कचली नाहीं. पण निमकहरामपणा करून एकाएकीं **धनाजी** लढाई न मारतां सगळें लश्कर घेऊन **शाहूकडे** गेला तेव्हां **ताराबाई**चा आणि **रामचंद्र**पंताचा निरुपाय झाला. **कोल्हापुर**कर **ताराबाई**चे वंशज असून, **रामचंद्र**पंताचे वंशज **कोल्हापुर**करांचेच पदरीं आजूनही आहेत. हे हल्लीं **बावडेकर** या नांवानें प्रसिद्ध आहेत.

# भाग २ ( तावेदारीचा अंमल. )

## प्रकरण १ ( शाहूची कारकीर्द ).

**( इसवी शके १७०८ पासून १७४८ पावेतों ).**

१ **पेशव्यांचा मूळ पुरुष—शाहू**मध्यें कर्तबगारी बिलकुल नव्हती,

कारण जनानखान्यांत वाढलेला. **शिवाजी**चे अभिषेकापासून "छत्रपती"जवळ आठ "प्रधान" आणि नववा "चिटणीस" मिळून नऊ बडे कारभारी असत. **राजारामा**चे कारकीर्दींत "प्रतिनिधी" हें आठही "प्रधानां"च्या वरचें पद नवीनच करून, तें **प्रल्हाद**पंतास देण्यांत आलें. या प्रमाणें **राजारामा**चे कारकीर्दीपासून पासून "छत्रपती"चे दर्बारीं १० बडे कारभारी झाले. **शाहूनें दिल्ली**पतीकडून सुभेदारी पहिल्यानें मिळविली आणि नंतर लौकरच सातारा मुक्कामीं अभिषेक करून घेऊन "छत्रपति" पदही जोडले. त्यामुळें हळू हळू दहा बडे कारभारी नेमण्यांत आले. पेशवे, सुरनीस किंवा अमात्य, वांकनीस किंवा सचिव, सेनापति, डबीर, सुमंत, न्यायाधीश, पंडितराव हीं आठ "प्रधानां"चीं नांवें. १७१४ त **बाळाजी विश्वनाथा**स 'पेशव्या"चा हुद्दा **शाहूनें** दिला. हा पेशव्यांचा मूळ पुरुष. **शाहू** "दक्षिणें"त आल्या नंतर कांहीं वर्षे लोटलीं आणि **बहादुर**शहाच्या पश्चात् **दिल्लींत** मोठा घोटाळा माजला. **राजारामा**च्या कारकीर्दीतील **शंकराजी मल्हार** नांवाचा सचिव काशी मुक्कामीं एकान्त वासांत होता त्यास हा घोटाळा पाहून एकान्त वास आवडेनासा झाला आणि **मराठ्या**चा फायदा करून देण्याचा निश्चय त्यानें केला. **सय्यद हुसेन अल्ली** यास **मराठ्यां**च्या मदतीनें घोटाळा मोडून पादशाहातींत व्यवस्था लावण्याची मसलत **शंकराजीनें** दिली, ती पसंत पडून **शंकराजी**सच **हुसेन अल्लीनें** शाहूच्या दरबारीं रवाना केलें. याप्रमाणें **शंकराजी**च्या मार्फतीनें **मोगलांचें** आणि **मराठ्याचें** सख्य झालें. या सख्यामुळें **फिरुकशियर** आपला द्वेष करूं लागला असें जेव्हां दिसलें, तेव्हां **मराठ्यांची** फौज बरोबर घेऊन **हुसेनअल्ली दिल्ली**कडे वळलों. **मराठ्यांची** फौज "सेनापति" **खंडेराव दांभाडे** याच्या आज्ञेंत असून **शाहूनें** **बाळाजी**सही बरोबर धाडलें होतें. **दि-**

ह्ली मुक्कामीं **मराठ्यांच्या** मदतीनें **हुसेनअल्लीची** फत्ते झाली आणि **फिरुकशियर** १७१८ त पदच्युत झाला. गादी **महंमदशहास** मिळाली आणि **महंमदशहानें हुसेन अल्लीनें** केलेल्या करारा प्रमाणें १७१८त " चौथ " वसूल करण्याची सनद **मराठ्यांस** दिली. **दिल्लीहून** परत येतांना **शाहूची** आई आणि बायको अशा उभयतांस **मराठ्यांनीं** आपणांबरोबर घेतलें आणि **सातारा** मुक्कामीं आणिलें. नंतर वसूल गोळा करण्याची नवीन पद्धति योजिली होती, ती **बाळाजीनें शाहूची** आज्ञा घेऊन सुरु केली. नंतर लौकरच १७२०त **बाळाजी** वारला. हा हुशार, धोरणी आणि स्वामिभक्त असा " पेशवा " झाला.

२ **बाजीराव** [ १७२०—१७४० ]—आरंभीं **श्रीपतराव** " प्रतिनिधि " आणि **बाजीराव** " पेशवे " या दोहोंचें विशेष वजन **शाहूचे** दर्बारीं होतें. **श्रीपतरावाचें** धोरण निराळें होतें, **बाजीरावाचें** धोरण निराळें होतें. " **महाराष्ट्र**मंडळांत नीट व्यवस्था लावून नंतर **नर्मदेच्या** उत्तरेस चाललेल्या घोटाळ्यांत हात घालणें"—ही **श्रीपतरावा**-मसलत. "**नर्मदेच्या** उत्तरे कडील वहात्या गंगेंत हात धुण्याचें काम पहिल्यानें करून **महाराष्ट्र** मंडळांतील व्यवस्था लांबणीवर टाकणें"—ही **बाजीरावाची** मसलत **शाहूस** पसंत पडली आणि तेणेंकरून **राजारामाचे** कारकीर्दीपासून माजत आलेल्या **मराठ्यांचा** लुटारूपणावर भर पडली. **बाजीरावानें माळव्यावर** स्वारी केली. **माळव्यांतून बाजीरावास** पिटाळून लावण्याचा हुकुम **महंमदशहानें निझामुल्मुल्कास** केला. पण **बाजीरावानें** मोठ्या लश्करी धोरणानें **भूपाळा** जवळ चौतर्फा **निझामास** घेरून, **सिरंज** मुक्कामीं १७३८त तह करण्यास लाविलें. या तहा अन्वयें **माळवाप्रांताची** आणि **नर्मदा** नदीपासून **चंबळा** नदीपर्यंत मुलुखाची सुभेदारी **बाजीरावास** मिळावी. याच सुमारास **बाजीरावाचा** भाऊ **चिमणाजी आप्पा** यानें **फिरंग्यांपासून**

**वसई** काबीज केली. लौकरच **बाजीराव** वारला. **बाजी**रावाचें लष्करी धोरण विलक्षण होतें. कितीही विघ्नें आलीं, तरी त्यांचा निरास करून न थकतां पकडलेल्या दिशेनें जाण्याचा गुणही **बाजीरावा**मध्यें विशेष वास करीत होता.

३ " **बाळाजी बाजीराव** " उर्फ " **नानासाहेब** " (१७४० ]
**बाजी**रावाचे दोन मुलगे- **बाळाजी** आणि **राघोबा**. **नानासाहेबास** " पेशवाई" मिळूं नये, ह्मणून **वऱ्हाड**चा सुभेदार **रघोजी भोंसला** यानें खटपट चालविली, पण ती सफळ झाली नाहीं, आणि **नानासाहेबास** पेशवाई मिळाली. **शाहू दिल्ली**पतींचा ताबेदार होता, ही गोष्ट लक्षांत ठेवून, **शाहूनें** दिलेली पेशवाई मंजूर केल्याची सनदही **नानासाहेबानें दिल्ली**पती कडून आणविली आणि आपली पेशवाई कायम केली. पुढें **शाहू** १७४८त वारला. या प्रसंगीं **नानासाहेबानें शाहूची** पट्टराणी **सकुवार**बाई हीस सती जाणें भाग पाडलें. "मुख्य कारभार तुह्मीं चालवून **सातायांत** छत्रपतीस नामधारी करून ठेवावें अशा अभिप्रायाची **शाहूच्या** सहीची यादी **नानासाहेबानें** लौकरच लोकांपुढें ठेविली आणि **साताऱ्याहून** राजधानी पुणें मुक्कामीं आणिली.

## प्रकरण २ (" पेशवाई " किंवा " ब्रह्मवादशाही "]

### ( इसवी शके १७४८ पासून १८१८ पावेतों. )

१ **नानासाहेब** (१७४८–१७६१)—**चिमणाजी आप्पा नानासाहेबास** " पेशवाई " मिळाल्यानंतर लौकरच वारला. **चिमणाजीचा** मुलगा **सदाशिव**राव ऊर्फ **भाऊसाहेब** हा मोठा शूर होता. **भाऊसाहेबानें उदगीर**च्या लढाईंत **सलाबतजंग** आणि **निजाम अल्ली**

या दोहोंचा मोड करून बराच मुलुख मिळविला. **राघोबानें** लावलेला "पेशवाई"चा बावटा कांहीं दिवस **लाहोर** मुक्कामीं डोलला. पण त्यामुळें **अहमदशहा अबदाल्लीशीं** प्रसंग पडला. **अहमदशहा** फौज घेऊन आला आणि पहिल्यानें त्यानें **मल्हार**रावास पाठीं हटविलें. लागेच **यमुना** उतरून **शिंद्या**चीही बरीच फौज **अहमदशहानें** बुडविली. ही बातमी कळतांच उद्गीरच्या वीराची **अहमदशहाशीं** सामना करण्याचे कामीं **नानासाहेबा**कडून योजना झाली. ५५००० स्वार, १५००० प्यादे, २०० तोफा, पेंढार आणि बाजारबुणगे मिळून २ लाख माणसें, इतकें लश्कर **भाऊसाहेबा**चा हुकुम **पाणिपत**च्या भूमीवर मानीत होतें. ४७००० स्वार, ३८०००प्यादे, ७७ तोफा, इतकी सामग्री **अहमदशहा**ची होती. लढाई मोठी अरेतुरेची झाली. **नानासाहेबा**चा मुलगा **विश्वासराव** गोळी लागून ठार झाला. **भाऊसाहेब** एकदा लढाईंत घुसले, ते पुनः कोणासही दिसले नाहींत. जवळ जवळ सगळें **मराठी** लश्कर १७६१ त बुडालें. हा भयंकर संहार **नर्मदा**तीरीं कळल्या नंतर, शोकानें **नानासाहेब** लौकरच वारला. **ब्राह्मणांनीं सातार**करांची सगळी सत्ता बळकाविलेली पाहून **शिवछत्रप**तीची सून **ताराबाई** जिवंत होती ती फार हळहळे पुढें **पानिपत**च्या लढाई नंतर "पेशव्यास केलेल्या कर्मांचें प्रायश्चित्त चांगलें मिळालें" अशा अभिप्रायाचा उद्गार काढून आपल्या वयाचे ७६ वे वर्षी **ताराबाई** वारली.

२ **माधवराव** ( १७६१—१७७२ )—हा **नानासाहेबा**चा मुलगा. १७ वर्षांचा असतांना यास गादी मिळाली आणि **राघोबा** कारभार करूं लागला. पण २१ वे वर्षी **माधवरावानें** सगळा कारभार आपले हातीं घेतला. **माधवरावानें हैदर अल्लीवर** स्वारी केली. **हैदर अल्ली** हा **म्हैसुर**करांचे पदरीं असून, त्यानें आपल्या

धन्यास कैदेंत टाकलें आणि स्वतः गादी बळकाविली. पुढें आसपासचाही मुलुख **हैदरानें** काबीज केला. **माधवरावानें हैदराचा** पराभव करून, बराच मुलुख त्याच्या पासून घेतला. खर्चा बद्दल आणखीं ३२ लाख रुपयेही **हैदरानें माधवरावास** दिले. **माधवराव** अकाळीं वारला. जर **माधवराव** अधिक जगता, तर **मराठे** ब्राह्मण आणि **मराठे** क्षत्रिय यांच्यामध्यें चांगला बनाव राहून, पेशवाई अकुतोभय झाली असती. पेशव्यांच्या मध्यें **माधवरावासारखा** दुसरा पुरुष झाला नाहीं. **माधवरावाबरोबर** त्याची बायको **रमाबाई** सती गेली.

३ **नारायणराव** ( १७७२—१७७३ )—हा **माधवरावाचा** धाकटा बंधु. लौकरच **नारायणरावाचा** खून झाला आणि **राघोबानें** पेशवाई स्वीकारिली. पण **नारायणरावाची** बायको गरोदर होती, तीस मुलगा झाला त्याचें नांव **सवाईमाधवराव** ठेवून, मुख्य कारभार **नाना** फडणिस पाहूं लागला. त्यामुळें १७७३या सालीं पेशवाईत वरफुटीस सुरवात झाली.

४ **राघोबा**—यानें १७७५ त **सुरत** मुक्कामीं **इंग्रजांशीं** तह केला. **साष्टी, वसई, भडोच,** हे तीन तालुके घेऊन **इंग्रजांनीं राघोबास** मदत करावी, हें या तहाचें तात्पर्य होतें. इतक्यांत **नाना** फडणिसानें **फ्रेंचांनीं** पाठविलेल्या वकिलाचा दर्बारीं मोठा मान केला. याप्रमाणें **इंग्रजांचा** आणि **फ्रेंचांचा मराठी** मंडळांत पहिल्यानेंच **राघोबा** आणि **नानाफडणिस** या दोहोंच्या करणीनें पाय शिरकला. **कलकत्त्याहून** कुमक येत होती, तिच्यासाठीं न थांबतां, मुंबईहून १७७८ त **राघोबास पुण्याच्या** गादीवर बसविण्यासाठीं लश्कर निघालें. **तळेगांवच्या** लढाईत **इंग्रजांचा** मोड होऊन **वडगांवचा** तह झाला. पण हा **कलकत्तेकरानें** मंजुर केला नाहीं आणि १७८० त

फौज पाठविली. **गॉडर्ड** नांवाचा सेनापति **तापी** उतरून आला आणि **अमदाबाद**चा किल्ला त्यानें सर केला. साल अखेर **वसई** तालुकाही **इंग्रजां**च्या ताब्यांत गेला. **गाडर्ड पुण्या**वर चालला. पण **मराठ्यां**कडून मार मिळत चालला, त्यामुळें **गाडर्ड**ला **पुण्या**ची दिशा सोडावी लागली. पुढें बरेच हाल होऊन, अखेरीस **गाडर्ड मुंबई**स पोंचला. याप्रमाणें **इंग्रजी** लष्कराची शोच्य स्थिति झालेली पाहून **कलकत्त्या**च्या **हेस्टिंग्सनें** बराच लांच देऊन **जानोजी भोसल्यास** फोडलें आणि लौकरच **महादजी**च्या मार्फत **नानाफडणिसाशीं** आणि **पुण्या**च्या दर्बाराशीं १७८२ त तह केला. या तहास **साल्पी**चा तह ह्मणतात. या तहाच्या अन्वयें **राघोबास** ३ लाख रुपये वर्षासन मिळून, **महादजी**स मध्यस्थी केल्याबद्दल **भडोच** तालुका मिळाला. पुढें **महादजी पुणें** मुक्कामीं आला. **महादजी**च्या मनांत **सातार**करांच्या सत्तेचा जीर्णोद्धार करणें होता. ब्राह्मणांच्या हातची सत्ता **सातार**करांकडे जाऊं नये, या विषयीं **नानाफडणिसानें** खटपट चालविली. अखेरीस **सवाईमाधव**रावही **नाना**च्या बाजूचा झाला. जर **महादजी** अधिक जगता, तर **महाराष्ट्र**-मंडळाचें एकंदरींत कल्याण होतें आणि **नाना**चा पगडा चालताना. पण दुर्दैवानें १७९४ त **महादजी** वारला. १७९५ त **खर्ड्या**ची लढाई झाली. **नाना**च्या कह्यांत या प्रसंगीं बरेच सरदार राहिले आणि **निजामअली**चा पराभव झाला. पुढें **राघोबा**चा मुलगा **बाजी**राव आणि **सवाईमाधव**राव या दोहोंचें दाट झालें, तें **नानास** पहावेना आणि त्यामुळें **सवाईमाधव**रावास जाच होऊं लागला. एके दिवशीं अगदीं त्रासून **सवाईमाधव**रावानें आगाशीवरून उडी टाकली आणि आत्महत्या केली.

९ **बाजीराव** दुसरा १७९६—१८१८. त **नाना फडणीस** वारला. **बाजीराव दौलतराव** शिंद्याच्या धोरणानें वागत असे. **बाजीरावानें यशवंतराव होळकराच्या** एका भावास हत्तीच्या पाया-खालीं दिलें होतें, ह्मणून **यशवंतरावानें पुण्यावर** स्वारी केली. **बाजीरावास दौलतरावाची** मदत होतीच. **पुण्याची** लढाई १८०१ मध्यें मोठी अटीतटीची झाली. मोड होतो असें पाहून **यशवंतरावानें** आपला घोडा पुढें घातला, तेव्हां बरोबरच्या **मराठ्यांनीं** लागेच पुढें पाऊल टाकून **फ्रेंचांची** व **इंग्रजांचीही** पलटणें चराचर कापलीं. **शिंद्याच्या** सगळ्या तोफा **यशवंतरावाच्या** हातीं लागल्या आणि **बाजीराव वसईस इंग्रजांकडे** पळून गेला. पुढें १८०२ त **वसईचा** तह झाला. या तहा अन्वयें **बाजीरावानें इंग्रजांची** ताबेदारी पत्करली. पुढें १० वर्षें सांपडेल त्याच्यावर **बाजीराव** खार काढीत चालला. **त्रिंबकजी डेंगळा** ह्मणून एक जासूद होता त्याच्याशीं **बाजीरावाचा** परिचय झाला. हा परिचय वृद्धिंगत होऊन शेवटीं **त्रिंबकजी बाजीरावाच्या** गळ्यांतील ताईत बनला. **गंगाधरशास्त्री** नांवाचा वकील **गायकवाडानें बाजीरावाकडे** पाठविला होता, तो **पंढरपुरीं** देवदर्शन करून आला न आला इतक्यांत **त्रिंबकजीनें** तयार ठेविलेल्या मारेकऱ्यांच्या हातून मारला गेला. या **त्रिंबकजीवरून बाजीरावाशीं इंग्रजांचें** फाटलें. १८१७ **खडकीची** लढाई झाली, तींत **बाजीरावाचा** मोड झाला. अशीच दुर्दशा १८१८ **कोरेगांवच्या** लढाईंत ब्राम्हणशाही साफ बुडाली. पुढें ८ लाख रुपयांचें वर्षासन करून देऊन, **कानपुराजवळील बिठूर** नांवाचा गांव **इंग्रजांनीं बाजीरावास** राहावयास दिला. **बाजीरावास** १८५१ त वारला.

# भाग ३ [गायकवाडी].

## ( इसवी शके १७१६ पासून १८०३ पावेतों ).

१ **थोडक्यांत हकीकत—चंदी** प्रांतीं आल्यानंतर, **राजारामानें खंडेराव दाभाड्यास गुजराथ**ची सुभेदारी दिली. **दाभाड्याचें** मूळ ठिकाण **तळेगांव**. **धना**जीच्या पूर्वी ज्यांनीं निमकहरामपणा स्वीकारून **शाहू**ची बाजू धरली, त्यांच्यापैकीं **खंडेराव दाभाडे** हा एक होय. **खंडे**रावामध्यें लश्करी धोरण बरेंच होतें. १७१६च्या सुमारास **खंडेरावास शाहू**नें " सेनापति " केलें. जवळजवळ याच काळीं **खंडेरा**वाच्या शिफारशीनें **दमाजी गायक**वाडास **शाहू**नें "समशेर बहादुर" हा किताब दिला आणि **खंडेरा**वाच्या हाताखालीं दुय्यम नेमलें. लौकरच **खंडेराव** व **दमा**जी हे उभयतां वारले. तेव्हां **शाहू**नें " सेनापति "चीं वस्त्रें **खंडे**रावाचा मुलगा **त्रिंबक**राव यास देवून, " समशेर बहादर "की **दमाजी**चा पुतण्या **पिलाजी** यास दिली. पुढें १७३१त **डभोई**ची लढाई झाली तींत **त्रिंबक**राव पडला आणि **बाजीरा**वाची **फत्ते** झाली. तेव्हां त्रिंबकरावाचा मुलगा **यशवंत**राव यास **शाहू**नें सेनापतीचीं वस्त्रें देऊन, **पिला**जीस " सेनाखासखेल " असा आणखीं एक किताब दिला. **शाहू**नें या प्रसंगीं असाही हुकुम फर्माविला कीं " सेनापती " व " पेशवा " यांनीं एकमेकांच्या **गुजराथें**तील किंवा **माळव्यां**तील हद्दींत आगळीक करूं नये. पुढें १७३२त **पिलाजी**चा खून झाला. या खुनापासून **मोगलां**चा मुळीच फायदा झाला नाहीं. **पिलाजी**चा भाऊ **महादजी जंबुसर** मुक्कामीं होता, त्यानें हल्ला करून **बडोदें** घेतलें. **पिलाजी**चा वडील मुलगा **दमाजी** यानेंही **सोनगडा**हून येऊन **गुजराथें**तील बरेच तालुके सर केले. **बडोदे**कराचा अंमल

**गुजराथेंत** नीट बसलेला असून, त्यास **काठेवाडांतील** व **माळव्यांतील** रजवाडे खंडणी देत असत. पुढें १८०२ च्या सुमारास **गोविंदराव गायकवाड** वारला आणि गादीच्या संबंधानें तंटे लागले त्या प्रसंगीं इंग्रजांनीं ढवळाढवळ करून आपली छाप बसविली.

## भाग ४ ( भोसलेशाही ).

### [ इसवी शके १७०८ पासून १८०३ पावेतों ].

१ **थोडक्यांत हकीकत**—**शाहू** सुटतांच जी मंडळी त्यास जाऊन मिळाली, तीमध्यें **परसोजी भोसला** होता. यास " सेनासाहेब सुभा " हा किताब आणि **वऱ्हाडची** सुभेदारी **राजारामानें** आपल्या कारकीर्दीच्या आरंभींच दिलेली. १७१९ च्या सुमारास **परसोजी** वारला तेव्हां त्याचा मुलगा **कान्होजी भोसले** यास **वऱ्हाडची** सुभेदारी आणि " सेनासाहेब सुभा " हा किताब अशीं दोन्ही **शाहूनें** दिलीं. १७३४ च्या सुमारास हुकुम न मानल्याचा आरोप आल्यामुळें **कान्होजीस** कैदेंत टाकण्यांत आलें आणि **कान्होजीचा** चुलत पुतण्या **रघोजी** यास **वऱ्हाडची** सुभेदारी आणि किताब हीं **शाहूकडून** मिळालीं. **रघोजी** १७९३ त वारला आणि त्याची जागा वडील मुलगा **जानोजी** यास मिळाली. **जानोजी** १७७३त वारला. **जानोजीची** जागा त्याचा पुतण्या **रघोजी** यास मिळाली. १८०२तला **वसईचा** तह **रघोजीस** पसंत पडला नाहीं. पण १८०३त **आरगांवची** लढाई झाली, तींत मोड होऊन **देवगांवचा** तह करावा लागला आणि **रघोजीनें इंग्रजांची** ताबेदारी पत्करली. **आरगांवच्या** लढाईमुळें **रघोजीकडून इंग्रजास कटक** प्रांत मिळाला. **भोसल्याचा बंगाल्यांनही** दरारा बसला होता.

# भाग ५. ( होळकर ).

( इसवी शके १७१४ पासून १८०८ पावेतों ).

१ **मल्हारराव होळकर**—हा मूळ पुरुष. याची जात धनगर आणि कुळदैवत जेजुरीचा **खंडोबा. नीरा** नदीचे तीरीं **होळ** नांवाच्या गांवचा ह्मणून **होळकर. बाळाजी विश्वनाथानें** पेंढाऱ्यांचीं कांहीं पतकें पदरीं ठेविलीं, त्यांत **मल्हारा**राव होता. लुटींत ज्यास जें सांपडेल तें घेऊन गुजारा करावा, असा करार पेंढाऱ्यांच्या पतकांशीं असे. पुढें **मल्हार**राव केवळ आपल्या तलवारीनें वाढला आणि **गोतमा**बाई नांवाची मामाची मुलगी होती तिच्याशीं त्यानें लग्न लाविलें. **पाणिपत**च्या लढाईचे प्रसंगी लांडगेतोड करून **अफगाणांची** मस्ती मोडण्याची उत्तम मसलत **मल्हार**रावानें सादर केली, ती " धनगराची मसलत " ह्मणून **भाऊसाहेबानें** झुगारून दिली ! ! ! **मल्हार**राव **१७६६**त वारला. **मल्हार**रावाचा एकुलता एक मुलगा **खंडेराव कुंभेरी**च्या वेढ्यांत पडल्यामुळें सून **अहिल्या**बाई गादीवर बसली.

२ **अहिल्याबाई**—प्रत्येक जातीच्या **मराठ्यानें** अभिमान बाळगण्याजोगी बाई एक **अहिल्याबाईच.** नवऱ्याचें सुख फारसें मिळालेलें नाहीं, तरी नवऱ्याचे प्रेताबरोबर ही सती जाण्यास तयार. **मल्हार**रावाचें ह्मणणें कीं " **अहल्या** आहे तो माझा **खंडूच** ". त्यामुळें **अहिल्या**बाई सती जाण्याची राहिली आणि सासऱ्याचा सर्व कारभार पाहूं लागली. मुलगा **माले**राव लहानपणीं वारला आणि मुलगी **मुक्ता**बाई नवऱ्याबरोबर सती गेली. तरी **अहल्या**बाई डगमगली नाहीं. सासू **गोतमा**बाई बरीच कडक; तरी सून शुश्रूषा करण्याचे कामीं तत्पर. **मल्हार**रावाच्या पश्चात् सगळेंच सूत्र **अहल्या**बाईचे हातीं आलें. **राघोबा**चा

नेत **अहल्या**बाईस बुडवायाचा. बातमी समजतांच **अहल्या**बाईनें **तुकोजी होळकरास उदेपुरा**हून सांडणी स्वार पाठवून आणिलें आणि पत्रें लिहवून लश्कर जमविलें. **शिप्रा** नदीचे ऐल तीरीं **राघोबा** असतां, **तुकोजीनें** पैल तीरा वरून निरोप पाठविला कीं " **शिप्रा** उतरल्यास लढाई. " हा खणखणीत निरोप ऐकून **राघोबा**ची वीरश्री थंड पडली. आपल्या परवानगी शिवाय **शिवबा बाजी** नांवाच्या कारकुनास **माधवराव पेशव्या**चया पदरीं जाऊं दिलें ह्मणून **तुकोजीस अहल्या**बाईनें मोठा ठपका दिला, इतकी कडक शिस्त **अहल्या**बाई ठेवीत असे. पूर्वीचें किरकोळ **इंदुर** गांवढें **अहल्ये**चया कारकीर्दींत संपन्न होऊन " नगर " किंवा " शहर " ह्मणण्याच्या योग्यतेचें झालें. **अहल्या**बाईच्या पश्चात् **तुकोजी**च्या हातीं सगळा कारभार आला. **तुकोजी होळकर** वंशांतला. याच्या पलिकडे आणखीं कोणताही संबंध **मल्हार**रावाशीं किंवा **अहल्या**बाईशीं त्याचा नव्हता. **तुकोजी** १७९७त वारला.

२ **यशवंतराव होळकर**—**तुकोजी**चे दोन मुलगे औरस—**काशिराव** आणि **मल्हार**राव, दोन मुलगे राखेचे—**यशवंत** आणि **विठोजी**. **काशिरावा**चा आणि **मल्हारराव**ाचा तंटा लागला, त्यांत **मल्हारराव** ठार झाला. **काशीरावास शिंद्या**ची मदत मिळालेली पाहून, **यशवंत**राव **नागपुरा**स पळाला आणि **विठोजी कोल्हापुरास** पळाला. **काशीराव** वेडगळ होता; ह्मणून पुढें **यशवंत**रावानें **होळकरशाही**चा सगळा भार आपणावर घेतला आणि **शिंद्या**शीं तंटा सुरु केला. **दुद्रेनेक** नांवाचा फ्रेंच सरदार पतक घेऊन आला, तें **यशवंतरावानें** बुडविलें. **यशवंरावा**चा तो नेट आणि पराक्रम पाहून, **दुद्रेनेक** थक्क झाला आणि **यशवंत**रावाचे पदरीं राहिला. १८०१ मध्यें **उज्जनी**ची लढाई **यशवंत**रावानें

मारली. या लढाईंत **शिंद्याचा** सेनापति **कर्नल जान हेसिंग्स** हा होता. याच्या ४ पतकांत मिळून ११ गोरे कामगार होते, त्यांपैकीं ७ ठार झाले, तीन कैदींमध्यें सांपडले आणि **हेसिंग्स**मात्र पोबारा करूं शकला. पतकांतील जवळ जवळ चार पंचमांश ठार किंवा जायां झाले. **उज्जनी**च्या लढाईच्या पूर्वी **विठोजीस** हत्तीच्या पायीं देऊन, बाजीरावानें मारविलें होतें; आणि ती बातमी कळतांच, सूड घेण्याचा आपला विचार **यशवंत**रावानें जाहीर केला होता. पुढें **इंग्रजां**च्या पतकांची किंवा पलटणांची पुरी वाताहात केली, ही बातमी कानीं पडली. तेव्हां **बाजी**रावाची पांचावर धारण बसली. १८०२ त **पुण्या**ची लढाई झाली. हींत पहिल्यानें मोड होण्याचा रंग दिसतांच **यशवंत**रावानें आपला घोडा सपाट्यासरसा पुढें घातला. लगेच लोकांस धीर आला आणि **मराठ्यांनीं शिंद्या**चीं—जशीं **फ्रेंचांनीं** तशीच **इंग्रजां**नींही शिकवलेलीं—पलटणें कापून काढिलीं. खांसा **यशवंत**रावानें स्वारांस पिटाळून लावून त्यांस खूप मार दिला आणि गोलंदाज लोकांस आपल्या तलवारीच्या तोंडीं बळी देऊन तीन गोरे सरदार ठार केले. इतका पराक्रम **यशवंत**रावानें केला आणि त्यामुळें जशी **शिंद्या**च्या पलटणांची तशी **बाजी**रावाची रेवडी झाली. पुढें **इंग्रजां**चा दुसऱ्या **मराठ्यां**शीं तंटा जुंपला. हा तंटा जुंपण्याचे पूर्वी "कोणी गोरे कामगार आणि पलटणें **मराठ्यां**ची नोकरी सोडून येतील त्यांस **मराठ्यां**कडील पगार कायम करण्यांत येईल" या अर्थाचा जाहीरनामा **मराठ्यां**चें लश्कर फितवण्याच्या हेतूनें **इंग्रजां**कडून लावण्यांत आला होता. या जाहीरनाम्याअन्वयें बरेच गोरे कामगार व पलटणें **शिंद्यास** व पेशव्यास सोडून एकाएकीं **इंग्रजां**कडे फितलीं, ह्मणून **इंग्रजांस** पुष्कळ लढायांमध्यें सहज जय

मिळूं शकला. याच जाहीरनाम्या अन्वयें **इंग्रजां**कडे फितूं पहातात असा पुरावा मिळाल्यामुळें, तीन गोऱ्या कामगारांस देहान्त दंडाची शिक्षा **यशवंत**रावानें दिली. फितण्यास फांटा देणारी ही शिक्षा अर्थातच फितवा वाढवूं पाहणाऱ्या **इंग्रजां**स रुचली नाहीं आणि १८०४ त त्यांनीं **लेक** नांवाच्या सेनापतीस **यशवंत**रावावर रवाना केलें. **लेक**नें बरींच पलटणें देऊन **मानसन**ला **यशवंत**रावाच्या मुलुखांत शिरण्यास पाठविलें. पण अस्सल **मराठा** असावा, तसा **यशवंत**राव होता; **दौलत**राव **शिंद्या**च्या, **नागपुरकर भोसल्या**च्या किंवा दुसऱ्या **बाजी**रावाच्या वर्गांतला नव्हता. एकाएकीं हल्ला करून **यशवंत**रावानें **इंग्रजां**ची धांदल उडविली. **इंग्रजां**नीं पाऊल पाठीं घेतलें आणि **यशवंत**राव पाठीस लागला. एके प्रसंगीं **मेजरसिंक्लेर**नें **यशवंत**रावाच्या कांहीं तोफा पाडाव केल्या. पण वहिवाटीप्रमाणें **यशवंत**रावानें आपला घोडा पुढें घातला आणि लगेच **इंग्रजां**च्या लष्कराची कत्तल सुरू झाली. गोऱ्या कामगारांनीं आपली शर्थ केली, पण **मराठ्यां**पुढें चालेना. तेरा गोरे कामगार ठार झाले आणि **यशवंत**रावाच्या तोफा पुनः **यशवंत**रावाकडे आल्या. याप्रमाणें **आग्र्या**पर्यंत पाठलाग करून **मानसन**ची जवळ जवळ सगळी फौज **यशवंत**रावानें बुडविली. **यशवंत**रावानें **इंग्रजां**चे किंवा दुसऱ्या कोणत्याही गोरे लोकांचें चालूं दिलें नसतें. पण या काळचा **शिंदा, भोसला** आणि **पेशवा** यांस धोरण नव्हतें आणि काळ कोणता आला तेंही दिसलें नाहीं. ह्मणून इंग्रजांनीं सुरु केलेल्या फितव्यास व फुटीस यश येऊन, **यशवंत**रावास पाठबळ मिळालें नाहीं. अखेरीस **यशवंत**रावास वेड लागल्यामुळें १८०८ त बंदीखान्यांत ठेविलें आणि बंदीखान्यांतच या पराक्रमी पुरुषाचा १८११

त शेवट झाला. **यशवंत**रावाच्या• पाठीं राखेचा **मल्हारराव** नांवाचा ४ वर्षांचा मुलगा होता, त्यास गादी मिळाली आणि कारभार **यशवंत**रावाची बायको **तुळसा**बाई पाहूं लागली.

## भाग ६ ( शिंदा ).

### ( इसवी शके १७१४ पासून १७९४ पावेतों ).

१ **राणोजी**—हा मूळ पुरुष. हा पहिल्यानें **बाळाजी विश्वनाथा**नें पागेंत बारगिरी देऊन ठेविला. पुढें **शाहू**च्या पश्चात् लौकरच वारला. याचे तीन मुलगे औरस—**जयाप्पा, दत्ताजी** आणि **जोतिबा**; दोन राखेचे—**तुकोजी** आणि **महादजी. तुकोजी** बाप असतांच वारला. **जोधपुरचा** राजा **अभय**सिंग वारला आणि त्याच्या दोन मुलांमध्यें तंटा लागला. **रामसिंगा**नें "पेशव्यां"ची मदत मागितली आणि **नानासाहेबां**नीं **जयाप्पास** पाठविलें. दुसरा मुलगा **विजयसिंग** यानें १७५९ **जयाप्पा**चा खून केला. **विजयसिंगा**चा बाप **अभयसिंग** यानें याचप्रमाणें **पिलाजी गायकवाडा**चा खून केला होता. **अहमदशहा अवदाल्ली**नें एके प्रसंगीं घाला घातला त्यांत **दत्ताजी** आणि **जोतिबा** ठार झाले; **महादजी** आणि **जयाप्पा**चा मुलगा **जनकोजी** हे घाल्यांतून बचले. **जनकोजी पाणिपत**च्या लढाईंत **अफगाणां**च्या हातीं लागला आणि **अहमदशहा**नें त्याच्या शिरच्छेदाचा हुकूम दिला.

२ **महादजी**—**पाणिपत**च्या लढाईंत **महादजी** होता. एका प्यायाचा बळी घेऊन, **महादजी**ची **पाणिपत**च्या रणभूमीनें सुटका

केली. **महादजी** होता ह्मणून **तळेगांव** मुक्कामीं "पेशव्या" स यश आलें आणि **वडगांव**चा तह झाला. पुढें **महादजीनें बुं-देलखंडा**वर आपला अंमल बसविला. १७७१ त **शहाअलमनें** तख्ताची अब्रू राखण्यास विनंती केली, ती **महादजीनें** स्वीकारली. त्यामुळें **दिल्ली** आणि **आग्रा** या दोनही टिकाणीं **शिंद्या**चा अंमल बसला होता. १७८७ त **रजपूत मराठ्यां**वर उठले. या प्रसंगीं **जोधपुरकर** आणि **जयपुरकर** हे उभयतां मिळाले आणि कित्येक मुसलमान सरदारही **रजपुतांस** सामील झाले. लढाईंत **महादजी**चा मोड झाला. तरी तरी **महादजी** हा मोठ्या धीराचा पुरुष होता, त्यानें कच खाल्ला नाहीं. लौकरच **गुलाम कादिर** बादशहाच्या नोकरास लांच देऊन **दिल्लींत** शिरला आणि त्यानें बादशहाचे डोळे काढिलें! ! ! ! तरी धीर धरून **महादजी** तयारी करीत होता. **आग्रयाचा** हवालदार **लखबा दादा शेणवी** यानें गड चांगला भांडवून **महादजी**ची बाजू राखली. **आग्रयाच्या** लढाईंत मुसलमानांचा मोड झाल्या नंतर **महादजीचें** लश्कर बादशहाची सुटका करण्यासाठीं आलें. पळत सुटला असतां **गुलाम कादिरास** पाठलाग करून पकडलें आणि त्याच्या दुष्टत्वास योग्य अशीच शिक्षा करण्यांत आली. लश्कर येत आहे असें पाहून दरोबस्त **दिल्ली**करांस अवर्णनीय आनंद झाला आणि मोठ्या प्रेमानें **मराठ्यांस** आंत घेण्यासाठीं त्यांनीं किल्ल्याचे दरवाजे उघडले. **राणेखानानें** बादशहाची उत्तम प्रकारें व्यवस्था ठेवून, **दिल्ली**करांस खुश केलें आणि लौकरच **राणे खाना**चा यजमान **महादजी**ही १७८९ त आला. **महादजीनें शहाअलमास** पुनः तख्तावर बसविलें. नंतर गोवध बंद करण्याविषयीं **दिल्लीपतीनें** आज्ञापत्र काढिलें आणि "वकील-ई- मुतलक" असा किताब पेशव्यांस देऊन सनद हवालीं करण्यासाठीं दर्बारीं जाण्यास **महादजी**चीच योजना केली. पुढें **पुणें**मुक्कामीं **महा-**

**दजी**चें चांगलें आदरातिथ्य झालें. **सातारक**राची बाजू उचलण्याचा **महादजी**चा बेत होता पण एकाएकीं ज्वर येऊन १७९४ त **पुण्या**जवळ **वानवडी** मुक्कामीं **महादजी** वारला. **महादजीनें** लश्करांत बऱ्याच सुधारणा केल्या. **दुबैन** नांवाच्या **फ्रेंच** कामगारास पदरीं ठेवून, **महादजीनें** त्याच्या धोरणानें लश्कर पुष्कळ सुधारलें. **गोसाव्यांचीं** पतकेंही **महादजी**नेंच पहिल्यानें ठेविलीं. **महादजी**चा भाऊ **तुकोजी** याचा **आनंदराव** नांवाचा मुलगा होता, त्याच्या **दौलतराव** नांवाच्या मुलास दत्तक घेण्याची इच्छा **महादजीनें** दर्शविली होती. तीस अनुसरून, **दौलतरा**वास त्याचे वयाचे १५ वे वर्षी **महादजी**च्या पश्चात् **महादजी**ची गादी मिळाली.

# हिंदुस्थानाचा छोटा इतिहास.

## खंड ४ ( इंग्रजी अंमल ).

## पूर्वार्ध [ " कंपनी "ची सत्ता ]

## भाग १ (आरंभींची हकीकत)

**( इसवी शके १५९९ पासून १७०७ पावेतों ).**

१ **" कंपनी "ची स्थापना**—" कंपनी "=( व्यापार करणारी ) मंडळी. **हिंदुस्थाना**चा आणि **यवद्वीप** वगैरे पूर्वेकडील बेटांचा

**युरोप खंडा**शीं व्यापार होता, 'तो बरींच वर्षे **फिरंगी** व **वलंदेज** या दोन गोऱ्या लोकांच्या हातीं होता. **वलंदेज** हे **ख्रिस्ती** धर्माच्या " सुधारक " तटामधील असून, यांस **इंग्रजीं**त " डच् " ह्मणतात. हा व्यापार थोडा बहुत हातीं यावा, या हेतूनें इ० श० १५९९त **इंग्लंड** देशांत " ईस्ट इंडिया कंपनी " नांवाची एक व्यापारी मंडळी स्थापन झाली. हिचें भांडवल तीन लाख रुपयांचें होतें. व्यापाराच्या संबंधानें कांहीं मोकळीक मिळावी, ह्मणून १६१५त **इंग्लंड**चा राजा पहिला **जेम्स** यानें **जहांगीर**च्या दर्बारीं " सर " **तामस रो** नांवाचा वकील पाठविला होता. या सुमारास **सुरत, अमदाबाद खंबायत** या तीन ठिकाणीं वखारी बांधण्यास **इंग्रजांस** परवानगी मिळाली. पण आणखींही एक नवीन " कंपनी " निघाली आणि कित्येक **इंग्रज** चांचेपणा करूं लागले, ह्मणून मुळच्या " कंपनी "स व्हावा तसा फायदा होईना. तेव्हां १७०८त दोन्ही " कंपन्यां "चा मिलाफ होऊन, एक बडी " कंपनी " बनली. या बड्या " कंपनी "चा शेवट १८५८त झाला.

२ **आरंभींच्या वसाहती**—१६६२त **मुंबई** बेट **इंग्रजां**स मिळालें. **इंग्लंड**चा राजा दुसरा **चार्लस** यानें **फिरंग्यां**च्या राजकन्येशीं लग्न केलें आणि **मुंबई** बेट **फिरंगयां**कडून आंदण देण्यांत आलें. हा आजच्या **मुंबई** इलाख्याचा पाया. याच्या पूर्वी कांहीं वर्षें १६३९त **चंद्रगिरी**च्या मांडलिक राजापासून त्याचे लग्नाचे प्रसंगीं **मद्रासे**जवळ जमिनीचा तुकडा मिळाला, त्यावर "सेंट जार्ज" नांवाचा किल्ला **इंग्रजां**नीं उभारला. हा आजच्या **मद्रास** इलाख्याचा पाया. **इंग्रजां**नीं **हिंदुस्थानां**त पाऊल टाकलेलें पाहून त्यांचे **युरोपखंडां**तील सामनेवाले **फ्रेंच** यांनींहीं एक व्यापारी " कंपनी " बनविली आणि **पांदिचरी** मुक्कामीं वसाहत केली. १६५६त **शहाजहाना**स एका **इंग्रजी** वैद्यानें बरें केलें. **इंग्र**-

जी वैद्यास बक्षीस मागावयास सांगितलें, तेव्हां स्वत:साठीं कांहीं न मागतां त्यानें आपल्या लोकांस **हुगळी** मुक्कामीं व्यापार करण्याची परवानगी व वखार बांधण्यास जमीन मागितली. **शहाजहानानें** या थोर दिलाच्या **इंग्रजी** वैद्याचा मनोरथ पूर्ण केला. **हुगळी**चा व्यापार पहिल्यानें **मद्रास**च्या अधिकाऱ्याच्या देखरेखीखालीं होता. त्यामुळें **मुंबई** पश्चिम किनाऱ्यावर आणि **मद्रास** पूर्व किनाऱ्यावर, अशा दोनच **इंग्रजां**च्या मुख्य वसाहती **हिंदुस्थाना**ंत होत्या. **अवरंगझेबा**च्या कारकीर्दींत **इंग्रजी** व्यापाऱ्यांनीं एकदा राजकी खटपटींत हात घालून, **बलसोर** बंदरांत **मोगलां**चीं ४० तारवें जाळलीं. तेव्हां **अवरंगझेबा**नें **इंग्रजां**च्या सगळ्या वसाहतींवर हल्ला करण्यास हुकुम केला. जेव्हां **मुंबई**सही **मोगलां**चा वेढा पडलेला पाहिला, तेव्हां **इंग्रजांनीं** **दिल्ली**-पतीस लोटांगण घातलें आणि त्याच्या मर्जीप्रमाणें तह केला. लौकरच **अवरंगझेब** **मराठ्यांस** बुडविण्यांत गुंतला आहे, असें पाहून १६९८त **इंग्रजांनीं** **कलकत्त्या**ची जमीन खरेदी करून "फोर्ट विल्यम" नांवाचा किल्ला बांधला. नंतर ज्या वर्षीं **अवरंगझेब** **अहमदनगरीं** वारला, त्याच वर्षीं जसें **मुंबई**च्या व **मद्रास**च्या अधिकाऱ्यास स्वातंत्र्य होतें तसेंच **कलकत्त्या**च्या अधिकाऱ्यास "कंपनी" कडून देण्यांत आलें. याप्रमाणें ज्या वर्षीं **अवरंगझेब** वारला, त्याच वर्षीं **इंग्रजी** अंमलांतील तिसऱ्या इलाख्याचा पाया पडलेला समजावा.

# भाग २—मद्रासेंतील हकीकत.

## प्रकरण १—(फ्रेंचांची फत्ते.)

(इसवी शके १७४६ पासून १७५० पावेतों).

१ " **इंग्रजां "च्या वसाहतींवर " फ्रेंच " हल्ला करतात**—**अवरंगझेबानें** खोड मोडली त्या दिवसापासून १७४६ पर्यंत **इंग्रजांनीं** राजकी घोटाळ्यांत मुळींच हात घातला नाहीं व आपली जमिनदारी मात्र हळू हळू वाढविली. या सुमारास **युरोपां**त **इंग्रज** व **फ्रेंच** यांचा तंटा जुंपला, आणि **फ्रेंचांनीं इंग्रजांच्या हिंदुस्थानां**तल्या वसाहतींवर हल्ला करण्याचा निश्चय केला. **मोरिशियस** बेटाचा " गवर्नर " **लाबुरदोने** यानें १७४६ त स्वारी केली आणि **इंग्रज फ्रेंचांस** खंडणी देऊं लागले. **पांदेचरी**चा " गवर्नर "**दुप्ले**" यानें **मद्रास** पेंठ बळकाविली. पुढें १७४८ त **युरोपां**त तह झाला आणि तहा अन्वयें **मद्रास**ची पेंठ **इंग्रजांस** परत मिळाली.

२ **इसवी शके सतराशें अठेचाळीस हें साल**—या सालीं **महंमदशहा दिल्ली** मुक्कामीं वारला. **शाहू**ही याच सालीं **सातारा** मुक्कामीं वारला आणि त्यामुळें याच सालीं **नानासाहेबा**कडून **पुण्या**च्या **ब्राम्हणबादशाही**चा पाया घालण्यांत आला. याच सालीं **हैदराबाद**चा **निझामुल्मुल्क**ही वारला.

३ " **फ्रेंचां "ची मोटी फत्ते**—**कर्नाटक** सुभा **निझामुल्मुल्क** आपल्या अंमलांतला समजे **कर्नाटक**चा पहिला " नबाब " **निझामुल्मुल्कानें**च नेमला होता. पहिल्या नबाबाच्या पश्चात् त्याच्या दत्तक मुलानें **हैदराबाद**करास न विचारतां **कर्नाटकां**त आपला अंमल चालविला. ह्मणून **अर्काट**वर स्वारी करून १७३४ त **निझामुल्मुल्कानें** दत्तक मुलास हुसकावून लावून **अनवरुद्दिनास** "नबाब" केलें. **निझामुल्मुल्काच**या पश्चात् हा तंटा पुनः पेटला. **चंदासाहेब** नांवाचा पूर्वींच्या नबाबाचा नातेवाईक होता, त्यानें **कर्नाटक**चा सुभा घेण्यासाठीं **फ्रेंचां**जवळ मदत मागितली. मुजफरजंग

नांवाचा **निझामुल्मुल्काच्या** मुलीचा मुलगा होता, त्यानें आपला मामा **नासरजंग** यास हुसकावून देऊन **हैदराबाद** बळकविण्याचा विचार केला आणि **पांदिचरीच्या** फ्रेंचांशीं सख्य केलें. **दुप्लेनें मद्रास** सर करून आपला पराक्रम नुकताच दाखविला होता. **चंदासाहेब** व **मुझफरजंग** हीं दोन सावजें त्या काळीं हातीं लागलेलीं पाहून या फ्रेंच पारध्यास मोठा हर्ष झाला. तिघांनीं मिळून **अंबूर** मुक्कामीं १७४९ त लढाई दिली, तींत **अनवरुदिन** ठार झाला. लागेच **अर्काट** मुक्कामीं जाऊन **चंदासाहेबाच्या** हवालीं **कर्नाटक** सुभा दोघां कडून करण्यांत आला. लौकरच **चंदीचा** मजबूत किल्ला दुप्लेच्या हाताखालीं **बुसी** नांवाचा सेनापती होता त्यानें सर केला. नंतर **मुझफरजंगास** मोठा समारंभ करून, "**दक्षिण**"ची गादी दुप्लेनें दिली. पुढें **मुझफरजंग हैदराबादेस** गेला तो त्याच्या बंडखोर शिपायांनीं ठार केला, तेव्हां **निझामुल्मुल्काचा** धाकटा मुलगा **सलावतजंग** यास **बुसीनें** गादीवर बसविलें.

४ **"इंग्रज" राजकी उलाढालींत पहिल्यानेंच पडतात**— **कृष्णा** नदीच्या एका मुखा जवळून वहणाऱ्या **कोलरूनच्या** मुखाजवळ **देवीकोट्टा** मुक्कामीं वसाहत करण्याचा **इंग्रजांनीं** निश्चय केला; आणि **तंजावरकराचा** नातलग हद्दपार केलेला होता, त्याच्याशीं "**तंजावरची** गादी हवीअसल्यास, **देवीकोट्टा** व लढाईचा खर्च हीं दोन घेऊन मदत करण्यास आपण तयार आहों"— अशा अर्थाचें बोलणें लाविलें. अर्थातच हद्दपार केलेल्या नातलगास **इंग्रजांचें** बोलणें पसंत पडलें आणि **इंग्रजांनीं तंजावरकरा** वर कांहीं लस्कर पाठविलें. पण **तंजावरकरानें देवीकोट्टा** देण्याचें

कबूल केल्यामुळें **इंग्रजांनीं** बाजू बदलली; इतकेंच नाहीं, तर **तंजावरकरानें** आपल्या नातलगास ४ हजार रुपये सालिना देण्याची बोली केल्यास त्यासच कैदेंत ठेवण्याचा करार इंग्रजांनीं केला!!! **तंजावरकरानें** शर्त कबूल केली आणि ज्याच्यासाठीं ह्मणून इंग्रज आले, त्यासच त्यांनीं कैदेंत टाकलें!!! **तंजावरकर** हे **शिवाजी**चा सावत्र भाऊ **वेंकाजी** याचे वंशज. **मद्रास** इलाख्यांत या काळच्या **इंग्रजांनीं** आपल्या पुढील बांधवांस राजकी प्रकरणांत घालून दिलेला हा पहिला धडा.

## प्रकरण २ ( "इंग्रजां"ची फत्ते ).

### ( इसवी शके १७५० पासून १७६१ पावेतों ).

"**अनवरुदिन**"चा मुलगा "**महंमद अल्ली**"—हा अंबुरच्या लढाई नंतर **त्रिचनापल्लीस** पळाला. **चंदासाहेवानें त्रिचनापल्लीस** वेढा दिला. **महंमदअल्लीनें** इंग्रजांजवळ मदत मागितली. **फ्रेंचां**चा व **इंग्रजां**चा या काळीं सलुख होता, त्या पक्षीं **फ्रेंचां**च्या शत्रूस इंग्रजांनीं मदत करणें किंवा **फ्रेंचां**च्याच मित्रावर हल्ला करणें वाजवी नव्हतें. **चंदासाहेव हा** फ्रेंचांचा मित्र आणि **महंमदअल्ली** हा **चंदासाहेवा**चा शत्रु. पण "अमुक वाजवी, अमुक गैरवाजवी"—असा निरंतर उपदेश परक्यास करायाचा आणि स्वतःवर प्रसंग ठेपल्यास गैरवाजवी असलें तरीं करून त्याचा वाक्पांडित्याच्या बळावर वाजवीपणा ठरवीत बसायाचें, अशी एकंदरींत **यूरोपां**तल्या लोकांची स्थिति दिसते. पंचविशींच्या पलीकडे न गेलेला **रावर्ट क्लैव** नांवाचा कामगार होता, त्यानें **चंदासाहेवा**चया **अर्काटावर** एका-

एकीं हल्ला करण्याची मसलत या काळीं दिली आणि ती **मद्रासच्य** गवर्नरानें पंसत केली ! ! ! एकाएकीं हल्ला करतांच **अर्काटचा** किल्ला **क्लैव**च्या ताब्यांत आला. **महंमद अल्लीस** मदत करायाची, ती दूर राहिली; आणि **क्लैव**च्या मसलतीनें **चंदासाहेबा**चाच मुलुख **इंग्रज** ताब्यांत घेऊं लागले. ! ! ! या प्रसंगीं **मुरारराव घोरपडे, म्हैसुर**कर आणि **तंजावर**कर या तिघांची मदत **इंग्रजांनीं** कांहीं मुलुख देण्याचें कबूल करून मिळविली. नंतर जेव्हां **त्रिचनापल्ली**चा वेढा उठवण्यास **इंग्रज** निघाला, तेव्हां **मुरारराव** व **तंजावर**कर यांचीं पतकें बरोबर असून आणखीं **म्है**सूरकराची १४००० फौज बरोबर होती. या प्रमाणें **हिंदूं**च्या मदतीनें इंग्रजानें **त्रिचनापल्ली**चा वेढा उठवला. पुढें मुलखाच्या वांटणीचे प्रसंगीं तंटे लागून, सगळा मुलुख **इंग्रजानें** ठेविला आणि त्रिवर्ग **हिंदूं**स चुरमुरे भाजावे लागले. या प्रमाणें **इंग्रजी** अंमलाचा पाया **क्लैव** व **मद्रास**चा "गवर्नर" या दोहोंकडून **मद्रास** इलाख्यामध्यें घालण्यांत आला. **सलावतजंगानें फ्रेंचांच्या** बळावर गादी मिळविली होती; ती **फ्रेंचांच्या** बळावर अकुतोभय व्हावी, या हेतूनें "उत्तरेकडील सर्कार" हा प्रांत फ्रेंचांस **सलाबतजंगा**कडून तोडून देण्यांत आला. या प्रांताची हद्दी वर **आवढ्या जगन्नाथापर्यंत** असून, लांबी सुमारें ६०० मैल आणि वसूल ८० लाख रुपये होता. पुढें १७५९ त **इंग्रज** व फ्रेंच या दोहोंमध्यें तह झाला, आणि **महंमदअल्ली** आपले वाड्यांत मूग खात बसला ! ! ! लौकरच **विजयनगर**चा राजा आणि **निजामअल्ली** या दोहोंची बाजू **इंग्रजांनीं** उचलून **फ्रेंचांशीं** पुनः तंटा उपस्थित केला. अखेरीस १७६१ त **फ्रेंचांची** धूळधाणी होऊन, **सलावतजंगास निजामअल्लीनें** कैदेंत टाकलें आणि **हैदराबाद**ची गादी **इंग्रजांच्या** बळावर आपण स्वतः बळ-

काविली. पुढें १७६९ त फ्रेंच व्यापारी मंडळींच बुडाली आणि फ्रें-चांचा राजकारणी संबंध सांगण्यासारखा राहिला नाहीं.

# भाग ३—( बंगाल्यांतील हकीगत ).

## प्रकरण १—

### ( इसवी शके १७०० पासून १७६० पावेतों ).

१ " **इंग्रजां** "चीं " **बंगाल्यां** "तील **कारस्थानें**—१७००च्या सुमारांस **मुर्शीदा कुली** हा **बंगालचा** "नबाब" झाला. यानें **मुर्शिदाबाद** वसविली आणि **इंग्रजां**स गांवढीं कोणींही जमीनदारानें विकूं नये, अशी सक्त ताकीद आपल्या मुलखांतून फिरविली. पण **मुर्शीद**च्या पश्चात् या ताकिदीकडे जमीनदार कानाडोळा करूं लागले आणि **इंग्रजांनीं** कांहीं गांवढीं खरेदी केली. १७४० त **बंगालचा** सुभा जेव्हां **अलिवर्दीनें** बळकाविला, तेव्हां **इंग्रजांचें** काम झालें. १७५६ त **अलिवर्दी** वारला, तेव्हां त्याचा नातू **सुराज उद्दोला** वीस वर्षांचा होता, त्यास सुभा मिळाला. एका **हिंदूस** " नबाबा "नें दंड केला, आणि दंड न देतां **हिंदु कलकत्त्यास ड्रेक** नांवाच्या " गव्हर्नर " होता, त्याच्याकडे पळाला. आपल्या रयतेपैकीं असून पळाल्यामुळें **हिंदूस** परत पाठविण्या विषयीं "नबाबा"नें " गव्हर्नरा "स लिहिलें. "गव्हर्नरा"नें **हिंदूस** परत पाठविलें नाहीं; इतकेंच नाहीं, तर किल्ल्याची दुरुस्ती व मजबुती चालविली. तेव्हां " नबाबा"स राग आला, त्यांत नवल नाहीं. **कासिमबाजार** मुक्कामीं इंग्रजांची वखार होती ती नबाबानें लुटली आणि एकदम **कलकत्त्या**वर हल्ला केला

"गवर्नरा"नें पहिल्यानें पळ काढिला. किल्ला भांडवण्याचा यत्न कित्येक **इंग्रजां**नीं केला, पण सफळ झाला नाहीं. किल्ला पडला आणि कैदींस एका अरुंद आटपसर जागेंत रात्र काढावी लागली. जर "नबाबा"स कोणी जागें करतें, तर कैदींची कांहीं तजवीज होती. पण "नबाबा"स कोणीही कामगार जागा करण्यास धजला नाहीं, व कैदींचे पुष्कळ हाल होऊन बरेच मेले. ही गोष्ट १७५६ त घडून "काळोखी भुयार" या नांवानें **इंग्रजी** इतिहासांत नांवाजली आहे. दुसरे दिवशीं राहिलेल्या कैदींची व दुसरीही व्यवस्था लावून "नबाब" आपल्या सुभ्याकडे वळला. ही बातमी कळतांच, जसा **अर्काट**वर हल्ला करून तसा भागीदारास चुरमुरे भाजायास लावून इलाखाभर नांवाजलेला **क्लैव** याची योजना **मद्रास**च्या "गवर्नरा"नें "नबाबा"स पारिपत्य करण्याचे कामीं केली. **क्लैव**नें हल्ला करून **कलकत्ता** घेतला आणि **हुगळी** लुटून फन्ना केली. इतक्यांत **सुराज उद्दौला**स पदच्युत करण्याची मसलत चालली. ही मसलत "नबाबा"चा सेनापती **मीर जाफर** व **क्लैव** या दोहोंनीं मिळून घाटलेली दिसते. **रायदुर्लभ** नांवाचा "नबाबा"चा बडा खजानजी होता, तोही या मसलतींत मिलाफी झाला. **उमाचंद** नांवाचा सावकार होता, त्यास ही सगळी मसलत तडीस गेल्यास ३० लाख रुपये देण्याचें कबूल केलें. पण **क्लैव**च्या तोंडच्या वचनावर विश्वास नसल्यामुळें, **उमाचंदा**नें ३० लाख रुपयांचें कलम लेखी करारांत दाखल करण्याविषयीं आणि **वाटसन** नांवाचा **आरमारा**वरील मुख्य होता त्याची करारावर सही मिळण्याविषयीं आग्रह धरला. एक पांढऱ्या कागदावर, दुसरा तांबड्या कागदावर—असे दोन करार **क्लैव**नें तयार केले. पांढरा कागद अस्सल दस्तैवज असून, तांबडा कागद **उमाचंदा**स फसवण्यासाठीं केला होता. **वाटसन**ला

**क्लैवनें** दुसऱ्या कागदावर सही करावयास, सांगितली, पण तो करीना कारण तो खऱ्या हाडाचा पडला. तरी हाडीं खोटें खिळून गेल्या-मुळें **क्लैवला** बिलकूल धास्ती पडली नाहीं. **क्लैवनें वाट्नसची** सही तांबड्या कागदावर आपल्या हातानें बनविली आणि **उमा-चंदाची** खात्री करून दिली ! ! ! हें सगळें कृष्ण कारस्थान **वाट्स** नांवाचा वकील **मुर्शिदाबादीं** " नवाबा " जवळ होता, त्याच्या मार्फत चालविलें होतें. **मीर जाफरला** सैन्य घेऊन मदतीस येण्याचें नक्की वचन **क्लैवनें** दिलें होतें, तरी " नबाबा "नें बेसावध असावें या मतलबानें गोड गोड शब्द घालून कित्येक पत्रें त्यास **वाट्सच्या** मार्फत **क्लैवनें** पाठविलीं. याप्रमाणें आंतून सगळी तयारी पुरी झाली, असें पाहून **वाट्स** पहिल्यानें **मुर्शिदाबादेहून** पळाला आणि **क्लैवनें** लगेच **कासिमबाजारची** दिशा धरली. " नबाब " व **मीर जाफर** हे जंगी सैन्य घेऊन **इंग्रजांशीं** सामना करण्या-साठीं निघाले. **क्लैव** लढाई सुरु करणार असें दिसतांच **मीर जाफरनें क्लैवला** इशारत देण्यासाठीं पूर्वींच पैसा देऊन फितवलेलीं पतकें एके बाजूस काढिलीं आणि लगेच " नबाबा "ची आणि **क्लैवची** लढाई जुंपली. अगोदरच खोट्या खोट्या थापा देऊन " नबाबा "स **क्लैवनें** बेसावध ठेविलें; इतकेंच नाहीं, तर त्याच्या मु-ख्य खजानजीस फितवून सेनापतीसही फितविलें. तेव्हां १७५७ त **प्लासीच्या** लढाईत मोठी फत्ते मिळवून, **बंगालच्या** " नबाबा "-स **क्लैवनें** समूळ बुडविलें त्यांत नवल कोणतें ? दुसरे दिवशीं **क्लैवनें मीरजाफरास** " नबाबसाहेब " ह्मणून सलामी भरली. **मीर जाफर** लागलाच **मुर्शिदाबाद** मुक्कामीं आला. **सुराज उद्दवला** पळाला होता, त्यास कांहीं दिवसांनी पकडून आणिलें आणि त्याच्याच

पूर्वीच्या वाड्यांत कोंडून ठेविलें. लौकरच **मीर जाफरचा** मुलगा **मिरान** यानें आपल्या बापाच्या धन्याचा खून केला ! ! ! ज्या **क्लैवनें** **मद्रास** इलाख्यांत **मुरारराव, म्हैसुरकर** आणि **तंजावरकर** या तिघां-च्या हातावर—आपलें काम उरकून घेतल्या नंतर—वाटाण्याच्या अक्षता दिल्या, तोच आतां **बंगाल्यांत** आलेला; इतकेंच नाहीं, तर खोटा दस्तैवज करून त्याच्यावर **वाट्सनची** बनावट सहीही या प्रांतीं केलेली. तेव्हां दोहोंपैकीं एका भागीदारास या प्रसंगीं **क्लैवनें** पुनः पूर्वीचा कित्ता वळवून धुळीस मिळविलें, त्यांत नवल नाहीं. **क्लैवनें** कबूल केलेले पैसे न मिळाल्यामुळें **उमाचंद** वेडा झाला आणि लौकरच वारला. **क्लैवनें** जी कामगिरी **बं-गाल्यांत** केली, ती पसंत पडून "कंपनी"नें तिच्याबद्दल १६ लाख रुपये **क्लैवला** बक्षीस केले ! ! याप्रमाणें जसा **मद्रास** इलाख्यांत तसाच **बंगाल** इलाख्यांत वास्तविक विचार करतां——**इंग्रजी** अंमलाचा पाया घालणारा पुरुष **राबर्ट क्लैव.** याप्रमाणें पाया घालून, हा पुरुष १७६० त आपल्या मुलुखीं गेला.

# प्रकरण २—(क्लैव गेल्यानंतरची हकीकत.)

## ( इसवी शके १७६० पासून १७६५ पावेतों ).

१ **क्लैवची पद्धति आणि तिचा शोच्य परिणाम**—अनेक भागीदारांनीं मिळून काम करावें, यांत कांहीं निंद्य नाहीं. पण काम झाल्यानंतर एका भागीदारानें दुसऱ्या भागीदारास त्याच्या श्रमांबद्दल मोबदला न पोंचविणें किंवा तें पोंचवण्याचे प्रसंगीं अनेक तक्रारी

सांगत बसणें, हें फार निंद्य. जी सांगितलेली कामगिरी जो बजावतो, तीबद्दल त्यास कबूल केलेली रक्कम बिनतक्रार पोंचवण्यांत आली पाहिजे. यांत जर कां अतिक्रम झाला, तर व्यवस्थेचें गाडें फार दिवस सुरळीत चालणें नाहीं. उजू वाटेनें गेल्यास जी व्यवस्था राहून वचकही रहातो, ती व्यवस्था व तो वचक आड वाटेनें गेल्यास रहाण्याचा संभव नाहीं. जो प्रभु असेल किंवा ज्याचे हातीं एखादा एकसूत्री अधिकार असेल, त्यानें तरी फार जपून काम केलें पाहिजे; कारण कीं मुख्य जो कित्ता घालील तोच कित्ता वळवण्यास त्याच्या हाताखालची मंडळी तयार झालेली असते. **मद्रास** इलाख्यांत व **बंगाल** इलाख्यांत जी वाट **क्लैवनें** पकडली, ती आड वाट पडली. भर दुपारीं केवळ मणगटाच्या जोरावर सामना करून समोर-च्याकडून दांतीं तृण धरूं लावण्याचा मार्ग निराळा आणि लांचानें किंवा भुलथापांनीं पदरच्या मंडळीस फितवून विश्वासघातानें समोरच्यास जेर करण्याचा मार्ग निराळा. **क्लैवनें** जी पद्धति घातली ती वंद्य नव्हे, ती निःसंशय निंद्य होय. जें निंद्य वळण **क्लैवनें** " कंपनी "-च्या नोकरांस घातलें, तें त्यांनीं लगेच घेतलें. जें **राबर्ट क्लैव** या पुरुषानें " कंपनी "च्या नोकरांमध्यें पेरलें, तें लवकरच उगवलें. **क्लैवनें** पुनः पुनः तगादा लावून काढतां येतील तितके पैसे " नवाबा " पासून काढण्याचा क्रम चालवला होता. जसा **क्लैव** तसेच त्याच्या हाताखालचे कामगार. **मीर जाफर**च्या खजि-न्यांत पै राहिली नाहीं, तरी जळवा सुटतना. **इंग्रजांची** तुंबडी भरतां भरतांही **मीर जाफरास** भरतां आली नाहीं आणि पगार नीट वेळेवर न पोंचत गेल्यामुळें लष्करांतल्या शिपायांनीं कुरकुर चालविली.

२ **वान्सितार्त**—क्लैवच्या पश्चात् हा **बंगालचा** " गवर्नर " झाला. क्लैवच्या पश्चात् लौकरच **मुर्शिदाबादेस** जाऊन, **मीर जाफरास वान्सितार्त**नें पदच्युत केलें आणि **मीर जाफराचा मीर कासम** नांवाचा जांवई होता, त्यास गादी दिली. ही गादी दिल्याबद्दल **बर्धमान मिद्नापुर, चितगांग** या तीन तालुक्यांच्या वसूलाची सनद **मीरकासमास इंग्रजां**च्या पदरांत टाकावी लागली. **मीरजाफराचें** देणें आंगावर घेऊन, **कर्नाटकांतल्या** लढाईच्या खर्चाबद्दल आणखी पांच लाख रुपये " कंपनी "स देण्याचें **मीरकासम** कबूल करितो ! ! ! " कंपनी "चे **दुसरे** कामगार होते, त्यांची तुंबडी भरण्यासाठीं आणखीं **मीरकासमास** ९० लाख रुपये ओतावे लागले ! ! ! **मीरकासमानें मोंगीर** मुक्कामीं गादी नेली. **इंग्रजांस** कबूल केलेला पैसा द्यावयासाठीं **मीरकासमास** रयतेवर पुष्कळ जुलूम करावा लागला. सगळ्या पैशाचा भरणा झाला, तरी **इंग्रजांचा** संतोष होईना. अखेरीस **इंग्रजांचा एलिस** नांवाचा गुमास्ता **पाटणा** मुक्कामीं होता, त्यानें एकाएकीं हल्ला करून **पाटणा** शहर १७६० त कबजांत घेतलें. **मीरकासम** नेटानें काम करणारा होता. **मीरकासमानें**ही नेटानें हल्ला केला आणि **पाटणा** शहर पुनः काबीज केलें, तेव्हां कांहीं **इंग्रज** लढाईंत पडले. **एलिसा**बरोबर **इंग्रज** कैदही करण्यांत आले. तेव्हां आतां **इंग्रजांनीं** जांवयास हाकवून देऊन, सासऱ्यास पुनः गादी देण्याचा निश्चय केला; कां तर, आपण दिलेल्या लाथा निमूटपणें सोसून न घेतां जांवई उलट भांडत बसतो ! ! ! अखेरीस त्याच्या वयाच्या ७२ वे वर्षीं **मीरजाफरास इंग्रजांनीं** कैदेंतून आणिलें आणि सांगितलेल्या सगळ्या शर्ती कबूल होतांच पुनः गादीवर बसविलें. **मी-**

रकासम पुढें अयोध्येच्या " नबाबा "कडे गेला. अयोध्येच्या " नबाबा "चें नांव सुजाउद्दौला. दिल्लीच्या महंमदशहाचा मुलगा शहाअलम याच्या मदतीनें सुजाउद्दौलानें इंग्रजांशीं तंटा मांडला आणि बिहार प्रांत काबीज करण्याचा यत्न केला. पण त्यांच्या शिरस्त्याप्रमाणें " कंपनी"च्या इंग्रज नोकरांनीं शहाअलमला फोडलें आणि लगेच बक्सरच्या लढाईंत १७६४ सुजाउद्दौल्याचा मोड केला. १७६५ त कोराच्या लढाईत सुजाचा पुनः मोड झाला. लौकरच सुजानें इंग्रजांची तावेदारी पत्करली. शहाअलमशींही इंग्रज कबूल केलेल्या वर्षासनाच्या संबंधानें शिरस्त्याप्रमाणें वागले. त्यामुळें शहाअलम अगदीं विटून गेला आणि १७७१ त झाबिताखानास दिल्लींतून महादजीनें हांकविलें असें पाहून मराठ्यांकडे वळला. ज्यानें इंग्रजांस मदत करावी, त्यानें लौकरच पस्तावावें; अशा प्रकारची या काळच्या हिंदुस्थानांतल्या इंग्रजांची करणी दिसते.

## प्रकरण ३—( क्लैव परत आल्यानंतरची हकीगत ).

### ( इसवी शके १७६५ पासून १७६७ पावेतों ).

१ " क्लैव " परत येतो——ज्या दिवशीं कोराची लढाई झाली, त्याच दिवशीं क्लैव कलकत्ता मुक्कामीं पुनः येऊन पोंचला. " बंगालचा गवर्नर " आणि मुख्य सेनापती करून, क्लैवला " कंपनी"नें पुनः हिंदुस्थानांत धाडलें. मीरजाफर क्लैव येण्याचे पूर्वींच वार-

ला. तेव्हां १३ लाख रुपये घेऊन, " कंपनी "च्या नोकरांनीं लगेच एका अर्भकास गादी दिली. **शहाअलम इंग्रजांच्या** बाजूस आला होता, त्याच्यापासून **क्लैवनें** लौकरच **बंगाल, बिहार** आणि **उडिसा** या तीन प्रांतांतील " दिवाणी "हक्क ह्मणजे वसूल उगवण्याचा हक्क सालिना २६ लाख रुपये देण्याच्या बोलीनें विकत घेतला. अर्थांतच १३ लाख रुपये देऊन गादी मिळविणाऱ्या अर्भक नबाबावर गदा आली आणि गादी जाऊन **मुर्शिदाबाद** मुक्कामीं त्यास **इंग्रजांनीं** दिलेलें वर्षासन खात बसावें लागलें. या प्रमाणें नबाबाच्या गादीची समाप्ति झाली. आजच्या काळीं **मुर्शिदाबाद** मुक्कामीं " नबाबा "चें हयात आहेत. नंतर जशा दिवाणी खात्यांत तशा लश्करी खात्यांतही कांहीं सुधारणा करून, १७६७ त **क्लैव** आपल्या मुलुखीं परत गेला.

## भाग ४—[ मद्रासेंतील हकीगत ].

### ( इसवी शके १७६६ पासून १७६९ पावेतों ).

१ **हैदरअली**—याचा आजा **पंजाबांतून** फकीरी करीत करीत दक्षिणेंत आला. **हैदराचा** बाप पहारेकरी शिपाई होता. बापाच्या पश्चात् मामा लश्करांत नाईक होता त्यानें बहिणीचा आणि भाच्याचा सांभाळ केला. **त्रिचनापल्लीच्या** वेढ्यांत **ह्मैसुरकरांच्या** लश्करांत **हैदर** हजर होता. लौकरच **हैदरानें ह्मैसुरची** गादी वळकाविली आणि **फ्रेंच** कामगार आपल्या पदरीं ठेवण्यास सुरुवात केली. **ह्मैसुरच्या हिंदु** गादीची काळजी **इंग्रजांस** थोडीही असण्याचा संभव मुळींच नाहीं. पण **फ्रेंच** कामगार **इंग्रजांच्या** डोळ्यांत सलूं

लागले आणि त्यामुळें इंग्रजांनीं हैदराशीं तंटा आरंभला.

२ "ह्मैसुर" कराशीं पहिला तंटा—१७६७ त त्रिनोमाली-ची लढाई झाली, तींत हैदराचा पराभव झाला. तरी धीर न सो-डतां हैदरानें तंटा चालवला. लौकरच कर्नेल वुडची फौज दुडवून, ६००० स्वार व २०० निवडक प्यादे इतक्या फौजेनिशीं चवथा दि-वस अस्तास जाण्याचे पूर्वीं हैदरनें १३० मैलाची मजल मारली आणि मद्रासेपासून ५ मैलावर तळ दिला. ही हैदराची हुशारी पाहून, इंग्रजांची वोबडी वळली आणि त्यांनीं १७६९ त मद्रास-चा तह हैदराशीं केला.

# भाग ५—( "कंपनी"ची अगदीं अखेरपर्यंतची हकीगत ).

## प्रकरण १—( वारन हेस्टिंग्स ).

### ( इसवी शके १७६७ पासून १७८३ पावेतों ).

"इंग्रजां"चा क्रम पुनः सुरु होतो—( १७६७—१७७१ )—क्लैवच्या पश्चात् क्लैवचाच कित्ता "कंपनी"चे नोकर पुनः वळवूं ला-गले. क्लैवनें कागदावर कांहीं सुधारणा निःसंशय केल्या. पण बोलण्या-पेक्षां चालण्याचें वजन लोकांमध्यें अधिक पडतें. सुराज उद्दौल्यास गोड गोड शब्दांचीं पत्रें लिहून त्याचा अखेरीस विश्वास घात करणारा पु-रुष चांगलें उदाहरण कसचें घालणार? भागीदारीच्या नांवानें जसें म-द्रासेंत तसेंच बंगाल्यांत पहिल्यानें काम करून घेऊन, काम उरकतांच भागीदारांस भाग न देतां पुढून हाकवून लावणाऱ्या पुरुषानें कागदावर खरडलेले कायदेकानू कोण पाळणार? पैसा का-

ढण्यास **क्लैव**ला व **क्लैव**च्या बगलबच्चांस जसा **बंगाल**चा नबाब होता तसेंच त्या " नबाब "चें दर्बार असून दुसेरही मोठमोठे जमीनदार होते. लाखो रुपये खावयाचे ते खाऊन, " कंपनी "च्या नोकरांनीं अखेरीस " नबाबा "चें घराणें समूळ बुडविलें आणि **बंगाला, बिहार** आणि **उडिसा** हे तीन्ही प्रांत स्वतः बळकाविले. आतां " नबाबा "-प्रमाणें सहज बुडवण्यास सांपडण्यासारखा कोणी आसपास राहिला नाहीं. तेव्हां रयतेसच " कंपनी "चे नोकर गांजूं लागले आणि लांचलुचपत घेऊन कामें करूं लागले. "कंपनी"च्या तिजोरींत पैशांचा रोजच्या रोज भरणा चालता, ह्मणजे नोकरांनीं रयतेपासून कितीही लांचलुचपत घेतली असती, तरी तिकडे " कंपनी "चें लक्ष गेलें नसतें. **मीर कासम**नें कबूल केलेले लाखो रुपये भरण्यासाठीं रयतेवर कमी जुलुम केला, असें नाहीं. पण तो पैसा यावयाचा होता " कंपनी "कडे, ह्मणून " कंपनी "चें लक्ष त्या प्रसंगीं आपल्या नोकरांकडे किंवा " नबाबा "-च्या रयतेकडे गेलें नाहीं. या प्रसंगी " कंपनी "च्या तिजोरींत भरणा व्हावयाचा, तो "कंपनी"चया नोकरांच्या खिशांत होऊं लागला. ह्मणून " कंपनी "स रयतेची कींव आली आणि तिजोरींत पुष्कळ भरणा होत जाईल अशी व्यवस्था लावण्यासाठीं " कंपनी "नें १७७१ त एक मुख्य ( गवर्नर जनरल ) नेमला. **मद्रास** इलाखा व पश्चिम किनाऱ्यावरील कंपनीचीं ठाणीं या " गवर्नर जनरल "च्या अंमलांत या काळापासून आलीं.

२ **वारन हेस्तिंग्स**—हा पहिला " गवर्नर जनरल ". यानें राजकी कारस्थानाचें शास्त्र **क्लैव**च्या डोळ्यांखालीं अध्ययन केलेलें. १७७२ च्या **एप्रिल** महिन्यांत अधिकार याच्या हातीं आला. जाहीर करून, जो अधिक चढवील त्यास वसुल उगवण्याची परवानगी देण्याची

लिलांव वहिवाट **हेस्टिंग्स**नें घातली. लिलांव घेणाऱ्यांची एकमेकांत चढाओढ चालली, म्हणजे "कंपनी"चा सहजच फायदा झाला; मग थोडाबहुत जुलुम पुढें लिलांव घेणारांनीं रयतेवर केला तरी तिकडे दृष्टि कोण पोंचविणार? ही व्यवस्था रयतेची कींव येऊन केलेली निःसंशय नव्हे. तरी खाली झालेल्या तिजोरींत एकदम भरणा कसा होतो, ही विवंचना होतीच. २६ लाख रुपये जे सालिना पोंचावयाचे, त्या संबंधानें अव्यवस्था झाली; ह्मणून **शहा अलम** नुकताच **शिंद्या**कडे गेला होता. तेव्हां हे वर्षाचे २६ लाख रुपये "कंपनी"च्या तिजोरींत **हेस्टिंग्स**ला सहज ठेवतां आले.

३ **अयोध्येचा नवाब**—जसा **क्लैव**ला **बंगाल**चा "नबाब" सांपडला, तसा **हेस्टिंग्स**ला **अयोध्ये**चा "नबाब" सांपडला. एकास **क्लैव**नें बुडविलें, दुसऱ्यास **हेस्टिंग्स**नें बुडविलें. **काशी** मुक्कामीं **नबावा**शीं **हेस्टिंग्स**नें एक ठराव केला. या ठरावा अन्वयें **कोरा** आणि **अलाहाबाद** हे दोन प्रांत ५० लाख रुपयांस "नबाबा"स **हेस्टिंग्स**नें विकत दिले. **रोहिलखंडा**वर "नबाबा"स स्वारी-कर्तव्य होती, तींत जी नेमकी फौज **हेस्टिंग्स** पाठवील तिचा स्वारी अखेरपर्यंतचा खर्च "नबाबा"नें सोसावा; आणि स्वारी अखेर "नबाबा"ची फत्ते झाल्यास, आणखीं ४० लाख "नबाबा"नें **हेस्टिंग्स**ला द्यावे.

४ "**रोहिलखंडा**"**वरील स्वारी**—फत्ते झाल्यास **हेस्टिंग्स**ला ४० लाख रुपये मिळावयाचे होते; फत्ते होण्यास दहशत पडली पाहिजे आणि रक्तपाताशिवाय किंवा बरेच क्रौर्याचे प्रसंग आणल्याशिवाय दहशत पडणें तर शक्य नाहीं. **हेस्टिंग्स**नें हें सगळें फौजेस व लश्करी कामगारास आंतून सुचवून ठेवलेलें असण्याचा संभव आहे. ते-

ऱ्हां इंग्रजी लश्करानें स्वारींत लुटून फन्ना करण्याचा किंवा जाळून खाक करण्याचा क्रम चालविला, त्यांत नवल नाहीं. याप्रमाणें "नवाबा"ची रोहिलखंडांत फत्ते झाली आणि ४० लाख रुपये "कंपनी"च्या तिजोरींत आले.

४ "रेग्युलेटिंग आक्ट" [ व्यवस्थेचा कायदा ]—हा १७७३त "पार्लमेंटां"त पसार झाला आणि १७७४त हिंदुस्थानांत अंमलांत आला. या कायद्या अन्वयें ४ मसलती "गवर्नर जनरल"ला मिळाले. इनसाफ करण्यासाठीं अव्वल कोडताची स्थापना होऊन, एक अव्वल न्यायमूर्ति नेमण्यांत आला आणि त्यास तीन दुय्यम मिळाले. इनसाफाचें कोडत "गवर्नर जनरल"च्या ढवळाढवळीपासून अगदीं अलग ठेविलें. जसा पहिला "गवर्नर जनरल" वारन हेस्तिंग्स, तसा पहिला "अव्वल" न्यायमूर्ति सर एलिजा इंपे. बार्वेल, फ्रांसिस, क्लावरिंग, मानसन हे पहिले चार मसलती. या पैकीं शेवटचे तिघे इंग्लंडमधून पाठविण्यांत आले.

६ "मसलती" व "हेस्तिंग्स" यांच्यामधील अनबनाव— इंग्लंडांतील गोरे लोक आणि हिंदुस्थानांतच जन्मून वाढलेले गोरे लोक यांच्यामध्यें एकंदरींत पुष्कळ अंतर असतें. इंग्लंडांतील गोरे लोक एकंदरींत जुलमाचा व अन्यायाचा द्वेष करणारे असतात आणि मनानें थोर असतात. हिंदुस्थानांत जन्मून वाढलेले गोरे लोक एकंदरींत जुलमाकडे व अन्यायाकडे बराच कानाडोळा करणारे असून, मनानें पुष्कळ कोते असतात. हेस्तिंग्स हा क्लैवप्रमाणें हिंदुस्थानांत वाढलेला आणि क्लैवचें वळण पहिल्यापासून लागलेला. अर्थात नवीनच आलेल्या मसलत्यांचें आणि हेस्तिंग्सचें जमेना. बहुमतानें कारभार चालायाचा; अर्थातच तिघे एका बाजूस, अशी स्थिति होऊन हेस्तिंग्स मोठ्या विवंचनेत

पडला. तशांत **नंदकुमार** नांवाचा **बंगाली** ब्राह्मण होता, त्यानें **हेस्तिंग्सवर मीर जाफराचे** बायकोपासून लांच खाल्ल्याचा आरोप आणला. मसलती पडले इनसाफासाठीं नांवाजलेले **इंग्लंडां**तले इंग्रज. **नंदकुमारास** इनसाफ मिळाला पाहिजे, असें मसलत्यांनीं बहुमतानें ठरविलें. असा ठराव झाला, तेव्हां **हेस्तिंग्स** सभास्थान सोडून आणि **बारवेल** नांवाचा बगलबच्चा मसलत्यांमध्यें होता त्यास घेऊन रागानें चालता झाला. बनावट दस्तैवज केल्याचा आरोप आणून, **हेस्तिंग्सनें नंदकुमारास** लगेच कैद करविलें. अव्वल न्यायाधीश पहिल्यापासून **हेस्तिंग्स**च्या बाजूचा होता. " जुरी "मधील १२ही गोरे **हिंदुस्थानां**त वाढलेल्यापैकीं होते. अव्वल न्यायमूर्तीनें तीन दुय्यमांच्या मदतीनें १२ गोऱ्यां समक्ष इनसाफ केला; आणि गुन्हा शाबीत झाला असें ठरवून, **नंदकुमारास** फांशीची शिक्षा दिली. या काळच्या **इंग्लंडां**तल्या कायद्यांत खोटा लेख करणारास फांशीची शिक्षा सांगितली होती, असें ह्मणतात. पण **क्लैवनें** खोटी सही केली ती बद्दल शिक्षा न होतां उलट **क्लैव**ची बढती झाली आणि **इंग्लंडां**तल्या बड्या बड्या प्रधानांनींही त्याची तारीफ केली. **नंदकुमारास** मात्र खोट्या सही बद्दल फांशीची शिक्षा देण्यांत आली ! ! ! याप्रमाणें **हेस्तिंग्स** एका कचाटांतून सुटला. इतक्यांत **मानसन** नांवाचा मसलती होता, तो वारला. आणि त्यामुळें " प्रासंगिक " मत मिळून हवा तसा कारभार **हेस्तिंग्स** चालवूं शकला.

एखाद्या मुद्याच्या संबंधानें मतें समसमान पडल्याचा " प्रसंग " गुदरल्यास मात्र अध्यक्षास आपलें " प्रासंगिक " मत देतां येऊन आपल्या मर्जी प्रमाणें सहज निकाल करतां येतो. असला "प्रसंग" नसतो तेव्हां " प्रासंगिक " मत देतां येत नसल्यामुळें " मसलती "

किंवा दुसरे " सभासद " बहुतमानें करतील तो ठराव—स्वतःस अगदीं नापसंत असला तरी—अध्यक्षास मंजूर करावा लागतो, अशी पाश्चिमेकडील लोकांची—जशीं राज्यसंबंधी तशीं दुसरीं सार्वजनिक—कामें उलगडण्याची एक ठरींव मर्यादा आहे. अध्यक्षपणाशीं संबंध असेल तोंपर्यंत हें " प्रासंगिक " मत जसें अध्यक्षास असतें, तसें " मसलती " किंवा " सभासद " या नात्यानें एक " साधारण " मतही असतें. याप्रमाणें जरी हेस्तिंग्सला दोन मतें देतां येत होतीं, तरी तिघे " मसलती " एका बाजूस होत असत, त्यामुळें ठराव **हेस्तिंग्सच्**या विरुद्ध होई. पण **मानसन** वारल्यानें **हेस्तिंग्सचें** साधारण मत व **बार्वेलचें** एक मिळून २ मतें एका बाजूस होऊन दुसऱ्या बाजूस दोन मतें झालीं ह्मणजे " प्रासंगिक " मत देऊन **हेस्तिंग्स** आपणास इष्ट असेल त्या दिशेनें कारभाराचें तारूं सहज वळवूं शकला.

**७ काशीचा राजा " चैतसिंग**—हा पहिल्यानें **अयोध्ये**च्या " नबाबा "स करभार देत असे. हा करभार आपणांकडे न भरतां **इंग्रजां**कडे भरावा अशी व्यवस्था स्वतःच्या सोईसाठीं " नबाबा "नें केली. **हेस्तिंग्सनें चैतसिंगा**जवळ ५ लाख रुपये एकाएकीं कांहीं कारण नसतां अधिक मागितले. " बळी तो कान पिळी "हा न्याय जसा **क्लैव**चा होता, तसाच त्याचें शिष्यत्व स्वीकारलेल्या **हेस्तिंग्स**चा होता. **काशी**कर राजा रकम देईना, तेव्हां एकाएकीं जाउन राजास **हेस्तिंग्सनें** कैद केलें. पण लोक राजाच्या तर्फे उठले, त्यामुळें राजास सुटून **ग्वाल्हेर** मुक्कामीं जाण्यास सवड सांपडली. **हेस्तिंग्स**ही रात्र पडतांच काळोखांतून पळाला, तो चुनारच्या किल्ल्यांत आला. या किल्ल्यांत **इंग्रजां**चें ठाणें होतें. पुढें फौज आणून, **चैतसिंगा**चा खजिना **इंग्रजां**नीं बळकावला आणि **चैतसिंगा**च्या पुतण्यास गादी देऊन **चै-**

**तसिंग** करभार देत असे त्याच्या दुप्पट पुतण्यापासून घेण्याचा **हेस्तिंग्सनें** ठराव केला.

८ **असफउद्दौला**——हा **सुजाउद्दौल्याचा** मुलगा. **सुजाच्या** पश्चात् हा नवाब झाला. याच्या जवळ **हेस्तिंग्सनें** पैशाचें मागणें केलें. पण पैसा **असफा** जवळ नव्हता. तेव्हां "बेगमां"कडे **हेस्तिंग्स** वळला. ७६ लाख रुपये पाषाणहृदयी **हेस्तिंग्सनें** गरीब बिचाऱ्या अबलापासून काढले आणि "कंपनी"च्या तिजोरींत भरले. याप्रमाणें १७८१ त **हेस्तिंग्सनें** **मुजाउद्दौलाच्या** "बेगमां"स लुटलें.

९ "**इंग्रजां"चा "म्हैसुर"कराशीं दुसरा तंटा**——१७७२ त **माधवराव** वारला आणि **हैदरनें** पेशव्यास दिलेला मुलुख लौकरच परत घेतला. नंतर लौकरच **कूर्ग** प्रांतही **हैदरनें** सर केला. १७८८ त वर **कृष्णा** नदीपर्यंत **हैदरच्या** मुलखाची हद्द येऊन लागली. पुढें **इंग्रजांचा** **फ्रेंचांशी** तंटा सुरु होऊन **मद्रासच्या** गवर्नरानें **माही** हें **फ्रेंचांचें** ठाणें घेतलें. **माहीच्या** भोंवतालचा मुलुख **हैदरचा** होता. **हैदरच्या** परवानगी शिवाय त्याच्या मुलुखांतून गेले, हें **इंग्रजांचें** करणें गैर होतें. अर्थातच **हैदरास** राग आला. **इंग्रजांनीं** गोड बोलून स्नेह करण्याच्या हेतूनें वकील **हैदराकडे** पाठविला. पण नुसत्या गोड बोलण्यानें **हैदरासारख्याकडे** काम होत नसतें. **हैदरानें** पेशव्याशीं आणि **निजामाशीं** स्नेह ठेवून, **इंग्रजांच्या** मुलुखावर स्वारी केली. **इंग्रजांनीं** **गंतुर** सर करण्यासाठीं **बेलीस** धाडलें. पण **पोलिलूरची** लढाई १७८० त झाली, तींत पुरा मोड होऊन **बेली** **हैदरच्या** हातीं लागला. **इंग्रजांचा** मुख्य सेनापति **मनरो** २ कोसांवर होता, त्यानें **बेलीच्या** मोडाची गोष्ट कानीं पडतांच **मद्रासची** दिशा धरली. अशी धांदल उडालेली ऐकतांच **हेस्तिंग्सनें** कुमक पाठविली. **भोसल्याच्या** मुलुखांतून जाण्यास परवानगी मि-

ळावी, ह्मणून **हेस्तिंग्स**ला वराच पैसा खर्चावा लागला. **पण चैतसिंगास** व **बेगमांस हेस्तिंग्स**नें नुकतेंच लुटून फन्ना केलें होतें, ह्मणून "कंपनी"च्या तिजोरींत पैशाची वाण नव्हती. १७८१ त **पोलिलूर**ची दुसरी लढाई झाली, तींत जरी **हैदरा**चा मोड झाला तरी **कोलरून** नदीवर **हैदर**चा मुलगा **टिपू** यानें २६ तास तुंबळ लढाई करून, **निगापट्टण** नुकतेंच सर केल्यामुळें गर्वानें फुगलेली **ब्रेथवेट**ची सगळी फाज बुडविली. लौकरच **हेस्तिंग्सनें** पैसे खर्चून "पेशव्या"स फोडलें आणि **हैदरा**च्या मुलुखांत "पेशव्या"कडून धुमाळी चालेल अशी तजवीज केली. १७८२ त **अरणी**ची लढाई झाली, तींतही पराभव झाला, तरी **हैदर**चा धीर खचला नाहीं. लौकरच **डिसेंबर** महिन्यांत **हैदर** वारला आणि त्याच्या पश्चात् त्याचा मुलगा टिपू गादीवर बसला. **टिपूनें मंगलुर** व **बेदनूर** हीं दोन्ही स्थळें सर केलीं. **इंग्रजांनीं** लढाई चालविली असती. पण **कोलरून** नदीवरील **टिपू**चा पराक्रम आठवणींत येऊन त्यांनीं तहाचें बोलणें लाविलें आणि लौकरच १७८४ त **मंगळूर**चा तह झाला.

१० **"पिट"चा कायदा——इंग्लंडां**तील गोरे लोक व **पार्लमेंट** हीं किती न्यायप्रिय असतात आणि यांस जुलुमाचा उपजतच किती कंटाळा असतो, हें या कायद्यावरून कोणाच्याही लक्षांत येईल. **हेस्तिंग्स**चीं काळीं कृत्यें ऐकून व वाचून **इंग्लंडां**तील उदार दिलाच्या **इंग्रजां**च्या आणि त्यांनीं अधिकार दिलेल्या प्रतिनिधींच्या आंगाचा तिळपापड झाला त्यामुळें "प्रतिनिधीं"च्या सभेंत लौकरच ह्मणजे १७८४ त वरील कायदा पसार करण्यांत आला. यांतील मुख्य कलमें—

१ व्यापारी मंडळीच्या व्यवस्थापकांनीं ३ व्यवस्थापक निवडून

त्यांच्यावर सर्व अधिकार सोंपवावा. या तिहींच्या कमीटीवर सहांची कमीटी प्रधानांच्या मंडळीनें नेमावी आणि सहांच्या कमीटींत जो अध्यक्ष असेल तो पार्लमेंट सभेनें कमीटीच्या ठरावाबद्दल जबाबदार समजावा. या सहांच्या कमीटीस " देखरेखी मंडळी " ( बोर्ड आफ कंट्रोल ) ह्मणावें.

२ देशी राजांशीं किंवा राजवाड्यांशीं——स्वसंरक्षणाचा प्रसंग मात्र वर्ज करून—सख्य किंवा लढाई " गवर्नर जनरल "नें हुकमाशिवाय करतां कामां नये.

३ " कंपनी "च्या नोकरानें राजेराजवाड्यांशीं देवेघव करितां कामा नये.

११ हेस्टिंग्स "चा राजीनामा——हा कायदा पसार होतांच राजीनाम्या खेरीज दुसरा मार्ग **हेस्टिंग्स**ला राहिला नाहीं. राजीनामा देऊन १७८५ त **फेब्रुवारी**च्या पहिल्या तारखेस **हेस्टिंग्स** तारवांतून निघाला. स्वदेशीं पोंचल्या नंतर **हेस्टिंग्स**चीं कृष्ण कारस्थानें एकापाठून एक बाहेर पडूं लागलीं. " पार्लमेंट "मध्यें दोन पक्ष असतात त्यापैकीं जुलमाची व अन्यायाची चीड एका पक्षास विशेष असते. या पक्षास "लिबरल्" पक्ष ह्मणतात. या पक्षांत **बर्क** नांवाचा एक नामांकित वक्ता होता. **फ्रांसिस** नांवाचा जुना मसलती या काळीं **इंग्लंडां**त गेलेला होता, त्याच्यापासून **बर्क**ला पुष्कळ आंतली खरी माहिती मिळाली. त्यामुळें **हेस्टिंग्स**चे गुन्हे शाबीत करण्याचें जोखमाचें काम **बर्क**नें अगदीं निष्काम बुद्धीनें पत्करलें. १७८८ त **फेब्रेवारी**च्या १३ वे तारिखेस चौकशीस आरंभ झाला. ही चौकशी ७ वर्षांवर चालून अखेरीस १७९५ त **एप्रील** महिन्याच्या २३ वे तारिखेस संपली. **हेस्टिंग्स** बड्या लोकांपैकीं होता, ह्मणून बड्या लोकांचें मन आरंभापासून **हेस्टिंग्स**कडे कललेलें होतें.

" पार्लमेंट " सभेचे दोन भाग आहेत—एक प्रतिनिधींचा ह्मणजे साधारण प्रतीच्या लोकांचा आणि एक बड्या लोकांचा ह्मणजे सरदारांचा. साधारण लोकांच्या सभेचे सभासद—प्रसंग पडतो तेव्हां—बहुमतानें निवडले जातात. सरदारांच्या सभेचे सभासद आपल्या सरदारकीच्या जोरावर सभासद बनतात, त्यांस कोणी निवडीत नाहीं आणि त्यांस कोणासही जबाब देण्याची जरूरी नसते. साधारण सभेच्या सभासदांस त्या त्या प्रसंगीं निवड करणांरास जबाब द्यावा लागतो. जसा साधारण सभेच्या सभासदांस जुलमाचा तिटकारा असतो, तसा बड्या लोकांस अर्थातच नसतो. बड्या लोकांमध्यें चौकशी होऊन बहुमतानें **हेस्तिंग्स** सुटला त्यांत नवल नाहीं. तरी मोकळ्या मनानें **हेस्तिंग्स**ला गुन्हेगार ठरवण्यास थोडे तरी बडे लोक सांपडले, ही गोष्ट **इंग्लंड** देशास विशेष भूषणास्पद आहे. **क्लैव**चा शेवट **हेस्तिंग्स**च्यापेक्षांही वाईट झाला. एकंदरींत साधारण प्रतीचे लोक गुन्हेगाराप्रमाणें समजूं लागले आणि त्यामुळें अगदीं त्रासून अखेरीस त्यानें आत्महत्या केली.

## प्रकरण २—( लार्ड कार्नवालिस )

### ( इसवी शके १७८६ पासून १७९३ पावेतों ).

१ **म्याकफर्सन**—हा " मसलत्यां "मध्यें अधिक वर्षें काम केलेला असल्यामुळें, शिरस्त्याप्रमाणें **हेस्तिंग्स**च्या पश्चात् " गवर्नर जनरल "चें काम पाहूं लागला. प्रधान मंडळीनें या प्रसंगीं एक मोठ्या महत्वाचा निकाल केला. तो हा कीं होतां होईपर्यंत " गवर्नर जनरल "च्या अतिशय जबाबदारीनें भरलेल्या अधिकारावर **हिंदुस्थानां**त वाढ-

लेला गोरा न नेमतां, **इंग्लंडांतून** एकदा कुलीन व कर्तबगारी आंगीं आहे असा सर्दार रवाना करावा. या निकाला अन्वयें **लार्ड कार्नवालीस** या सर्दारास "गवर्नर जनरल"की मिळून, प्रसंगीं "मसलत्यां"स एके बाजूस ठेवून स्वतंत्रपणेंही वागण्याचा अधिकार मिळाला. **पिटच्या** कायद्याबरहुकूम चालण्याचा निश्चय करून **"लार्ड कार्नवालीस"** निघाला, तो १७८६ त आपल्या हुद्यावर रुजू झाला.

२ "**लार्ड**" **कार्नवालिस**——**मंगळूर**चा तह झाल्यानंतर **टिपूनें** **पेशव्यां**शीं व **निजामा**शीं तंटा सुरु केला. यांत ४५ लाख रुपये द्यावे लागून, **तुंगभद्रे**वर **टिपूच्या** मुलुखाची हद्द गेली. नंतर **टिपूनें त्रावणकोर**वर स्वारी केली. यांत पहिल्यानें **टिपू**चा मोड झाला, तरी अधिक कुमक तावडतोब आणवून **टिपूनें त्रावणकोर**करावर छाप बसविली. या प्रसंगीं **इंग्रज, पेशवे** आणि **निझाम** या तिहींनीं मिळून स्वारी करावी आणि जो फायदा होईल तो समसमान वांटून घ्यावा असा ठराव झाला. या ठरावा अन्वयें तिघांच्या फौजा **टिपूवर** निघाल्या. **कार्नवालिसा**ला एकदा १७९१ त थोडें हटावें लागलें, कारण **पेशव्या**कडून कुमक नेमलेल्या वेळेवर येऊन पोंचली नाहीं. **कार्नवालीस** पाठीं हटूं लागला आणि दुसरे दिवशीं **हरिपंत फडके पेशव्या**कडची कुमक घेऊन दाखल झाले. पुढें सगळी तयारी पुरी करून, खांसा **कार्नवालिसानें** १७९२ त **श्रीरंगपत्तनावर** हल्ला केला. **कार्नवालीस** पुढें पाऊल टाकीत चालला आणि बुरुजावर बुरुज सर करीत चालला. **श्रीरंगपत्तन** आतां नक्की पडणार असें जेव्हां पाहिलें, तेव्हां **टिपूनें** तहाचें बोलणें चालविलें. पुढें तह झाला, त्यास "**श्रीरंगपत्तना**चा तह" ह्मणतात. या तहाच्या शर्ती——

१ अर्धा मुलुख भागीदारांस वांटून देण्यासाठीं **टिपूनें** द्यावा.

२ आणखीं ३ कोटि ३० लाख रुपये द्यावे.

३ सगळे कैदी सोडावे;

४ या शर्ती पुऱ्या होत पर्यंत आपले मुलगे **इंग्रजांकडे** ओलीस पाठवावे.

२ वास्तविक पाहिलें असतां ब्रह्मबादशाहीकडून मदत व्हावी तशी झाली नव्हती. तरी "लार्ड" **कार्नवालीसानें** जसे मुलुखाचे तसे पैशाचे तीन सारखे वांटे करून, एक वांटा **ब्रह्मबादशाहीच्या** हिशोबीं लाविला. जर या प्रसंगीं **क्लैवशीं** किंवा त्याच्या शिष्याशीं गांठ असती, तर अनेक सबबी निघून जसें पूर्वी **तंजावरकरास, ह्मैसुरकरास** आणि **मुराररावास** हात हालवीत जावें लागलें तसें या काळींही **ब्रह्मबादशाहीच्या** आणि **निझामाच्या** गुमास्त्यांस जावें लागतें. पण "लार्ड" **कार्नवालिस** हा मुळचाच सरदार घराण्यांतला असून **इंग्लंड** देशांत वाढलेला पडला; **क्लैवप्रमाणें** किंवा **हेस्टिंग्सप्रमाणें** **हिंदुस्थानांतील** लोकांवर जुलूम करून आणि अनेक निमित्तांनीं त्यांच्यापासून पैसा उपटून सर्दारकी मिळविण्याची किंवा अंमलदारी दाखवण्याची हौस त्याच्या हाडीं खिळलेला नव्हती.

३ **कायमच्या धाऱ्याची सुधारणा**——**हेस्टिंग्सनें** सारा वसूल करण्याच्या हक्काचें लिलांव करण्याची नवीन पद्धत घातली होती तीपासून केवळ लिलाव घेणाऱ्या सावकारांचें पिकून, जसे जमीन लागवड करणारे तसेच जमिनींचे मालक दिवसें दिवस गरीब होऊं लागले. अशा प्रसंगीं जमीन जमिनीच्या मालकांची ठरवून, कायमच्या धाऱ्याची पद्धत **कार्नवालीसानें** सुरू केली. ही पद्धत **बंगाल** इलाख्यांत मात्र हल्लीं अंमलांत आहे. **मुंबई** इलाख्यांत ३० व-

र्षांच्या पहाणीची पद्धत आहे. तीस वर्षांनीं या इलाख्यांत पहाणी होते आणि पहाणीचे प्रसंगीं अंमलदारांकडून धारा वाढविला जातो. त्यामुळें लोकांचा सरकारावर थोडा अविश्वास होतो आणि जमिनीची व्हावी तशी सुधारणा होत नाहीं. जेवढा पैसा आपण खर्चूं तेवढ्या सगळ्याचें फळ आपणास भोगावयास मिळेल, अशी कायमच्या धाऱ्याच्या पद्धतींत जशी जमिनदाराची खात्री असूं शकते, तशी ३० वर्षांच्या पहाणीच्या पद्धतींत असूं शकत नाहीं. **कार्नवालीसानें** कायमच्या धाऱ्याची पद्धत सुरू केल्यामुळें, **बंगाल**चे लोक आज सुखी व मातबर झाले आहेत; ३० वर्षांच्या पहाणीची पद्धत अंमलांत असल्यामुळें, आपल्या इलाख्यांतील लोक दुःखी व भिकारी होत चालले आहेत.

४ **"कार्नवालीस"ची दुसरी मोठी सुधारणा**——हेस्तिंग्सच्या कारकीर्दीत "कलेकटर" जसा वसूल उगावी तसा इनसाफही करी. पण **कार्नवालिसनें** इनसाफाचें खातें निराळें करून वसुलाच्या बाबी खेरीज बाकीच्या बाबी "कलेकटर" कडून काढिल्या आणि वसुलच्या बाबींच्या संबंधानें "बोर्ड आफ् रेविन्यू" नांवाची कमिटी स्थापून "कलेकटरा"स तिच्या अंमलाखालीं ठेविलें. इनसाफाचें खातें निराळें केल्यामुळें, जिल्ह्यामध्यें न्यायाधीश ( जड्ज ) नेमण्यांत आले.

५ **कार्नवालीस**——यांप्रमाणें सुधारणा करून, १७९३ त **कार्नवालीस** आपल्या मुलखीं गेला. थोडा विचार केल्यास असें दिसून येईल कैव व **हेस्तिंग्स** यांच्या सारख्या पुरुषांनीं **इंग्रज** लोकांचें नांव जितकें काळें केलें, तितकेंच **कार्नवालीसानें** व त्याच्या वर्गांतील पुरुषांनीं गोरें केलें.

# प्रकरण ३—(सर जान् शोर).

## ( इसवी शके १७९३ पासून १७९८ पावेतो ).

**सरजानशोर**——हा " कंपनी "चा नोकर जरी **हिंदुस्थानां**त वाढलेला होता, तरी **कार्नवालीचा** उजवा हात होता. कायमच्या धाऱ्याच्या पद्धतींत यानें अतिशय मदत केल्यामुळें, **कार्नवालीसानें** याची पुष्कळ शिफारस केली. अर्थात हा **कार्नवालीसाच्याच** वर्गातला पुरुष. हा हाडाचा खरा आणि मोठा प्रामाणिक अशी **इंग्लंडांत**ल्याही लोकांमध्यें प्रसिद्धि झाली होती. ह्मणून **कार्नवालीसा**च्या पाठीं यास यास " गवर्नर जनरल "की मिळाली.

२ " **खर्ड्या** "**ची लढाई**—**कार्नवालीस**चे कारकीर्दींत जो " त्रिवर्गांचा तह " झाला होता, त्यांत त्रिवर्गापैकीं कोणावरही शत्रूनें हल्ला केल्यास इतरांनीं मदत करण्याची एक मुख्य शर्त होती. या तहाचा स्वतःस अनुकूळ अर्थ करून **निजामानें इंग्रजां**जवळ मदत मागितली. जर **क्लैव** किंवा **हेस्तिंग्स** या काळीं **हिंदुस्थानां**त **इंग्रजां**चा सत्ताधारी असता, तर तो नवीन खटले उपस्थित करण्यास न चुकता. पण त्रिवर्गापैकीं दोघे जर एकमेकावरच उठले, तर तिसऱ्यानें दोहोंपैकीं कोणासही मदत करणें रास्त नाहीं; असा योग्य विचार करून, **सर जान शोरनें निजामा**स मदत केली नाहीं.

३ " **अयोध्येचा** " **नवाब**—**सुजा**चा मुलगा **असफ** हा १७९७ त वारला. " रेसिडेंटा "चीं कारस्थानें प्रत्येक देशी राजेरजवाड्याच्या दर्बारीं चाललेलीं असायाचीं राजेरजवाड्यांपैकीं कोणी मयत झाला कीं " रेसिडेंटा "नें ढवळाढवळ केलीच, असें **इंग्रजी** अंमलाच्या

इतिहासांत पुनः पुनः वाचण्यांत येतें. असल्या खटपटीस अनुसरून, **वजीर अलीस** नबाबाची गादी **असफा**च्या पश्चात् देण्यांत आली. पण " **वजीर अली** हा **असफा**चा औरस किंवा कोणत्याही प्रकारें वारस नाहीं " अशी बातमी लौकरच जिकडे तिकडे पसरली. तेव्हां स्वतः **अयोध्येस** जाऊन, **शोर**नें चौकशी चालविली. चौकशीच्या अंतीं **वजीर अली** खरा वारस ठरला नाहीं. त्यामुळें **असफा**चा भाऊ **सादत अली** नांवाचा होता, त्यास **शोर**नें गादीवर बसविलें. असल्या प्रसंगींही **क्लैव**सारखा किंवा **हेस्टिंग्स**सारखा सत्ताधारी असता तर न्यायअन्यायाकडे न ढुंकताही तो पहिल्यानें " कंपनी "ची आणि सोबत आपली तुंबडी मात्र भरता.

४ **"शोर" मुलखीं जातो**—याप्रमाणें इंग्रजांचें नांव **कार्नवाली**-नें चांगलें उजळ केलें होतें तें तसेंच उजळ ठेवून, लौकरच " **लार्ड टेनमौथ** असा किताब मिळाल्यामुळें सरदार बनलेला **शोर** १७९८ त आपल्या मुलुखीं गेला.

## प्रकरण ४—( मार्किस आफ वेलेसली ).

### ( इसवी शके १७९८ पासून १८०५ पावेतों ).

१ **मनु बदलतो**—**शोरच्या** पाठीं " मार्किस आफ **वेलस्ली** " हा सर्दार " गवर्नर जनरल " होऊन आला. **इंग्रज** लोकांच्या सर्दा-रांमध्यें **कार्नवालीस**सारखे पुरुष थोडे असतात आणि पुढें सर्दारकी पावलेले **क्लैव** आणि **हेस्टिंग्स** यांच्यासारख्यांचा विशेष भरणा असतो. त्यामुळें " गवर्नर जनरल "की मिळून **वेलस्लीनें हिंदुस्थानांत** पाऊल टाकलें, त्या दिवसापासून कारस्थानांस पुनः आरंभ झाला.

२ **पलटणें ठेवविण्याची पद्धत**—**इंग्रज** लोकांचीं पलटणें राजेरजवाड्यांकडून व नबाबांकडून ठेवविण्याची व पलटणांच्या खर्चाबद्दल ह्मणून मुलुख तोडून देवविण्याची पद्धत **वेलेस्लीनें** नवीनच घातली. या पद्धतीनें खर्चाचा बोजा अर्था अर्थी परक्यावर पडून **इंग्रजांचें** लश्कर " गव्हर्नर जनरला "स सहज वाढवतां आलें. याप्रमाणें नवीन शिकाऱ्यानें पसरलेल्या जाळ्यांत **निजाम** मात्र सांपडूं शकला. **शिंद्या**-पुढें व " पेशव्या " पुढें **वेलेस्लीनें** गाणें बरेंच गाइलें; पण हरिणपणाचा अंश जसा **महादजी**मध्यें तसाच **नाना** " फडणिसा "मध्येंही नसल्यामुळें, **वेलेस्ली**स शिकार सांपडली नाहीं.

३ " **टिपू** "शीं " **इंग्रजां** "**चा शेवटचा तंटा**—**फ्रेंच** लोक **टिपू**च्या पदरीं होते, ते **वेलेस्ली**च्या डोळ्यांत सलूं लागले. तशांत या काळीं **इंग्रजांचा** व **फ्रेंचांचा** तंटांत **युरोपां**त जुंपला होता. **वेलेस्लीस** ही संधि **टिपूस** समूळ बुडविण्यास चांगली सांपडली. **वेलेस्ली** स्वतः **मद्रासेस** आला आणि **हारिस** नांवाचा सेनापति १८ हजार शिपाई आणि १०४ तोफा घेऊन **श्रीरंगपत्तनावर** निघाला. **निजामानें इंग्रज** कामगारांनीं शिकविलेल्या १६ हजार लोकांची कुमक पाठविली. **मलबारांतून** येण्यास **स्टुअर्ट** नांवाच्या **इंग्रजी** कामगारासही **वेलेस्लीनें** हुकुम फर्माविला होता. या जंगी फौजेपुढें एकट्या **टिपूचा** टिकाव काय लागणार? **शिंद्याची** मदत नाहीं, " पेशव्या "ची मदत नाहीं; त्यामुळें तहाशिवाय **टिपूस** दुसरा उपाय राहिला नाहीं. **टिपूनें** तहाचें बोलणें चालविलें. पण **बंगाल**च्या " नबाबा " सारखें कांहीं वर्षासन घेऊन गादी व मुलुख सगळें **इंग्रजांच्या** ताब्यांत करणें ही **वेलस्ली**ची शर्त **टिपूस** पसंत पडली नाहीं. **टिपूचें** हाड वीराचें होतें; त्यानें रणभूमीवर धारातीर्थी प्राणत्याग करण्याचा संकल्प केला. **इंग्रजांनीं** हल्ला के-

ला, तेंव्हां **टिपू** आपल्या लोकांसहित वीराप्रमाणें भांडला. पण **इं-ग्रजांच्या** असंख्य शिपायांपुढें **टिपूच्या** मोजक्या फौजेचें कांहीं चाललें नाहीं आणि तुंबळ झुंज माजवून भांडतां भांडतां **टिपू** ठार झाला. या प्रमाणें १७९९त **वेलेस्लीनें** **टिपूस** बुडविलें. **टिपू** कधीं कधीं **हिंदूंवर** जुलूम करी, इतकें मात्र वाईट करी. एऱ्हवीं त्याच्या कारकीर्दींत रयत एकंदरींत सुखी होती आणि **हिंदूंसही** **टिपू** पदरीं ठेवीत असे.

४ **"टिपू" शीं झालेल्या तंट्याचा निकाल**——**उत्तर कानडा, कोईम्बतूर, वैनाड** हे तीन जिल्हे **इंग्रजांनीं** आपल्या ताब्यांत घेतले. **निजामाच्या** मुलुखास लागून **टिपूचा** मुलुख होता तो आरंभी जरीं **निजामास** मिळाला, तरी पलटणांच्या खर्चासाठीं ह्मणून **इंग्रजानें** आपणांकडे ओढून घेतला. नंतर थोडासा मुलुख राहिला होता तो **म्हैसुरच्या** जुन्या राजघराण्यांतला मुलगा होता त्याच्या नांवावर ठेवून, **इंग्रजांनीं** आपल्या हातीं सगळा कारभार घेतला. हल्लींचा **म्हैसुरचा** राजा हा त्या लहान मुलाच्या वंशांतला आहे. पुढें **टिपूच्या** दोन मुलांस कांहीं वर्षासन करून, **वेलेस्लीनें** **वेल्लोर** मुक्कामीं ठेविलें.

५ **"वेलेस्ली"चा पुढील क्रम**——आपल्या जाळयांत **निजामा** शिवाय आणखीं कोणी पडलें नाहीं, असें पाहून **वेलेस्लीनें** आतां नवीनच किस्ता घातला. "मुलुखांत व्यवस्था बरोबर नाहीं, अंदाधुंदी चालली आहे"—असे आरोप आणून किंवा राजारजवाडा मयत होऊन वारसांपैकीं कोणी मदत मागण्यासाठीं आल्यास त्यास वर्षासन देण्याच्या बोलीनें त्याचा सगळा मुलुख बळकावून, **इंग्रजांच्या** साम्राज्याची हद्द वाढवण्याचा क्रम **वेलेस्लीनें** चालविला. **तंजावरकर** वारतांच, त्याच्या दोन वारसांमध्यें तंटा लागला. तंटा

सोडावा अशी विनंती उभयतांनीं **इंग्रजांस** केली. उभयतांसही वर्षा-सन देण्याची बोली करून सगळा मुलुख **इंग्रजां**च्या साम्राज्यांत **वेलेस्लीनें** सामील केला आणि तंटा तोडला ! ! ! १७९९ त **क्लैव**चा मित्र **महंमद अल्ली** वारला आणि **कर्नाटक**ची गादी त्याचा मुलगा **उमदत–उल्–उम्रा** यास मिळाली. **उमदत** १८०१ त वारला तेव्हां त्याच्या वारसास वर्षासन देऊन, **इंग्रजांनीं** सगळें **कर्नाटक** आपल्या अंमलाखालीं आणिलें. **अयोध्येचा** नवाब **सादत अल्ली** याच्यावर अव्यवस्थेचा आरोप आणिला; आणि व्यवस्था लावण्यासाठीं ह्मणून " नवाबा "स कांहीं पलटणें पदरीं ठेवायास लावून, त्याच्यापासून बराच मुलुख खर्चाबद्दल **वेलेस्लीनें** तोडून घेतला. इत-क्यांत **नाना** " फडणिस " वारला आणि पुण्याच्या लढाईंत मोड झालेला **बाजीराव** **वेलेस्ली**कडे वळला. याप्रमाणें **नाना**च्या पश्चात् **वेलेस्ली**चें सहज काम झालें; आणि तहा अन्वयें पलटणें " पेशवाई "त शिरून **बाजी**रावानें **इंग्रजां**ची ताबेदारी स्वीकारली. पुढें **शिंद्याशीं, भोंसल्या**शीं आणि **होळकरा**शीं **इंग्रजां**चा तंटा जुंपला. हा तंटा जुंपण्याचें पूर्वी "जे गोरे कामगार आपल्या पलटणांनिशीं येतील त्यांस **कंपनी**चे पदरीं ठेवण्यांत येईल " या अर्थाचा जाहीरनामा काढून **वेले-स्लीनें** पहिल्यानें गोऱ्या कामगारांच्या शिकवणुकींतलीं पलटणें फितविलीं आणि नंतर तंट्यास आरंभ केला. अशा प्रकारची जिकडे तिकडे फितवाफितवी सुरू केल्यामुळें मराठ्यांच्या पदरीं **गोरे** लोक होते ते निमकहराम झाले आणि **इंग्रजां**ची ज्या त्या लढाईंत फत्ते होत गेली. या प्रमाणें अनेक कृष्ण कारस्थानांनीं **इंग्रजी** अंमलाखालचा मुलुख वाढवून, लौकरच १८०५ त **वेलेस्ली** आपल्या मुलखीं गेला.

# प्रकरण २—( कार्नवालिस व बार्लो.)

( इसवी शके १८०५ पासून १८०७ पावेतों ).

१ " कंपनी "ची व्यवस्थापक मंडळी—वेलेस्लीची पद्धति जशी कंपनीस तशीच इतर लोकांसही पसंत पडली नाहीं. वेलेस्ली-च्या कारस्थानांनीं पुष्कळ काळें झालेलें इंग्रजांचें नांव पुनः उजळ करण्यासाठीं कार्नवालीसची नेमणूक कंपनीकडून करण्यांत आली. कार्नवालीसनें इंग्रजांचें नांव वेलेस्लीनें वर लावलेला दाट डाग धुऊन टाकून निःसंशय—जसें त्याच्या पहिल्या कारकीर्दींत—नीट उजळ केलें असतें. पण होळकराशीं तह करण्याच्या हेतूनें गेला असतां, गाजीपुर मुक्कामीं १८०५ त आक्टोबरच्या ५ तारिखेस हा उदाहरणीय वृत्तीचा थोर पुरुष वारला.

२ सर जार्ज बार्लो—हा सर्व " मसलत्यां "मध्यें अधिक वर्षें नोकरी केलेला, ह्मणून कार्नवालीसच्या पश्चात् दुसरा येऊन रुजू होईपर्यंत शिरस्त्याप्रमाणें " गवर्नर जनरल "चा कारभार पाहूं लागला. १८०६ त वेल्लोर मुक्कामीं शिपायांचें बंड झालें. मद्रासचा " गवर्नर " लार्ड विल्यम बेंटिंक याच्या संमतीनें " सेनापती "नें कांहीं नियम केले, त्यांवरून " सगळ्या हिंदूंस व मुसलमानांस इंग्रज बाटवूं पहातात " अशी शंका लश्करांतील शिपायांस आली. त्यामुळें काळ्या शिपायांनीं कित्येक गोऱ्यांस व गोऱ्या कामगारांस ठार केलें. पुढें बंडांतील पुढाऱ्यां-स देहान्त शिक्षा देऊन, केलेले नियम रद्द करण्यांत आले आणि जसें सेनापतीस तसें लार्ड विल्यम बेंटिक यास इंग्लंडांत परत बोलावलें. मिशनरी लोकांस ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्यासाठीं परवानगी दिली

होती, ती बंडें होतात असें पाहून मोठ्या शहाणपणानें **बार्लोनें** काढून घेतली. पुढें **बार्लोस मद्रासची** " गवर्नर "की देऊन, **लार्ड मिंटो** म्हणून **इंग्लंडां**तील देखरेखी मंडळीचा अध्यक्ष होता, त्यास " गवर्नर जनरल " नेमून **हिंदुस्थानां**त पाठविलें.

## प्रकरण ६—( लार्ड मिंटो ).

### ( इसवी शके १८०७ पासून १८१३ पावेतों ).

१ **रणजितसिंग**—"सिख" हे **नानक**चे शिष्य. **नानकनें हिंदु** व **मुसलमान** हे दोन्ही एक करण्यास यत्न केला. "देवळांत मूर्तीची गरज नाहीं " हा **नानक**चा **हिंदूंस** उपदेश; " गाईस पूज्य माना " हा मुसलमानांस उपदेश. **नानक** इ० १४६९ त जन्मला आणि १४९० त धर्मोपदेश करूं लागला. " सिख " लोकांत जातिभेद नाहीं. हा पंथ **पंजाबां**त पुष्कळ पसरला. **नानका** पासून तिसरा पुरुष झाला, त्याचा मुसलमानांनीं खून केला. तेव्हांपासून सगळे " सिख " लोक हमेश हत्यार बाळगूं लागले. **नानका**पासून १० वा पुरुष " गुरु " **गोविंद** यानें जमाव करून, **सिखांस** झुंजण्याची दीक्षा दिली. " गुरु " **गोविंदा**चे मुसलमानांनीं अतिशय हाल केले. पण **बंदा** नांवाचा " गुरु " **गोविंदाचा** शिष्य होता त्यानें मुसलमानांचें सगळें उसणें फेडून टाकलें आणि **सतलज** नदीपासून **यमुने**पर्यंत मुलुख काबीज केला. पुढें **बंद्या**ची व "सिखां"ची पुनः मुसलमानांनीं कत्तल केली, त्यामुळें राहिलेले " सिख " लोक डोंगरांमध्यें जाऊन लपून राहिले. **नादिरशहा**वर तो परत जात असतां छापे घालून बरीच लूट " सिखां "नीं लांबविली. **अहमदशहा**च्या पश्चात् **लाहोर**

आणि **सरहिंद** हे दोन प्रांत " सिखां "नीं काबीज केले. " सिखां "चे लहान लहान राजे होते, त्यांच्यामध्यें **रणजित सिंग** या काळीं विशेष नांवाजला. यानें १७९९ त **लाहोर** मिळविलें. लौकरच याचा लौकिक इतका झाला कीं **इंग्रजांनीं मिंटो**च्या " गव्हर्नर जनरल "कींत **मेटकाल्फ** नांवाच्या कामगारास पाठवून याच्याशीं सख्य केलें. हें सख्य **रणजित-सिंग** १८३०त मरेपर्यंत अगदीं अबाधित राहिलें. **मोरिशियस** बेट याच्या कारकीर्दींत **फ्रेंचांकडून इंग्रजांनीं** घेतलें. १८१३ त **मिंटो** " विलायते "स गेला, तो त्याच वर्षी वारला. १८१३तच **हिंदुस्थाना-**शीं व्यापार हवा त्या **इंग्रजानें** करावा असें **इंग्लंडांत** ठरवून, **चीन** देशाशीं व्यापार होता त्याचा मात्र मक्ता " कंपनी "स देण्यांत आला आणि " मिशनरीं "स **खिरस्ती** धर्माचा **हिंदुस्थानांत** प्रसार करण्याची पुनः परवानगी मिळाली.

# प्रकरण ७—( मार्किस आफ् हेस्टिंग्स).

## ( इसवी शके १८१३ पासून १८२३ पावेतों ).

१ "**नेपाळ्यां**"**शीं** "**इंग्रजां**"**चा तंटा—नेपाळा**ची राजधानी **खाटमांडू** आणि सगळा मुलुख डोंगराळ. **नेवारी** व **गोरखा** हे दोन लोक **नेपाळ**च्या राज्यांत रहातात. **नेवारी** हे धर्मानें बौद्ध आणि **गोरखा** हे ब्राह्मणधर्मी. राजसत्ता **गोरख्यां**च्या हातीं आहे. **अ-योध्ये**च्या " नबाबा "चा कांहीं मुलुख **मिंटो**च्या कारकीर्दींत **गोरख्यां-**नीं काबीज केला. हा मुलुख **इंग्रज** आपला समजत. **मिंटो**नें या संबंधानें **खाटमांडू**करास पत्र लिहिलें होतें, त्याचा जबाब **हेस्टिंग्स**च्या का०च्या आरंभीं आला. "हा मुलुख मुळचा आपलाच" असा आलेल्या

जॆंब्राबाचा भावार्थ होता. या गोष्टीची विशेष चौकशी करणें हें **इंग्रजां**चें कर्तव्य होतें. पण तलवारबहादुरीचा विशेष अभिमान असल्यामुळें, **हेस्टिंग्स**चा हात तलवारीकडे वळला आणि **इंग्रजां**चा **नेपाळ्यां**शीं तंटा जुंपला. **गोरखे** लोक **शिवाजी**च्या "मावळ्यां" सारखे होते. **कलिंग** नांवाच्या गडावर **गिलेस्पी**नें हल्ला केला तेव्हां बरेच लोक ठार झाले, त्यांत **गिलेस्पी**ही ठार झाला. एका पलटणाचे लोक तर **गोरख्यां**चा तो रणभूमीवरील हट्ट पाहून पळून गेले !!! **मालून** नांवाचा किल्ला होता तो **अमरसिंगा**च्या ताब्यांत असून, **अमरसिंगानें** **इंग्रजां**शीं लढाई करूं नये अशी मसलत आरंभींच दिली होती. या **अमरसिंगा**शीं **आक्टरलोनी**नें संधान बांधलेलें दिसतें. त्यामुळें **मालून** किल्ला **आक्टरलोनी**स सर करतां आला. याप्रमाणें जरी बराच फितवा केला, तरी **गोरख्यांनीं** आपला पराक्रम दाखवून **इंग्रजांस** थक्क करून सोडलें. पुढें १८१६ त **नेपाळ्यां**शीं **शिगोली** मुक्कामीं तह झाला आणि कांहीं मुलुख **इंग्रजांस** मिळाला. या तहानें मिळालेल्या मुलुखांत **सिमला** हें स्थळ असून, या रमणीय स्थळीं वर्षाचे बरेच महिने "गवर्नरजनरल" व त्याचे "मसलती" अलीकडेस घालवूं लागले आहेत.

**२ "शिंद्या" शीं व दुसऱ्याही राजांशीं "इंग्रजां" चा तह—**

**शिंद्याशीं** तह झाल्यामुळें **इंग्रजांस** **अजमीर** प्रांत मिळाला. **अमीरखान** नांवाचा **पठाण** पुंड होता, त्याच्याशीं तह करून **होळकरा**कडून त्यास मिळालेली जहागीर **हेस्टिंग्सनें** त्याच्याकडे ठेविली आणि त्याच्यावर **इंग्रजां**चा अंमल बसविला. **टोंक**चा "नबाब" हा या **अमीरखाना**च्या वंशांतला. **होळकरा**शीं तह झाला, त्यांत ही **इंग्रजां**स मुलुख मिळाला. या सर्वांशीं तह केले, त्यांत एक

मुख्य कलम हे होतें कीं **पेंढाऱ्यांस** कोणाचूयाही राज्यांत आश्रय मिळूं नये.

३ “ **पेंढाऱ्यां** ”**शीं तंटा**——दरोडे घालून किंवा लढाईच्या शेवटीं लूट करून रहाणारे लोक **पेंढारी.** या लोकांच्या टोळीस **पेंढार** ह्मणत. “ पेशव्या ”च्या अखेरीस या लोकांस विशेष जोर आला. यांचा पाय राजेरजवाड्यांच्या मुलुखांतून काढून **हेस्टिंग्सनें** बिचाऱ्या गोरगरीबांवरचे दरोडे पुष्कळ कमी केले. अखेरीस **करीम** व **चितू** असे **पेंढाऱ्यांचे** दोघे मुसलमान व **हिंदु** पुढारी होते, त्यांपैकीं **करीमास भागीरथीच्या** पलीकडे **गोरखपुराजवळ** लहानशी जहागीर देण्यांत आली. नंतर **चितू असीरगडाच्या** भोंवतालच्या जंगलांत शिरला तो पुनः कोणाच्याही दृष्टीस पडला नाहीं. याप्रमाणें **पेंढाऱ्यांच्या** पुढाऱ्यांची व्यवस्था लावून, **पेंढारी** नांव **हेस्टिंग्सनें** मुळींच नाहींसें केलें.

४ “ **नागपुर** ”**चा भोंसला**——**रघोजी** १८१६ त वारला. त्याच्या पाठीं **आपासाहेबास** गादी मिळाली आणि कराराप्रमाणें **इंग्रजांची** पलटणें पदरीं ठेवून **आपासाहेबानें** ताबेदारी पत्करली. पण दुसरा **बाजी** आणि हा **अप्पा** हे एकाच वर्गांतले. हे दोघेही एका हातानें तह, तर दुसऱ्या हातानें लढाई करणारे. **अप्पाचीं** कृत्यें उघडकीस आलीं आणि १८१७ त **नागपुरकराच्या** लश्कराचा मोड झाला. लौकरच **आप्पास** कैद करून **इंग्रजांनीं अलाहाबादेस** पाठविलें आणि **रघोजीच्या** नातवास गादी दिली.

५ “ **पुण्या** ”**ची** “ **पेशवा** ”**ई**—हिचाही अस्त **हेस्टिंग्सच्या** कारकीर्दींत १८१८ त झाला.

६ “ **हेस्टिंग्स** ” **परत जातो**——पुढें १८२३ त **हेस्टिंग्स** आप-

त्या मुलखीं गेला. **नेपाळच्यां**शीं तंटा जुंपला त्या संबंधानें बराच दोष **हेस्तिंग्सच्**या पदरीं टाकतां येईल. **रघोजीच्**या पश्चात् **आपासाहेबास** कारभारी नेमून त्याच्या जवळून पलटणें ठेवविलीं, हें हेस्तिंग्सचें करणें वाजवी नव्हतें. **शिंदे** व **होळकर** यांच्यावरही पलटणें लादण्याचा मार्ग वाजवी नव्हे. राजा सज्ञान असून जर पलटणें मागेल, तर गोष्ट निराळी. **निजाम** व **बाजीराव** यांनीं पलटणें मागितलीं आणि तीं **इंग्रजांनीं** दिलीं, तर त्यांत **इंग्रजांस** दोष देणें वाजवी नाहीं. पण राजा अज्ञान असतां कारभाऱ्यांशीं कारस्थानें करणें आणि कोणत्या तरी प्रकारें कारभाऱ्यांस वश करून घेणें हें जसें उजूपणास तसेंच थोरपणास शोभत नाहीं. **कार्नवालीस** आणि **शोर** हे जसे उजू होते, तसेच मनानें थोर होते. वरील उदाहरणांवरून या **हेस्तिंग्सला** उजू किंवा मनानें थोर ह्मणतां येणें नाहीं. तरी **क्लैव, वारन हेस्तिंग्स, वेलेस्ली,** यांच्या वर्गांतील हा **हेस्तिंग्स** निःसंशय नव्हे. वरील त्रिवर्गाच्या काव्याचा थोडा अंश या **हेस्तिंग्सम**ध्यें होता, हें खरें आहे. पण हा काव्याचा अंश काढून टाकला ह्मणजे या **हेस्तिंग्सची** पायरी वरील त्रिवर्गांच्या वरची उघड ठरली. दुसऱ्या **बाजीचा** दगलबाजपणाच दुसऱ्या **बाजीस** नडला, त्या संबंधानें **हेस्तिंग्सकडे** दोष येत नाहीं. पेंढार सगळे मोडून टाकले, त्याबद्दल **हेस्तिंग्सची** तारीफ करणें वाजवी आहे. **इंग्लंडांत**ल्याही लोकांस या **हेस्तिंग्सचीं** सगळीं कृत्यें आवडलीं नाहींत.

## प्रकरण ८— [ लार्ड आमहर्स्ट ].

### [ इसवी शके १८२३ पासून १८२८ पावेतों ].

१ "**ब्रह्मी**" **लोकांशीं तंटा**——**ब्रह्मी** लोकांच्या देशास **ब्रह्म-देश** ह्मणतात. हा **बंगाल**च्या पूर्वेकडेस असून, यांतून **इरावती** नदी वाहते. **ब्रह्मी** लोकांशीं १८२६ त **येनदेबू**चा तह झाला, त्यांत **आसाम, आराकान, तेनासरीम,** हे तीन प्रांत इंग्रजांस मिळून लढाईच्या खर्चासाठीं ह्मणून आणखीं एक कोटि रुपये मिळाले. याच वर्षी **भरतपुर**चा राजा **इंग्रजां**च्या अंमलाखालीं आला.

## प्रकरण ९—[ लार्ड विल्यम बेंटिंक ].

### ( इसवी शके १८२८ पासून १८३५ पावेतों ).

१—हा २२ वर्षे पूर्वी **मद्रासेस** "गवर्नर" होता. **वेल्लोर**चें बंड झालें, त्याच्या नंतर यास **मद्रासे**हून उठविलें आणि **इंग्लंडांत**च बोलाविलें. यास आतां "गवर्नर जनरल" करून पुनः धाडलें.

२ **कूर्ग प्रांत**——जुलूम करितो हा आरोप राजावर आणून त्यास **काशीस** पाठविलें आणि त्याचें छोटें राज्य **इंग्रजानें** आपल्या साम्राज्यास जोडलें. हाच आरोप आणून **ह्मैसुर**च्या राजास पदच्युत केलें आणि सगळा कारभार **इंग्रजानें** आपल्या हातीं घेतला.

३ **मुख्य सुधारणा**——दिवाणी व फौजदारी खटल्यांतून **फार्सीस** फांटा दिल्यामुळें, अर्थांतच देशी भाषांस स्थळ मिळालें; व त्याच-प्रमाणें देशी लोकांस पदरीं ठेवून, पुढें शाळांतून **इंग्रजी** भाषाही शिकविण्याचा हुकूम "गवर्नर जनरल"नें केला. १८३३ त **चीन** देशाशीं व्यापाराचा होता तो काढून घेऊन, "कंपनी"स राजसत्ता देण्यांत आली. यापुढें "कंपनी सरकार" या नांवानें "कंपनी"ची प्रसिद्धि होऊं लागली.

# प्रकरण १०—( लार्ड ऑकलंड ).

( इसवी शके १८३६ पासून १८४२ पावेतों ).

१ " अफगाणां "शीं " कंपनी सरकार "चा तंटा—महमूद व सुजा या भावाभांवामध्यें काबूलच्या गादीविषयीं तंटा लागला. महमूदनें मोड करून पिटाळून लाविलें, आणि सुजा लुदिआना मुक्कामीं आला. लौकरच महमूदाचा खून झाला आणि दोस्त महंमद नांवाच्या एका अफगाणास गादी मिळाली. जशी " पेशवाई "ची किंवा " भोंसलेशाही "ची व्यवस्था पूर्वी वेलेस्लीनें व हेस्तिंग्सनें केली, तशीच अफगाणस्थानाची व्यवस्था सुजास हातीं धरून करण्याचा निश्चय ऑकलंडनें केला. असा निश्चय करून, १८३८ त सुजा व रणजितसिंग या दोहोंशीं करार करण्यांत आला. १८३९ त काबूल पडलें आणि दोस्त महंमद बुखाऱ्यास पळाला. १८४० त दोस्त महंमद हा आला, त्यास २ लाख रुपये वर्षासन कबूल करून इंग्रजानें लुदिआना मुक्कामीं ठेविलें. सुजास गादी मिळाली. पण सुजा ही बोलून चालून इंग्रजांच्या हातांतली बाहुली. ही कांहीं महिने मोठ्या चतुराईनें फिरवून, इंग्रजांनीं सर्दारांस लांचलुचपतीही बऱ्याच दिल्या. जोंपर्यंत पैसा पाण्यासारखा इंग्रज ओतीत होते, तोंपर्यंत अफगाण स्वस्थ बसले. पैशाचा पाऊस बंद पडतांच, इंग्रजांवर अगदीं एकोप्यानें १८४१ त अफगाण उठले. अफगाणांस इंग्रजांची गुलामगिरी नको होती. जेव्हां अफगाणांनीं इंग्रज सांपडेल तो ठार करण्याचें काम चालविलें, तेव्हां काबुलांतल्या बाहुलीसही बरोबर घेण्याचें कर्तव्य विसरून इंग्रजांनीं पिछेहट आरंभिली. ४॥ हजार शिपाई व दुसरे १२ हजार, मिळून जवळ जवळ १७ हजार

लोक **काबूल** सोडून निघाले. इतक्यांत लोकांस **अफगाणांनीं** हळू-हळू अशा प्रकारें धुळीस मिळविलें कीं ब्रायडन "नांवाचा" शस्त्रवैद्य मात्र **जलालाबाद** मुक्कामीं पोंचून हा भयंकर संहार **इंग्रजांस** १७४२ त कळवण्यास जेमतेम जिवंत राहिला.

२ "**चिनी**" **लोकांशीं तंटा**—**इंग्रजांचा** अफूच्या व्यापाराच्या संबंधानें **चिनी** लोकांशीं तंटा जुंपला, त्यांत **हॉंग कॉंग** बंदर **इंग्रजांस** मिळालें.

# प्रकरण ११—( लार्ड एलेनबरो ).

## ( इसवी शके १८४२ पासून १८४४ पावेतों ).

१ "**काबुला**" **वरची स्वारी**—**इंग्रजांच्या** बाहुलीनें एकदा बाहेर तोंड काढलें. इतक्यांत एका **अफगाणानें** या देशद्रोही अमीरास गोळी मारून ठार केलें. पुढें **इंग्रजांचें** जंगी लश्कर गेलें. **इंग्रजांच्या** लश्करानें **काबुलचा** बाजार लुटला आणि जाळला. पुढें **अफगाणांवर** आपला अंमल बसवण्याचें **इंग्रजांनीं** सोडून देऊन, **दोस्त महंमदास** मात्र सुटें केलें आणि **अफगाणांस** केलेल्या पारिपत्यांतच संतोष मानून लगेच **हिंदुस्थानाची** वाट धरली. पुढें **दोस्त महंमदानें** हळूहळू सगळ्या **अफगाणांवर** आपला अंमल बसविला.

२ "**सिंध**" **प्रांत खालसा**—**अफगाणांवर** अंमल बसत नाहीं, तर जवळच्या दुसऱ्या कोणत्या तरी मुसलमानांवर अंमल बसवून मुलख वाढवण्याचें **इंग्रजांच्या** मनांत आलें. "अमीरां"च्या गळ्यांत पलटणें बांधावीं आणि नंतर कांहीं तरी क्षुद्र निमित्तें काढून "अमी-

र्शां "स बुडवावें, यांत कोणत्याही प्रकारें भूषण न मानतां उलट सर्व प्रकारें दूषण मानणारे उजू आणि थोर मनाचे कित्येक **इंग्रज**—जसे पूर्वी होते तसे—आजही आहेत, यांतच **इंग्लंडाचें** आणि **इंग्लंडां**तल्या लोकांचें मोठेपण आहे. १८४३ त **मियानी**च्या लढाईंत " अमीरां "-चा मोड झाला. पुढें लौकरच " अमीरां "स कैद करून, **इंग्रजांनीं काशी** मुक्कामीं पाठविलें आणि **सिंध** प्रांत आपल्या साम्राज्यांत सामील केला.

३ " **ग्वाल्हेर** "**कर**—**दौलत**राव १८२७ त वारला. त्याच्या पश्चात् गादीवर **जनकोजी**राव बसला. तो १८४३ त वारला. तेव्हां **शिंदे**शाहींत **इंग्रजां**स सहज हात घालतां आला. " सर " **ह्यु गफ** यास सेनापति करून **शिंद्यावर इंग्रजांनीं** पाठविलें. १८४४ त **महाराजपुर**च्या लढाईंत **शिंद्या**चा मोड झाला आणि **शिंद्या**च्या आईची वर्षासन देऊन बोळवणी केली. पुढें छोट्या राजाचा कारभार करण्यास कारभारी नेमले आणि " रेसिडेंटा "च्या तंत्रानें कारभाऱ्यांनीं चालावें अशी व्यवस्था केली.

४ **"गवर्नर जनरला "स पाठीं बोलावतात**—हें सगळें करणें नापसंत पडून, " कंपनी सरकार "नें **लार्ड एलेनबरोस इंग्लंडांत** बोलाविलें.

## प्रकरण १२—( "सर" हेनरी हार्डिंग ).

### ( इसवी सके १८४४ पासून १८४८ पावेतों ).

१ **"सिख" लोकांशीं तंटा**—**रणजितसिंगा**च्या पाठीं गादीच्या संबंधानें पुष्कळ घोंटाळे होऊन शेवटीं त्याचा लहान मुलगा **दिलीप-सिंग** यास गादीवर बसवून राणी स्वतः कारभार पाहूं लागली. **लाल-**

**सिंग** आणि **तेजासिंग** या दोहोंच्या हातीं बराच कारभार राणीनें दिला. पण हे दोघेही सर्दार मोठे देशद्रोही निघाले. "सिख" लष्कराच्या मनांत **पंजावाची** हद्द वाढवायाची, ह्मणून तें पुनः पुनः **सतलज** नदी उतरण्यास कारभाऱ्यांस सांगे. पण हे देशद्रोही सर्दार कांहींना कांहीं निमित्त सांगून लष्कर थोपवून धरीत. अखेरीस लष्कराचें न ऐकल्यास आपला खून होईल या धास्तीनें **लालसिंग सतलज** नदी उतरला आणि **इंग्रजांच्या** मुलखांत शिरला. पण हा आंतून **इंग्रजांशीं** मिलाफ ठेवीत गेला आणि लष्कराची धूळधाणी होईल असाच निंद्य क्रम यानें चालविला. **फिरुझशहर** मुक्कामीं **लिटलर** होता त्यास न बुडवतां, **लालसिंगानें मुदकीची** दिशा धरली. **मुदकीस लालसिंगाची गफशीं** गांठ पडली. **लालसिंग** जरी फितूर झालेला होता, तरी लष्करानें **गफला** बराच मार दिला. नंतर **लालसिंग फिरुझशहराकडे** पाठीं हटला. इतक्यांत "गव्हर्नर जनरल" **गफला** येऊन मिळाला, त्यामुळें **गफनेंही फिरुझशहरची** दिशा धरली. **फिरुझशहरीं** आल्यानंतर सुमारें ६००० लोक **लिटलरनें गफच्या** मदतीस पाठविले. **लालसिंगाची** सगळी करणी लष्कराचा नाश करण्यासाठीं उघड दिसते. तरी **फिरुजशहर** मुक्कामीं "सिखां"नीं शर्थ केली आणि हल्ला करण्यासाठीं सरसावणाऱ्या लष्करांत खून पाडणारा गोळयांचा वर्षाव चालवून हातानेंही **इंग्रजांची** कत्तल करण्यास सुरुवात केली. इतक्यांत रात्र पडली आणि दुसरे दिवशीं तुंबळ लढाई जुंपणार. पण रात्रीं **लालसिंग** फितूर झाला हें लक्षांत येऊन लष्करांमध्यें फूट वाढू लागली, ती शेवटीं इतकी विकोपास गेली कीं जवळ जवळ सगळें लष्कर **लालसिंगाचा** खजिना लुटून पळालें. अर्थातच आदले दिवशीं खूब मार देणारें लष्कर **इंग्रजांस** दुसरे दिवशीं आढळलें नाहीं.

**इंग्रजां**च्याच ह्मणण्याप्रमाणें या प्रसंगीं २५०० लोक ठार झाले आणि १०३ कामगार रणभूमीस बळी पडले. पुढें **सोब्रावन**ची लढाई झाली. "सिखां"नीं गोळ्यांचा मारा असा नेम धरून चालविला कीं **इंग्रजांचें** पाऊल पुढें पडेना. **इंग्रजांचें** लश्कर एकदा पुढें पाऊल टाकी; पण लगेच "सिख" अग्न्यस्त्र सुरु करीत आणि कुंथत कुंथत **इंग्रजांस** हटावें लागे. **फिरुजशहर**ची लढाई **लालसिंगानें** घालविली आणि **सोब्रावन**ची लढाई **तेजसिंगानें** घालवली. सेनापति **तेजसिंग**च जर फितूर झालेला, तर "सिख" लश्कराचा टिकाव कसा लागणार? तरी तेवीसशेंहून अधिक **इंग्रज** बळी घेतले, तेव्हां "सिख" हटूं लागले. याप्रमाणें **लालसिंग** व **तेजसिंग** या कारभाऱ्यांनीं मिळून **पंजाब** बुडविला.

२ **"पंजाब" प्रांत "इंग्रजी" अंमलाखालीं येतो**—नंतर तह झाला, त्या अन्वयें **दिलीपसिंगास** राजा कबूल करून कारभाऱ्यांची मंडळी नेमिली आणि या मंडळीनें "रेसिडेंटा"च्या तंत्रानें चालावें, अशी व्यवस्था **इंग्रजांनीं** केली. अंदाधुंदी मोडण्यासाठीं कांहीं गोरें लश्करही **लाहोर** मुक्कामीं ठेवण्यांत आलें. **इंग्रजांनीं** लढाईच्या खर्चाचे १ कोटि रुपये मागितले; ही रकम तिजोरींत नाहीं असें पाहून **काश्मीर** प्रांत **गुलाबसिंग** नांवाच्या "सिख" सर्दारास विकण्याची परवानगी **दिलीपसिंगा**च्या नांवानें कारभाऱ्यांनीं मागितली, ती **इंग्रजांनीं** दिली. त्या परवानगीस अनुसरून **गुलाबसिंगास काश्मीर** प्रांत विकून कारभाऱ्यांनीं एक कोटि रुपये घेतले. त्यांचा "कंपनी सर्कार"च्या तिजोरींत भरणा केला. "गवर्नर जनरल" नुसता "सर" **हेनरी हार्डिंग** होता, तो आतां "लार्ड" **हार्डिंग** झाला; सेनापति **गफ**ही "लार्ड" **गफ** झाला. एक को-

टिं रुपये **पंजावांतून** मिळाल्यामुळें, लश्करांतल्या शिपायांसही उदार हा- तानें **इंग्रज** लोकांकडून इनामें वांटण्यांत आलीं.

## प्रकरण १३—( लार्ड डालहुसी ).

### ( इसवी शके १८४८ पासून १८५६ पावेतों ).

१ **मूळराज**———हा **मुलतान**चा सुभेदार. यानें वसुलाचा भरणा **पंजाव**च्या तिजोरींत करावा तसा केला नाहीं, ह्मणून यास **इंग्रजांनीं** राजीनामा देऊं लाविलें. पुढें यानें **पंजाव**तील "सिख" लोकांस उठविलें. "सिख" लोकांनीं **चिलयानवाला** मुक्कामीं **इंग्रजांस** १८५० त लढाई दिली. या लढाईत **इंग्रजांचे** २५०० लोक ठार झाले. चार तोफांसहित **इंग्रजांच्या** तीन पतकांचे झेंडेही "सिखां"-नीं नेले. पण **गुजराथ**च्या लढाईत बंडखोरांचा पुरा मोड झाला. नंतर **इंग्रजांनीं** वड्याचें तेल वांग्यावर काढून **पंजाब** प्रांत आपल्या साम्राज्यांत दाखल केला. **दिलीपसिंगा**चें किंवा त्याच्या कारभाऱ्यांचें बंडांत मुळींच आंग नसतांहीं **इंग्रज** सर्कारानें **पंजाव**चें राज्य हिसकावावें, हा मोठाच अन्याय. बंडखोरांनीं बंड केलें आणि निरपराधी **दिलीपसिंगास इंग्रजांनीं** पदच्युत केलें !!! पुढें सालिना ५ लाख रुपयांची नेमणूक करून देऊन **दिलीपसिंगास इंग्लंडांत** ठेविलें. हा पुढें **ख्रिस्ती** झाला, व **इंग्लंडांत** राहूं लागला. हा अलीकडेसच ह्मणजे १८९३ त आक्टोबर महिन्यांत वारला.

२ "पेगु" **प्रांत खालसा होतो**—जो क्रम वर लिहिल्याप्रमाणें आरंभीं स्वीकारला, तोच पुढें अव्याहत चालवून आपलें नांव **डालहुसी**नें **हिंदुस्थाना**च्या इतिहासामध्यें "कंपनी सर्कार"च्या अंमलांत अजरा-

मर करून ठेविलें आहे. **इंग्रजी** व्यापाऱ्यांच्या सांगण्यावरून **ब्रह्मदेशा**-शीं लढाई केली आणि **डालहुसीनें पेगु** प्रांत मिळविला.

३ **" हिंदुस्थानां "तील बरेच प्रांत खालसा होतात**—१८५३ त **भोसला** वारला आणि त्यास मुलगा नव्हता ह्मणून **नागपुर** प्रांत **डालहुसीनें इंग्रजी** साम्राज्यांत ढकलला. याच सालीं दिवाणी नोकरींतील वरच्या जागा परीक्षा घेऊन तींत पसार होतील त्यांस देण्याचा ठराव झाला आणि **बंगाल**चा " लेफटिनेंट गवर्नर " नेमण्यांत आला. इलाख्यांतील मुख्य शहरांमध्यें " है कोर्टा "ची स्थापनाही याच सालीं झाली. १८५६ त **अयोध्या** प्रांत—" **नवाबा**-वर अव्यवस्थेचा आरोप आणून—खालसा करण्यांत आला. वेळेवर पलटणांच्या पैशाचा भरणा होत नाहीं, ही सबब सांगून **डालहुसीनें वऱ्हाड** प्रांत **निजामा**जवळून घेतला आणि शिलक राहेल ती **निजामा**च्या तिजोरींत पाठविण्याचें कबूल केलें.

४ **" डालहुसी "च्या कारकीर्दीची अखेर**——या प्रमाणें कांहीं तरी सबब सांगून कोणत्या तरी प्रकारें **इंग्रजी** साम्राज्यांत बराच परका मुलुख **डालहुसीनें** सामील केला आणि या क्रमाचें फळ नंतरच्या " गवर्नर जनरला "स भोगावयास लावून लौकरच ही स्वारी " विलायते "स गेली. पुढें आपल्या करणीनें " कंपनी सर्कार " बुडालें ही बातमी कानीं पडून **डालहुसी** जसा काय झुरणीस लागला, तो लौकरच १८६० त वारला.

**" डालहुसी "च्या सुधारणा**——प्रत्येक इलाख्यांत एक विद्यापीठ स्थापन होऊन, " प्रेसिडेंसी कालेज "ची स्थापना **कलकत्या**-मध्यें झाली. तारायंत्र सुरु होऊन, टपालखात्यांत हांशील कमी करण्याची सुधारणा याच्याच कारकीर्दींत झाली.

# प्रकरण १४—( लार्ड क्यानिंग ).

( इसवी शके १८५६ पासून १८५८ पावेतों ).

१ **बंडाचीं कारणें**—नवीन काडतुसें आणिलीं त्यांस गाईची क बैलाची किंवा डुकराची चरबी लावली होती, ह्मणून जसे **हिंदु** तसे मुसलमानही कुरकुर करूं लागले आणि बंडास सुर्वात झाली, असें ह्मणतात. पण हें बाहेरचें कारण होय, आंतलें कारण नव्हे. **डालहुसीनें** जसे हिंदूंचे तसें मुसलमानांचे प्रांत खालसा करून **इंग्रजी** साम्राज्यांत ढकलल्यामुळें जसे **हिंदू** तसेच मुसलमान उद्विग्न झाले होते आणि **इंग्रजांवरचा** विश्वास अजीबात उडून गेला होता. ह्मणून **इंग्रज** सर्वांस वाटवू पहातो, अशी काडतुसांवरून सर्वांची पुरी खात्री झाली आणि उभयतांचीही बंडाकडे प्रवृत्ति झाली. १८५७ सालचें बंड लष्कराच्या बाहेर लोकांमध्यें व राजेरजवाड्यांमध्यें पसरलें नाहीं. बंडाची ठिणगी त्यांच्यामध्यें उडून भडका झाला असता, तर **इंग्रजांच्या** अंमलाचा तेव्हांच अस्त होता.

२ **बंडास आरंभ**—**दिल्ली**पासून ४० मैलांवर **मीरत** मुक्कामीं एके शनिवारीं **हिंदु** आणि मुसलमान मिळून ७४ लष्करी शिपाई काडतुसांस हात लावीत नाहींत असा आरोप आणून तरुंगामध्यें पाठविण्यांत आले. गाईची व डुकराची चरबी लावलेल्या काडतुसांस शिवण्याचें नाकारल्यामुळें आपल्या बंधूंस तुरुंगांत घातलें हें ऐकून दुसरे दिवशीं आदितवारीं जशी लष्करांतील बाकीच्या **हिंदु** शिपायांच्या तशीच मुसलमान शिपायांच्याही आंगाची लाही झाली. इतर **मीरत**करही मिळाल्यामुळें धामधूम वाढली आणि जे गोरे सांपडले त्यांची कत्तल करून आणि कैदीस सोडवून **मीरत**कर मंडळी **दिल्ली**कडे वळली. आदितवारीं **मिरतेस** धामधूम चा-

लवली, तिच्या दुप्पट धामधूम **दिल्ली** मुक्कामीं **मीरत**कर मंडळीनें पोंचतांच चालविली आणि बादशाही घराण्यांतील **बहादुरशहा** नांवाच्या पुरुषास गादीवर बसण्यास सांगितलें. **दिल्ली**तील **इंग्रजां**चा बंडखोरांपुढें टिकाव लागेना; तरी त्यांनीं दारू गोळ्यास आग लावल्यामुळें कित्येक बंडखोर जळून मेले. याप्रमाणें **मीरत** मुक्कामीं आरंभ होऊन **दिल्ली** मुक्कामीं बंड बरेंच पेटलें.

३ **बंडाचा प्रसार—लखनो** मुक्कामींही लश्करी लोक बिथरले आणि **दिल्ली**करांस येऊन मिळाले. जो राजारजवाडा मयत होईल त्याच्या बायकोस दत्तक घेऊं न देतां देशी मुलुख स्वाहा करण्याचा जो निंद्य क्रम **इंग्रजां**नीं घातला होता, त्यास अनुसरून दत्तक घेण्याची परवानगी देण्यांत आली नाहीं ह्मणून **झांशी**ची राणी बिथरली. **बिठूर** मुक्कामीं **बाजी**राव वारला. **बाजी**रावानें **नानासाहेबा**स दत्तक घेतलें होतें. पण **बाजी**रावाचें वर्षासन **नानासाहेबा**स देण्याचें **इंग्रजां**नीं नाकारलें; कां तर, दत्तकाचा हक्क किंवा वारसा कबूल न करण्याचा निंद्य कित्ता केवळ स्वार्थाकडे दृष्टि पोंचवणाऱ्या या काळच्या **इंग्रजां**नीं घालून ठेविला होता. ह्मणून **नानासाहेब**ही बिथरला. याप्रमाणें बंडाचा बाहेरून जितका काडतुसांशीं तितकाच **इंग्रजां**नीं पूर्वीं घातलेल्या निंद्य कित्त्यांशीं आंतून संबंध आहे. गाईची व डुकराची चरबी लावलेलीं काडतुसें वापरण्यास सांगण्यांत जितकी मोठी चूक धर्मप्रकरणीं **इंग्रजां**कडून या काळीं झाली तितकीच मोठी चूक राजप्रकरणीं दत्तकाचे हक्क बुडवण्यांत झाली. अशा—एक धर्मप्रकरणीं आणि दुसरी राजप्रकरणीं मिळून—दोन मोठ्या चुका झाल्यामुळें बंड बरेंच फैलावलें.

४ **बंडाची अखेर**—राजेरजवाड्यांनीं बाजू राखली, ह्मणून विशेष आयास न पडतां **इंग्रजां**स बंड सहज मोडतां आलें. **झांशी**ची राणी भरलढाईंत गोळा लागून पूर्वीच सद्गति पावली. **बहादुरशहा**स कैद करून

रंगून मुक्कामीं पाठविलें. याच मुक्कामीं **बहादुरशहा** कांहीं वर्षांनीं १८६२ त वारला. **नानासाहेब इंग्रजां**च्या हातीं न लागतां **नेपाळां**त पसार झाला. पुढें तो तिकडेच वारला, असें ह्मणतात.

९ **राजप्रकरणीं फेरफार**—बंडामुळें "कंपनी सर्कार" बुडालें आणि "राणीची सत्ता" **हिंदुस्थानां**त बसली. "पार्लमेंट"नें हिंदुस्थानाचा कारभार पहाण्यासाठीं एक "वडा चिटणीस" ( सेक्रेटरी आफ स्टेट ) नेमला आणि त्याच्या हाताखालीं १५ मसलती दिले. पंधरा "मसलत्यां"पैकीं आठ मसलती **हिंदुस्थानां**त निदान दहा वर्षे काम केलेले असावे, अशीही एक अट "पार्लमेंटा"नें घालून ठेविली. या पुढें "गवर्नर जनरला"स "राणीचा कुल् मुखत्यार" [ वैसरॉय ] ह्मणूं लागले आणि नव्या मनूस आरंभ झाला.

# उत्तरार्ध—( राणीची सत्ता ).

## प्रकरण १—( लार्ड क्यानिंग ).

### ( इसवी शके १८५८ पासून १८६२ पावेतों ).

१ **बंडाचे परिणाम**—बंडाच्या अगदीं अवेलीपासून तो अगदीं अखेरीपर्यंत किती तरी रक्तपात झाला आणि किती तरी लोकांचे जीव बळी गेले; हें निःसंशय बरें झालें नाहीं, हें वाईट झालें. पण "राणी-सर्कारा"नें एक नवीन जाहीरनामा काढिला व तो **हिंदुस्थानां**त जिकडे तिकडे राणीच्या मुखत्यारांनीं मोठ्यानें वाचून दाखवला, ही एक मोठी गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी झाली. "धर्मसंबंधीं जे तुमचे आचारविचार असतील त्यांच्यामध्यें आह्मी हात घालणार नाहीं आणि निपुत्रिक राजे-

रजवाड्यांच्या दत्तकास दत्तक घेणाराचे सगळे हक्क मिळतील अशी व्यवस्था आमच्याकडून ठेवण्यांत येईल "—असें राणीसर्काराकडून **हिंदुस्थानां**तल्या दरोबस्त लोकांस मिळालेलें शपथपूर्वक वचन या जाहीरनाम्यांत वाचून दाखवण्यांत आलें. तेव्हां रक्तपात झाला आणि लोक बळी गेले, हें जरी बरें झालें नाहीं, वाईट झालें, तरी वर लिहिल्याप्रमाणें रक्तपाताचें आणि लोक बळी जाण्याचें मूळ राणीसर्काराकडून खणून टाकण्यांत आलें, हें निः संशय वाईट झालें नाहीं, तर बरेंच झालें. नंतर **क्यानिंग**नें **आग्रा** मुक्कामीं बडें दर्बार भरविलें आणि राणीच्या जाहीरनाम्यांतील एकंदर बाबी उघड करून सांगितल्या.

२ **क्यानिंग मुलखीं जातो**—कारकीर्दीमध्यें पुष्कळ क्लेश झाले, पण ते यानें निमूटपण सोसले. **क्यानिंग** मोठा सोशीक, न्यायप्रिय आणि दयाळु असा " गवर्नर जनरल " होऊन गेला. **हिंदुस्थानां**त येण्याचे पूर्वीही **क्यानिंग**ला **इंग्लंड**च्या दर्बारीं बराच मानमरातब मिळालेला असून कित्येक जोखिमाचीं कामें आंगावर पडलीं होतीं तीं नीट उरकून त्यानें आपली कर्तबगारी दाखविली होती.

## प्रकरण २—( क्यानिंगच्या पुढचे "व्हैसराय").

१ " **लार्ड** " **एलजिन**—याच्या कारकीर्दींत " वहाबी " नांवाच्या **आरबस्थाना**तून आलेल्या नवीन पंथाचा वायव्य प्रांतांतील ज्या मुसलमानामध्यें प्रसार झाला होता त्यांस पारिपत्य करण्यासाठीं ८००० फौज रवाना करावी लागली. नंतर **भुताना**वर फौज रवाना करायाची, इतक्यांत " लार्ड " **एलजिन** वारला.

२ " **सर** " **जान लारेन्स**—५७ च्या बंडांत हा **हिंदुस्थानां**त

असून, **पंजाबांत** बंदोबस्त ठेवण्याचे कामीं यानें चांगली हुशारी दाखविल्यामुळें यास हा मोठा अधिकार देण्यांत आला. **भुताना**वर फौज रवाना केल्यानंतर लौकरच तह झाला. इतक्यांत **दोस्त महंमद** वारला. त्याच्या पाठीं **अफझुल** व **शेर अल्ली** या दोन भावाभावांत गादीसाठीं तंटा लागला. **डालहुसी**सारखा व्हैसराय असता, तर या तंट्यांत पूर्वीचें वचन मोडून पडल्याशिवाय रहाताना. पण " सर " **जान लारेन्स** हा थोर पुरुष " लार्ड " **कार्नवालीसा**च्या वर्गांतील होता. " तूं आपला अंमल एकदा बसविल्यास आह्मी **अफगाणस्थानां**त ढवळाढवळ करणार नाहीं " अशा अर्थाचें वचन **दोस्तमहंमदास** पूर्वी एके प्रसंगीं **इंग्रजां**कडून देण्यांत आलें होतें, ह्मणून **इंग्रजां**चे नांव उजळ ठेवूं पहाणारा **लारेन्स** बंधूंच्या तंट्यांत पडला नाहीं. पुढें **शेर अल्लीनें** आपला अंमल सगळ्या **अफगाणस्थानां**त बसविला आणि लागलीच **अफगाणस्थाना**वरची **शेर अल्ली**ची अमीरकी **लारेन्स**नें कबूल केली. पुढें १८६९ त आपल्या मुलखीं गेल्यानंतर, " सर " **जान लारेन्स** हा सरदार झाल्यामुळें " लार्ड " **लारेन्स** बनला.

३ **लार्ड मेयो**—आल्यानंतर लौकरच याची आणि **शेर अल्ली**ची **अंबाला** मुक्कामीं मुलाकत झाली. या मुलाकतींत **अफगाणस्थानां**त ढवळाढवळ न करण्याचें वचन **इंग्रजां**कडून पुनः कायम करण्यांत आलें. नंतर **रंगून** वगैरे **ब्रह्मी** प्रांतांतून परत येत असतां हा **आन्दमान** बेटांत गेला. काळ्या पाण्यावरचे कैदी या बेटांत ठेवलेले असतात. असल्या कैद्यांपैकीं एका मुसलमानानें **मेयो**च्या छातींत एकाएकीं पुढें होऊन सुरी खुपसली. या वारानें **मेयो**चा शेवट झाला.

४ **"लार्ड" नार्थब्रूक**—**बडोद्या**च्या "रेसिडेंटा"नें शिरस्त्याप्रमाणें **बडोदेशा**हींत ढवळाढवळ चालविली. तेव्हां **मल्हारराव गायकवाडा**नें

दरोबस्त **हिंदूंचा** कैवार घेतलेलया **दादाभाई नौरोजी** नांवांच्या उदाहरणीय वृत्तीच्या एका पारशी गृहस्थास दिवाणगिरी सांगितली. तरीं "रेसिडेंटा"ची ढवळाढवळ कमी झाली नाहीं. "रेसिडेंटानें" आपणास विष घालण्याचा आरोप **मल्हार**रावावर आणला. या आरोपाची चौकशी करण्यासाठीं **नार्थब्रूकनें** पंच नेमले. चौकशीच्या अखेरीस **इंग्रजी** पंच एके बाजूस आणि **हिंदु** पंच एके बाजूस, अशी स्थिति झाली. तरी "आरोप शाबीत होऊन **मल्हार**राव गुन्हेगार ठरला" अशा अर्थाचा खलिता **नार्थब्रूकनें** काढला. हा न्याय बरोबर झाला नाहीं असें कित्येक **इंग्रज** लोकही ह्मणतात. **वेलेस्लीचें** किंवा **डालहुसीचे** वारें आंगीं भरलेलें असतें, तर सताऱ्यासरशी बडोदेशाही खालसा करण्यांत आली असती. पण **नार्थब्रूक** एकंदरींत चांगुलपणानें भरलेला. **गायकवाडाचा** एक दूरचा नातलग हुडकून आणून तो **मल्हार**रावाचा वडील बंधु **खंडे**राव याची **यमुना**बाई नांवाची राणी होती, तिच्या मांडीवर **सयाजी**राव असें नांव देऊन बसविला आणि "सर" **तंजावरकर माधव**राव यास दिवाणगिरी सांगितली. लौकरच **इंग्लंडां**तील "सर्कारी अंमला"चा तट बदलला. "पार्लमेंट" सभेमध्यें दोन मोठे तट असत—एक "कोत्या मनाचा" तट आणि एक "थोर मनाचा" तट. हे दोन्ही तट मिळून "प्रतिनिधींची सभा" —जीस "साधारणसभा" ह्मणतात ती—बनलेली असते. **इंग्लंडां**तील राजसत्ता आज नाहीं राणीच्या हातीं, नाहीं सर्दारांच्या हातीं—ही एक गोष्ट विशेष लक्षांत ठेविली पाहिजे. **इंग्लंडां**तील सगळी राजसत्ता आज "प्रतिनिधींच्या सभे"च्या हातीं आहे. "प्रतिनिधीं"च्या ठरावापुढें नाहीं सर्दारांचें चालत, नाहीं राणीचें चालत. या सभेंत जे ठराव होतात ते बहुमतानें होतात

आणि प्रसंग पडतो तेव्हां प्रतिनिधीही बहुमतानेंच निवडले जातात. निवडणुकीचे दोन प्रसंग येतात—एक छोटा प्रसंग आणि दुसरा वडा प्रसंग. एक प्रतिनिधी वारल्यास किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें गेल्यास त्याची जागा भरण्यास जी निवडणूक होते, ती छोटी निवडणूक. प्रतिनिधींची संख्या जवळ जवळ सातशें असल्यामुळें आणि पुष्कळ प्रतिनिधी चांगले वयोवृद्ध असल्यामुळें या छोट्या निवडणुकी दर महिन्यास कमजास्त मानानें चाललेल्या असतात. मध्येंच न बुडाल्यास प्रतिनिधींची सभा सात वर्षांनीं बुडवण्याची वहिवाट आज मितीस पडलेली आहे. हा सात वर्षांनीं येणारा बड्या निवडणूकीचा एक प्रसंग. ज्या तटाचें बहुमत झालेलें असतें, त्या तटास "अंमलाचें सर्कार" किंवा "सर्कारी अंमलाचा तट" ह्मणतात; कारण तें बहुमत कायम असेपर्यंत सगळा सर्कारी अंमल त्या तटाच्या हातीं असतो. कधीं कधीं "अंमलाचें सर्कार" आणि सामनेवाले यांच्यामध्यें मोठा मतभेद पडतो आणि "अंमलाच्या सर्कार"च्या बहुमताचा लय झाल्यासारखा भास होतो. अशा अणीबाणीच्या प्रसंगीं चालती सभा बुडवून "अंमलाच्या सर्कारा"स राष्ट्रास अर्ज करावा लागतो आणि लोकमत कोणास अनुकूळ आहे तें पहावें लागतें. हा सात वर्षांच्या पूर्वीं केव्हांही येणारा बड्या निवडणुकीचा दुसरा प्रसंग. निवडणुक नेमलेल्या दिवसापासून सगळ्या मंडळांत सुरु होते. बड्या निवडणुकीच्या अखेरीस सामनेवाल्यांची फत्ते झाल्यास सामनेवाल्यांच्या हातीं "सर्कारी अंमल" जातो. **नार्थब्रूक**ची नेमणूक झाली, तेव्हां थोर मनाच्या तटाच्या हातीं सर्कारी अंमल होता. पण निवडणुकीचा वडा प्रसंग येऊन सर्कारी अंमल कोत्या मनाच्या तटाकडे गेला. अर्थातच **नार्थब्रू**-

क्ची आणि अंमलाच्या सरकारची घांसाघीस होऊं लागली. रामका भला व रावणका भला असें ह्मणणारे दुटप्पी पुरुष बड्या अंमलदारांमध्येंही असतात. पण **नार्थब्रूक** दुटप्पी मंडळीपैकीं नव्हता. ह्मणून अंमलाच्या सर्कारशीं बनेनासें झालें आणि **नार्थब्रूकनें** राजीनामा पाठविला. राजीनामा मंजूर होतांच **नार्थब्रूक** विलायतेस गेला.

९ " लार्ड " **लिटन**—हा **नार्थब्रूकच्या** अधिकारावर कोत्या मनाच्या तटाकडून नेमण्यांत आलेला व्हैसराय. हा १८७६ त अधिकारावर रुजू झाला. याची व्हैसरायकी दोन गोष्टींनीं नांवाजली आहे. **विक्टोरिया** राणीनें कोत्या मनाच्या तटाच्या हातीं अंमल आहे असें पाहून प्रतिनिधींच्या सभेची परवानगी मिळविली आणि " बादशाहीण " हा नवीन किताब आपल्या नांवास जोडला. या काळापासून, **हिंदुस्थानां**तल्या राजकीय कागदोपत्रीं " **विक्टोरिया** राणी " लिहिण्याची वहिवाट होती ती सोडून, " **विक्टोरिया** बादशाहीण " असें लिहिण्याची वहिवाट पडली. किताब धारण केला हें थाटानें जाहीर करण्यासाठीं **दिल्ली** मुक्कामीं " लार्ड " **लिटननें** बड्या दर्बारचा समारंभ केला आणि शुष्क तमाशांत—दुष्काळास असंख्य जानवरी प्राणी बळी पडत आहेत अशा समयीं—पुष्कळ पैसा उडवून टाकला. देशी वर्तमान पत्रें गोऱ्या कामगाराच्या जुलुमाच्या संबंधानें कधीं कधीं कडक लेख लिहितात, तेणें करून **इंग्लंडांत** प्रसंगीं पुष्कळ गवगवा होतो, हें **लिटनला** पूर्णपणें माहीत होतें. असल्या कारण्यानें गोऱ्या कामगारांची नाचक्की होते ती न व्हावी, या मतलबानें " देशी वर्तमान पत्रांच्या संबंधानें कायदा " छापाच्या सरसा मसलत्यांच्या सभेंत पसार करून, देशी वर्तमानपत्रकारांचीं तोंडें **लिटननें** बंद केलीं. नंतर **काबुल** मुक्कामीं " रेसिडेंट " ठेवून त्याच्या

मार्फत ढवळाढवळ करण्याचा आपला मनोरथ पूर्ण करीत नाहीं, असें पाहून—पूर्वीं **लारेन्सनें** उजळ केलेलें **इंग्रजांचें** नांव पुनः काळें करण्यासाठीं- **लिटननें शेरअलीशीं** तंटा आरंभला. **शेर अली** रूसां-च्या मुलुखांत पळून गेला तो लौकरच वारला. तेव्हां **काबूल** मु-क्कामीं लश्कर पाठवून, **शेर अलीचा** मुलगा **याकूब** यास गादी दे-ण्यांत आली आणि **काव्हानरीस** "रेसिडेंट" करून ठेविलें. "आमच्यामध्यें तुमची ढवळाढवळ नको"—इतकेंच **अफगाणांचें** ह्मणणें. **लारेन्स** सारखे थोर मनाचे "व्हॅसराय" होऊन गेले, त्यांस हें **अफगाणांचें** ह्मणणें सर्वांशीं मान्य होतें. ज्याच्या त्याच्या खटल्यांत ढवळाढवळ करून सांपडेल त्यास कोणत्या तरी स-बबीनें पादाक्रांत करण्याचें व्यसन कोत्या मनाच्या तटांतल्या **इंग्रज** अंमलदारांस अतिशय लागलेलें असतें. कोत्या मनाच्या तटांतल्या **लिटननें** विनाकारण ढवळाढवळ आरंभिली, तिचें फळ **इंग्रजांस** लौकरच मिळालें. पूर्वींच्या **इंग्रजांच्या** बाहुलीचें नांव **सुजा** आणि या काळच्या **इंग्रजांच्या** बाहुलीचें नांव **याकूब.** एके दिवशीं **अफगाण** लोक उठले आणि दंग्यास आरंभ झाला. या दं-ग्यांत **काव्हानरी** वगैरे **इंग्रज** ठार झाले. **याकुब** अर्थातच पदच्यु-त झाला. पाण्याप्रमाणें पैसा उधळून पुनः **काबुलवर इंग्रजांनीं** स्वा-री केली. नंतर कित्येक देशाभिमानी **अफगाणांस** देशद्रोही ठर-वून फांशीची शिक्षा **काबुल** मुक्कामीं देण्यांत आली. या प्रमाणें पराक्रम दाखवून लौकरच **इंग्रजांनीं** पाऊल पाठीं घेतलें. स्वतंत्रता इच्छिणाऱ्या व तिच्या पायीं आपलीं शिरकमळें स्वसंतोषानें वहाणाऱ्या अनेक देशाभिमानी **अफगाणांस** देशद्रोही ठरवण्याचें काम थोर म-नाच्या लाखो **इंग्रजांस** लाजिरवाणें वाटूं लागलें. अशा प्रसंगीं थोर मनाच्या तटाच्या हातीं सर्कारी अंमल आला, ही दुधांत साखर

पडली आणि **लिटन**ला गाशा गुंडाळून आपल्या मुलखीं चालतें व्हावें लागलें.

६ "लार्ड" **रिपन**—थोर मनाच्या तटाचा पुढारी या काळीं **ग्लाडस्टन** हा नामांकित पुरुष होता आणि **हिंदुस्थाना**ची चिटणिशी "लार्ड" **हार्टिंगट्न** नांवाच्या सर्दारास मिळाली होती. "लार्ड" **लिटन**च्या सगळ्या करणीची यां उभयतांनींही उघड नापसंती दर्शविली होती. "व्हैसरॉय"की खाली होतांच, ती "लार्ड" **रिपन**ला देण्यांत आली. **रिपन** हा सर्दार पूर्वी **ख्रिस्ती** धर्माच्या "सुधारक" पंथांतील होता. नंतर मनोदेवतेसें केलेली आज्ञा निःशंकपणें शिरसा मान्य करून, हा **रूमी** संप्रदायांत शिरला! याप्रमाणें पंथांतर केल्यामुळें "सुधारक" पंथांतील अनेक **इंग्रजां**ची यांच्यावर वक्र दृष्टि झाली. त्या वक्र दृष्टीकडे बिलकुल लक्ष न पोंचवतां पात्र समजून **रिपन**ला व्हैसरायकी देणारा **ग्लाडस्टन** जितका धन्य होय; तितकाच—पैशाची वाण नसतांही केवळ **हिंदुस्थानां**तल्या लोकांच्या कल्याणाकडे लक्ष पोंचवून—व्हैसरायकी घेणारा **रिपन**ही धन्य होय. **अफगाणस्थानां**तून **इंग्रजी** लश्करास पाठीं येण्याचा हुकुम करून, **इंग्रज** पादाक्रांत करूं पहातात अशी **अफगाणां**स आलेली बळकट शंका **रिपन**नें घालविली आणि त्यामुळें **हिंदुस्थाना**च्या पश्चिमेकडल्या सर्हद्दीवरील या दगडी भिंतीस आयती मजबुती आली. तोंड बंद करणारा कायदा रद्द केला, ही एक मोठी मेहेरबानी देशी वर्तमानपत्रकारांवर **रिपन**नें केली. **रिपन**ला कोणत्याही प्रकारचा पक्षपात खपत नसे. गोरा गुन्हेगार पुष्कळ प्रसंगीं अजीबात सुटून जातो, हें पाहून "जूरी"च्या कायद्यामध्यें फेरफार करण्याकडे **रिपन**ची प्रवृत्ति झाली. पण **बंगाल्यां**तील सगळे गोरे आणि गंगाजम्नी **रिपन**वर तुटून पडले. ह्मणून जितकी हवी होती, तितकी सुधारणा "जूरी"च्या कायद्यांत **रिपन** करूं शकला नाहीं. अलीकडील राज्यपद्धति

देशी लोकांस शिकतां यावी या स्तुत्य उद्देशानें जागोजागीं " म्युनिसिपालिट्या " नवीन स्थापण्याचा हुकुम करून जुन्या " म्युनिसिपालिटीं "स कांहीं अधिक हक्कही एक नवीन कायदा करून **रिपन**कडून देण्यांत आले. या कायद्यास "स्थानिक स्वराज्याचा कायदा" ह्मणतात. **रिपन**सारखा " व्हैसराय " एक **रिपन**च. **रिपन**सारखे तीन " व्हैसराय " जर एका पाठून एक येतील, तर **हिंदुस्थानां**त सर्वत्र आबादानी होईल आणि '**इंग्रज** सरकारचें राज्य आपणावरून जावो' असा उद्गार **हिंदुस्थानां**तल्या कोणत्याही ज्ञातीच्या राहिवाश्याच्या तोंडून स्वप्नांतही निघण्याचा संभव नाहीं.

७ " **लार्ड** " **डफरीन**—हा थोर मनाच्या तटांतला आपणास ह्मणवी; पण जी दुटप्पी मंडळी असते, तिच्यामध्यें याची गणना केली पाहिजे. **ब्रह्मदेशा**ची राजधानी **मंडले** नगरी आणि राजा **थीबा**. **थीबा**च्या क्रूरपणाच्या संबंधानें अनेक बातम्या **कलकत्या**कडील **इंग्रजी** व्यापाऱ्यांनीं उठविल्या. त्यामुळें **ब्रह्मी** लोकांस राक्षसी **थीबा**च्या जुलमांतून मुक्त करण्यासाठीं ह्मणून **डफरिन**नें कडेकोट तयारी चालविली आणि बरीच फौज सवड सांपडतांच **थीबा**वर रवाना केली. **थीबा** कैदी झाला आणि **हिंदुस्थानां**त आला. हल्लीं हा **रत्नागिरी** मुक्कामीं असून सशासारखा अगदीं निरुपद्रवी आहे. पण त्या काळच्या **कलकत्या**कडील **इंग्रजी** वर्तमानपत्रांनीं या सशास क्रूर आणि राक्षसी करून सोडलें. **थीबा** कैदी झाल्या नंतर जे **ब्रह्मी** लोक स्वातंत्र्यासाठीं भांडूं लागले, त्यांस **इंग्रजी** वर्तमानपत्रें " दरोडेखोर " किंवा " लुटारू " ह्मणूं लागलीं ! ! ! या प्रमाणें **ब्रह्मदेशा**चा **इंग्रजी** साम्राज्यांत मिलाफ झाला.

८ " **लार्ड** " **लान्सडौन**—हाही **डफरी**नच्याच वर्गांतला पुरु-

ष. **नाग** नांवाचे डोंगरी लोक **बंगाल**च्या पूर्वेस राहतात. या लोकांचें लहानसें राज्य असून, राजधानी **मणिपुर** होती. "बळी तो कान पिळी" या न्यायाचा आश्रय करून **लान्सडौन**नें **मणिपुरा**वर लश्कर पाठविलें. **नाग** लोक जात्या शूर व सशक्त आहेत, **ब्रह्मी** लोकांसारखे भित्रे व अशक्त नाहींत. **इंग्रजां**ची मसलत **नाग** लोकांस फसविण्याची होती. पण ती **नाग** लोकांस कळली. दगा कळतांच आंगाची लाही चाललेल्या **नागांनीं** **इंग्रजांचीं** कत्तल केली. दगा करण्याची आपली मसलत वायां गेली असें पाहून, **इंग्रजांनीं** राजद्रोहाचे आरोप कसे तरी राजावर तसेच राजाच्या कैवाऱ्यांवर आणिले आणि कोणांस फांशीं देऊन, कोणांस गोळीनें उडवून अखेरीस **मणिपुर**चें छोटें राज्य आपल्या साम्राज्यांत सामील केलें. **ब्रह्मदेशा**चें राज्य खालसा करून जसा **डफरीन**नें तसाच **मणिपुर**चें राज्य खालसा करून **लान्सडौन**नें आपल्या कारकीर्दीवर डागाचा पट्टा ओढून ठेविला आहे.

याची कारकीर्द नुकतीच संपून व्हैसरायकीवर "लार्ड" **एलजिन** या सर्दाराची नेमणूक करण्यांत आली आहे. **इंग्लंड** देशामध्यें दोन गोष्टी **लान्सडौन**च्या कारकीर्दीत घडून आल्या, त्या देशी लोकांनीं विशेष ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. **फिन्सबरी** नांवाचा गांव **इंग्लंडां**त आहे. या गांवांतून एका प्रतिनिधीची निवडणूक होत असते. १८९२ सालीं निवडणुकीचा वडा प्रसंग आला, तेव्हां **फिन्सबरी**च्या मतवाल्यांनीं बहुमतानें आपला प्रतिनिधिपणा **दादाभाई नौरोजी** या पार्शी कुळांत जन्मून **हिंदुस्थानांत**ल्या सगळ्या जातींच्या लोकांचा कैवार घेणाऱ्या सत्पुरुषास दिला. ही एक विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट. **इंग्लंडांतील इंग्रज** लोक मनानें किती थोर असतात, या-

चें हे एक अत्युत्तम उदाहरण होय. कोत्या मनाच्या तटाचा **सा-ल्सबरी** नांवाचा पुढारी आहे त्यास हें **फिन्सबरीं**तील लोकांचें करणें अगदीं नापसंत पडलें, हीं एक लहानशी गोष्टही लक्षांत ठेवण्यासारखी आहे; कारण कोत्या मनांचा तट इतःपर देशी लोकांस अगदीं प्रतिकूळ असणार, हा एक मुद्दा हिवरून सहज शाबीत होऊन जात आहे. दिवाणी सनदी नोकरांची जाहीर परीक्षा होते ती **हिंदुस्थानां**तही व्हावी अशी सूचना **पौल** नांवाच्या प्रतिनिधीनें आणली ती प्रतिनिधींच्या सभेनें बहुमतानें मंजूर केली. ही दुसरी विशेष ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट. **इंग्लंडां**तील प्रतिनिधींची सभा मनानें किती थोर आहे, याचें हें एक अत्युत्तम उदाहरण होय. **पौल** हा थोर मनाच्या तटांतला असून, थोर मनाच्या तटाचा पुढारी **ग्लाडस्टन** यानें ही मंजूर झालेली सूचना **हिंदुस्थान**च्या सर्कारानें लौकरच अंमलांत आणावी ह्मणून तात्वडतोब तजवीज चालविली, हीही लहानशी गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे ; कारण थोर मनाच्या तटाशींच सांगड घालण्यांत आपलें कल्याण आहे, हा एक मुद्दा हीवरून अनायासें देशी लोकांच्या लक्षांत येत आहे.

समाप्त.

# मराठा हैस्कूल.

## गिरगांव, मुंबई.

( " म्याट्रिक " पर्यंत किंवा " स्कूल फैनल " पर्यंत शिकवणारी खाजगी शाळा ).

ही शाळा इसवी शके १८८६ या सालीं जून महिन्याच्या १ ल्या तारिखेस स्थापन झाली. १८८७, ८८, ८९, ९०, ९१ या सालीं अनुक्रमें ६, ६, ९, ४, ८, असे विद्यार्थी या शाळेंतून " म्याट्रिक्युलेशन "च्या परीक्षेंत पसार झाले. १८८८ सालीं जगन्नाथ शंकरशेटची पहिली स्कालरशिप या शाळेंतील विद्यार्थी विष्णु परशुराम रावेरकर यानें मिळविली. १८९१ सालीं ' म्याट्रिक " परीक्षेंत पसार झालेल्या उमेदवारांमध्यें पहिलें नांव आलेला विद्यार्थी रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे याच शाळेंतील होता.

## १८९२ची 'म्याट्रिक' ची परीक्षा व 'मराठा हैस्कूल.'

वरील परीक्षेस १६ उमेदवार पाठविले. त्यांपैकीं ९ पसार झाले. त्यांच्या नांवाचा आंकडा, नांवें व गुणांची संख्या—

| नां. आं. | नांव. | गुण (एकंदर ६२५) |
|---|---|---|
| १२ | भागवत, रामचंद्र भास्कर | ४१० |
| ५० | रानडे, नारायण गणेश | ३६९ |
| ७२ | भिडे, बाळकृष्ण अनंत | ३१६ |
| ३८० | रानडे, नारायण सदाशिव | २९० |
| ५९४ | कौशिक, सुबराव शेषगिरी | २६५ |
| ६१४ | अवरंगाबादकर, अण्णाजी केशव | २६३ |
| ६२१ | रायकर, जनार्दन गोविंद | २६२ |
| ६२८ | नाईक, महादेव लाडोबा | २६२ |
| १०४९ | मराठे, गोपाळ केशव | १९८ |

या वर्षी वरील परीक्षेस २९७० उमेदवार आले, त्यांपैकीं १०९४ पसार झाले.

## १८९२ ची 'यु. एस्. एफ्. ' ची परीक्षा व 'मराठा हैस्कूल.'

वरील परीक्षेस ११ उमेदवार पाठविले. त्यांपैकीं ४ पसार झाले. त्यांच्या नांवाचा आंकडा, नांवें व गुणांची संख्या—

| नां. आं. | नांव. | गुण ( एकंदर ६५० ) |
|---|---|---|
| ९३ | हळदणकर, विष्णु रामचंद्र | ४३४ |
| ११० | रानडे, नारायण गणेश. | ४१९॥ |
| १८२ | जोशी कृष्णाजी रघुनाथ. | ३८२ |
| २८२ | पेठे, विष्णु गणेश. | ३४१ |

या वर्षी वरील परीक्षेस सुमारें १५२१ उमेदवार आले, त्यांपैकीं ३९९ पसार झाले.